११८२१



खिस्तपूर्व तीनचार हजार वर्षे

IRBK-0111821

# १ : भगवान श्रीकृष्ण

" होय का ? ठीक आहे तर मग. तुझ्या इच्छेप्रमाणे होऊ दे. घन घोर युद्ध होईल. त्यात तुझा नाश होईल हे ध्यानात असू दे. सबंध कुलाचा क्षय होईल. मदोन्मत्त होऊन भलतीच प्रतिज्ञा केलीस तू. त्यात तू होरपळून जाशील."

असे हे धर्मवीर !

पांडवांचे न्याय्य हक्क नाकारून त्यांना सुईच्या अग्रावर मावेल इतकी मातीही देण्यास तयार नसल्याचे दुर्योधनाने सांगितल्यावर श्रीकृष्णाने संतापून त्याच पद्धतीचे उत्तर त्याला दिले. इतकेच नव्हे, तर दुर्योधनादी कौरवांनी पांडवांच्या विरुद्ध केलेल्या एकएक अपराधाची यादीच श्रीकृष्णाने संतप्त होऊन वाचली. अन्यायाची परमावधी झाली. संपत्तीचे अपहरण, द्रौपदीचा भर सभेत मानभंग, वारणावतात पांडव असताना त्यांना लाक्षागृहात जाळण्याचा प्रयत्न; अशा किती घनघोर व भयानक गोष्टी सांगाव्यात ! किती दुःख पांडवांनी आता सहन करावे ? पांचालीच्या मनास किती यातना व्हाव्यात ? बारा वर्षे वनवास, एक वर्ष अज्ञातवास, मुलांची ताटातूट, राज्यवैभव नष्ट होणे, वनवासात जयद्रथासारख्याकडून पुनः अपमान; किती कष्ट, किती क्लेश या महाराणी द्रौपदीने भोगावेत ? आणि एवढा भोग भोगल्यावर साधी पाच गावे पांडवांनी मागितली तर ती कौरवांनी देऊ नयेत ? मस्तवालपणे पुनः उत्तर द्यावे ?

दुर्योधनाचे बेताल उत्तर धर्मराजाने शांतपणे ऐकून घेतले असते, पण श्रीकृष्णाला आता हा अन्याय सहन होण्यासारखा नव्हता. शिष्टाईला निघताना त्याला द्रौपदीने आपले मोकळे केस दाखवून म्हटले होते, ' कृष्णा, ही मी द्रुपदकन्या, पाच समर्थ पांडवांची पत्नी, तुझी प्रिय भगिनी...मला भर सभेत दुःशासनाने फरपटत नेले रे !' अशा प्रकारचा करुणेचा पुकार ऐकून श्रीकृष्ण तिला म्हणाला होता, " द्रौपदी, तू काळजी करू नकोस. कौरववीर अर्जुनाच्या बाणांनी विद्ध होतील. त्यांच्या स्त्रिया रडतील. तू लौकरच महाराज्ञी होशील. आकाश कोसळेल, हिमालय वितळेल, पृथ्वी भंग होऊन जाईल, पण माझी ही प्रतिज्ञा खोटी ठरणार नाही."

अन्यायाचा प्रतिकार सतत आयुष्यभर करणाऱ्या श्रीकृष्णाची ही

प्रतिज्ञा. ' परित्राणाय साधूनां ' आणि ' विताशायच दुष्कृताम् '—साधु-सज्जनांचे रक्षण करण्यासाठी आणि त्याच्या अगोदर दुष्टांचा संहार करण्यासाठीच श्रीकृष्णाचा अवतार होता. प्रश्न सामोपचाराने मिटत नाही, सल्लामसलतीने न्यायाचे हक्क मिळत नाहीत असे पाहताच श्रीकृष्णाने दुर्योधनालाही बजावले, ' आता महायुद्ध होईल व त्यातच तुझा अंत होईल असे समज. '

असे हे लहानमोठे संग्राम श्रीकृष्णाला आयुष्यात धर्मसंस्थापनेसाठी, साधुसज्जनांच्या रक्षणासाठी अनेकदा करावे लागले होते. गोकुळात असल्यापासूनच संकटांना न जुमानता झुंज देणे व गोरगरिबांचे रक्षण करणे हेच त्याचे जीवन होते. यमुनेच्या प्रवाहात एका डोहाच्या आश्रयाने कालिया नावाचा एक महाभयानक व विषारी सर्प आजूबाजूच्या लोकांना त्रस्त करीत असे. पशू, पक्षी, जनावरे व सर्वसामान्य माणसे कालियाच्या या दुष्ट प्रवृत्तीने त्रस्त होऊन गेली होती. या विषारी कालियास हाकून द्यावे आणि भोवतीचे वातावरण निर्दोप करावे या हेतूने एकदा श्रीकृष्ण यमुनेच्या डोहावर गेला. काठावरील कदंबाच्या झाडावर चढून त्याने दंड थोपटले, व एक आरोळी ठोकून डोहात उडी घेतली. डोहाचे पाणी सर्व दिशांनी वर उसळून आले. सर्वत्र हाहाकार उडाला. कालिया सर्प रागाने लालीलाल झाला. त्याच्या डोळ्यांतून आग बरसू लागली. त्याच्या जिभा लळालळा करून वळवळत होत्या. त्याच्या पाच फणांतून विषारी फूत्कार बाहेर पडत होते. श्रीकृष्णास पाहताच त्याने संतापून एकदम त्याच्या पोटास विळखा घातला. त्याला दंश करण्यासाठी कालिया वारंवार प्रयत्न करू लागला. मध्येच चपळाई करून श्रीकृष्णाने त्याचे नरडे धरले. त्याबरोबर त्याचे विळखे सुटले. संधी साधून श्रीकृष्ण त्याच्या फण्यांवरच चढला व तेथे ना [illegible] सुरू केले. कालिया सर्पाचे फारच हाल [illegible] शरण

IRBK-0111821

आला. त्याच्या दोन बायका कालियास जीवदान मिळावे म्हणून श्रीकृष्णाची प्रार्थना करू लागल्या. कालियाने हा डोह सोडून दुसरीकडे निघून जावे, गोरगरिबांना त्रास देऊ नये अशा अटीवर श्रीकृष्णाने त्याला जीवदान दिले. कालियाने श्रीकृष्णाच्या चरणांवर मस्तक ठेवून त्या स्थानाहून दुसरीकडे प्रयाण केले.

अशी संकटे गोकुळातील गोपालांवर अनेक प्रकारची येत; ती सर्व श्रीकृष्णाने आपल्या अद्‌भुत पराक्रमाने दूर केली. गोकुळातील स्त्री-पुरुषांची, मुला-मुलींची प्रीती श्रीकृष्णावर चांगलीच जडली. त्याचे कौतुक ज्याच्या त्याच्या तोंडी असे. त्याच्या पराक्रमाच्या कथा सर्वांना स्फुरण देत. त्याचा गोपाळाचा वेष त्याला शोभून दिसे. आधीच मुद्रा प्रसन्न व मोहक. त्यात सहजसुलभ व साधा असा साजशृंगार मोठा खुलून दिसे. गळ्यात कधी वैजयंतीची अथवा कधी वनफुलांची माळ, डोक्यावर मोरपिसांची टोपी, हातात बासरी अशा थाटातील श्रीकृष्णाचे मनोहर असे बालरूप पाहून सर्वांना त्याचा आश्रय हवाहवासा वाटे.

कित्येक वर्षांपासून गोकुळात वर्षाकाठी एक इंद्रोत्सव करीत. इंद्र हा मेघांचा राजा. त्याच्या कृपेने वेळच्या वेळी पाऊस पडतो अशी सर्वांची श्रद्धा असल्याने लोक इंद्राच्यासाठी मोठा समारंभ करीत. यज्ञयागांनी इंद्रास संतुष्ट केले की तो पावसाचा वर्षाव करील, धरणी धनधान्यांनी समृद्ध होईल, फुलाफळांनी बहरून निघेल, हिरव्यागार चाऱ्याने गाई पुष्ट होतील, नदीनाले रुचकर पाण्याने दुथडी वाहू लागतील अशी त्यांची भावना असे. एकदा श्रीकृष्णाच्या मनात एक नवाच प्रश्न निर्माण झाला.

पाऊस काय हा इंद्रदेव आणतो ?

श्रीकृष्णाने लोकांना यथार्थ ज्ञान देताना समजावून सांगितले,

" पाऊस इंद्राच्या कृपेने येतो ही गोष्ट खरी नाही. आपल्याभोवती हे डोंगर आहेत, ही जंगले आहेत. यांच्या आश्रयाने मेघ सजल बनतात,

या पर्वतांमुळे मेघ अडविले जातात. या जंगलांमुळे पाणी बरसणारे मेघ गोकुळावर स्थिर होतात. हे डोंगर, या गाई, ही जंगले हीच खरी आपली दैवते. यांची पूजा आपण करावी. आपल्या मुलाबाळांना अमृताप्रमाणे दूध देऊन संतुष्ट व पुष्ट करणाऱ्या गाई या पर्वतांच्या व जंगलांच्या आश्रयाने चरतात, तृप्त होतात. आपण या गायींची, या गोवर्धन पर्वताची पूजा करू या. सर्व पूजासाहित्य आपण या पर्वतास अर्पण करू. विविध प्रकारच्या रंगीबेरंगी पक्ष्यांनी हा गोवर्धन पर्वत पाहा कसा रमणीय दिसत आहे. चला, आपण याचीच पूजा करू. ”

श्रीकृष्णाचे म्हणणे सर्वांना पटले. गोकुळापासून गोवर्धनाकडे मोठ्या थाटाने मिरवणूक निघाली. नाना फुलांच्या माळा गळ्यांत घालून गोपाळ आनंदाने नाचत होते. गायींच्या शिंगांना सोनेरी टोपणे बसविली होती. त्यांच्या गळ्यांत मंजुळवाणी घुंगरे होती. गोपाळांनी डोक्यावर मोरपिसे खोचून शोभा आणली होती. दह्यादुधांची सुंदर व सुरस पक्वान्ने सिद्ध होती. सर्वांनी मोठ्या उत्साहाने गोवर्धन पर्वताची पूजा केली. या सर्व प्रकाराने इंद्रदेव रागावला. त्याने गोकुळ बुडवून टाकण्यासाठी एकसारखी पर्जन्यवृष्टी सुरू केली. भयंकर वादळ झाले. हत्तीच्या सोंडे-प्रमाणे पाऊस कोसळू लागला. सर्व गोकुळ बुडण्याच्या बेतात आले. सर्वत्र एकच आकान्त उडाला. सर्व लोक भयभीत झाले. प्रलयकाळ जवळ आलासे पाहून पशू, पक्षी, जनावरेही गांगरून गेली. पंख ओलेचिंब झाल्याने पक्षी स्तब्ध व भीतिग्रस्त होऊन अंग आकसून निवारा शोधीत राहिले. अशा या संकटातून गोकुळवासियांना, जनावरांना, पशुपक्ष्यांना वाचविले ते श्रीकृष्णानेच. सर्वांना घेऊन तो गोवर्धन पर्वताच्या आश्रयास गेला. कितीही पाऊस कोसळला तरी पर्वता-वरील पाण्याचा निचरा लौकर होत असे. सर्वांना धीर देऊन श्रीकृष्णाने पर्वताच्या आश्रयाने गोकुळाचे रक्षण केले.

गोकुळात वाढणाऱ्या श्रीकृष्णाचे कर्तृत्व अशा प्रकारे दाही दिशांनी ओसंडत होते. सर्व लोकांची भक्ती श्रीकृष्णाभोवती आकार घेत होती. अनेक प्रयत्न करून वसुदेव देवकी यांचा पुत्र नष्ट करण्याचा प्रयत्न आपण केला पण तो फसला. हा देवकीपुत्र श्रीकृष्ण नंद-यशोदा यांच्या घरी गोकुळात वाढत असल्याचे वृत्त मथुरा येथे कंसास समजले. त्याच्या चित्ताची शांती नष्ट झाली. या दुष्ट कृष्णास कसे मारावे, याच विवंचनेत कंस होता. त्याने श्रीकृष्ण व बलराम यांना गोकुळातून मथुरेस आणावे म्हणून अक्रूरास पाठविले. श्रीकृष्णाचे पराक्रम आठवून आठवून कंस आधीच भयभीत झाला होता. कृष्ण मथुरेस येण्यापूर्वीच त्याचा नाश व्हावा म्हणून कंसाने केशीस प्रथम पाठविले. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही.

मथुरेत श्रीकृष्ण येणार म्हणून कित्येकांना अतिशय हर्ष झाला. हा दुष्ट कंस, चाणूर व मुष्टिक या मल्लांच्या हस्ते श्रीकृष्णाच्या जीवितास दगा नाही ना देणार ? अशीही शंका अनेकांच्या मनात येऊन गेली. उलट या मल्लांनाच श्रीकृष्ण मारून तर नाही टाकणार ? याच शंकेने कंस व्यथित झाला. त्याने कुवलयापीड नावाच्या एका हत्तीकरवी श्रीकृष्णास चिरडून टाकण्याचा बेत केला. अनेक दुष्ट बेत व कपटी कारवाया करून श्रीकृष्णाचा नाश करण्यास कंस उत्सुक होता, परंतु श्रीकृष्ण प्रथमपासूनच सावध असे. कंसाच्या दरबारात येत असतानाच चवताळून कुवलयापीड हत्ती अंगावर चालून येत असलेला पाहून कृष्णाने डाव ओळखला. दंड थोपटूनच श्रीकृष्णाने हत्तीशी सामना करण्याचे ठरविले. हत्तीने चिडून आपली सोंड कृष्णाभोवती आवळली. पण चपळाईने श्रीकृष्ण त्या पकडीतून निसटला व त्याने हत्तीच्या पोटावर आपल्या वज्रासारख्या मुठीने प्रहार करायला सुरुवात केली. शेवटी हत्तीचे दात दोनही हातांत गच्च पकडून त्याने हत्तीला संतप्त करून सोडले. मध्येच दात काडकन मोडून

हत्तीचे तोंड रक्तबंबाळ झाले. त्याच मोडक्या दाताने श्रीकृष्णाने हत्तीचे गंडस्थळ फोडले. हत्तीची सारी रग जिरली. मोठ्याने चीत्कार करीतच त्याने प्राण सोडला. श्रीकृष्णाच्या पराक्रमाने चकित झालेल्या हजारो लोकांनी कंसाच्या दरबारातच त्याचा जयजयकार केला. अनेक मल्लांचा पराभव श्रीकृष्णाने या वेळी केला. कंसाच्या मनात भीतीने थैमान मांडले. त्याची गाळण उडून घेली. मदमत्त झालेल्या कंसास श्रीकृष्णाने खाली ओढून यमसदनास पाठविले. दुष्ट शक्तींचा नाश झाला. कंसाच्या भीतीने ग्रस्त झालेली प्रजा आनंदाने न्हाऊन निघाली. वसुदेव-देवकींना पुत्राचा पराक्रम पाहून धन्यता वाटली.

अशा या अद्भुत शौर्याच्या गोष्टी सर्वत्र पसरून श्रीकृष्णाविषयी सर्वांनाच कमालीचा आदर वाटू लागला. हा विष्णूचाच अवतार असल्याची खात्री सर्वांना पटली. पांडवांचा एकमेव आधार हाच श्रीकृष्ण होता. अर्जुन व भीम यांच्या करवी श्रीकृष्णाने आणखी काही दुष्ट शक्तींचा नाश केला. जरासंधाचा वध त्यानेच भीमाच्या हातून करविला. जेथे जेथे उन्मत्त शक्ती प्रबळ झाली, दुष्टांचा जुलूम वाढला, सज्जन भयभीत झाले, तेथे तेथे श्रीकृष्ण साह्यार्थ धावून गेला. स्वत्वाची त्याने जपणूक केली. नेभळे औदार्य त्याला मान्य नव्हते. वृथा कुणी त्रास दिला तर त्याला सहन होण्यासारखे नव्हते. राजसूय यज्ञाच्या वेळी अग्रपूजेचा मान कुणास द्यावा यासंबंधी बाचाबाच झाली. सर्व ज्येष्ठ व श्रेष्ठ यांच्या मतांनी श्रीकृष्णासच हा मान द्यावा असे ठरले व त्याप्रमाणे श्रीकृष्णाची पूजा प्रथम झाली. या कृत्याने शिशु-पालास फारच अपमान वाटला. त्याचे अंग संतापाने लाल झाले. त्याने श्रीकृष्णाची निंदा सर्वांसमक्ष भरपूर केली. ‘ हा श्रीकृष्ण वयोवृद्ध नाही, आचार्य नाही, राजा नाही, हा एक गवळ्याचा पोर ! याची सर्वांआधी पूजा ? ’ शिशुपालाच्या या उद्दाम भाषणामुळे साऱ्या सभेत

एकदम गडबड गोंधळ सुरू झाला. या मस्तवाल शिशुपालाचाही वध श्रीकृष्णाने त्याच ठिकाणी केला.

आणि आता तो पांडवांवर झालेल्या अन्यायाच्या परिमार्जनासाठी सिद्ध झाला. कुठलाही उपदेश वा सामोपचार दुर्योधनादी कौरवांना पटत नाहीसे पाहून श्रीकृष्णाने घनघोर युद्धाची तयारी केली. दोनही पक्षांची सैन्ये सज्ज झाली. अनेक राजेमहाराजे सिद्ध झाले. कुरुक्षेत्र उभय पक्षांतील सैन्यांच्या हालचालींमुळे कंपित होऊन उठले. रथ, हत्ती, घोडे यांची गर्दी उसळली. शस्त्रांचे खणखणाट ऐकू येऊ लागले. अर्जुनाच्या रथाचा सारथी स्वतः श्रीकृष्ण होता ! वीरांच्या गर्जनांनी आकाश दुमदुमून गेले. भीष्म, द्रोण, जयद्रथ, कृतवर्मा, शल्य इत्यादी वीर कौरवांच्या बाजूने आणि सात्यकी, विराट, द्रुपद, चेदी, धृष्टकेतु इत्यादी वीर पांडवांकडून युद्धास सज्ज झाले. आचार्य, पितामह, श्वशुर, शालक, पुत्र, पौत्र, बंधू, आप्त, मित्र यांची परस्परांस ओळख अशा वेळी कुठून असणार ?

अशा या अथांग सैन्यसागराच्या मध्यभागी श्रीकृष्णाने अर्जुनाचा रथ आणला. ज्यांच्यांशी लढायचे त्यांचे सामुदायिक दर्शन घेतल्यावर अर्जुनाचे चित्त द्रवून गेले. त्याचे क्षत्रिय मन दयेने पाझरू लागले. हे सर्व आपले आप्त, आचार्य, आपले बांधव...यांच्यांशी लढायचे ? यांची हत्या करायची ? यांच्या रक्ताने माखलेल्या सिंहासनावर बसायचे ? राज्य-लोभासाठी कुलक्षय करायचा ? या कुलक्षयाच्या पातकाचे धनी आपण व्हायचे ? सर्व तरुण वीर मरण पावतील; त्यांच्या विधवा रडून आक्रान्त करतील. अनाचार माजेल. वर्णसंकर होईल. समाजाची घडी विसकटून जाईल. या सर्व दोषांचा वाटा आपण का घ्यावा ? त्यापेक्षा नको ते राज्य, नको ते युद्ध; अशी अर्जुनाच्या मनाची विचलित स्थिती झाली.

ऐन युद्धाच्या वेळी रणांगणावर शस्त्रे टाकून हतबल झालेल्या

अर्जुनास धीर देण्याच्या निमित्ताने, त्याच्या हातून यथायोग्य कर्तव्य-कर्म घडावे या हेतूने त्याच्या मनात आलेले किल्मिष दूर व्हावे म्हणून श्रीकृष्णाने त्याला उपदेश केला. क्षत्रियास उचित अशा धर्माची व कर्तव्याची जाणीव त्याने करून दिली. अन्यायाच्या परिमार्जनासाठी हातात शस्त्र धरणे अगत्याचे आहे असे श्रीकृष्णाने त्याला पटवून दिले. 'युद्धाय कृतनिश्चयः,' 'तस्मात् उत्तिष्ठ कौंतेय,' 'मामनुस्मर युद्धय च' इत्यादी शब्दांनी श्रीकृष्णाने अर्जुनास प्रोत्साहित केले. माझ्या हातून पाप होणार, मी या कौरवांना मारणार, हा अर्जुनाचा भ्रम त्यानेच दूर केला. कोणत्याही प्रकारच्या फलाची अपेक्षा न धरता कर्तव्यकर्म करीत राहण्याचा थोर उपदेश त्याने गोंधळलेल्या अर्जुनास केला. ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग यांची यथायोग्य सांगड नित्याच्या कर्तव्यपरंपरेत त्याने घालून दिली. आजवर श्रीकृष्णाने शक्ती व बुद्धी यांच्या साह्याने नुसती अचाट कृत्ये करून, पराक्रम करून सर्वांना दिपविले होते. पण नुसत्या पराक्रमाने काय होणार? त्याला तत्त्वज्ञानाची, विचार-परंपरेची बैठक अत्यावश्यक असते. तत्त्वज्ञानाच्या भरभक्कम पायावर समाज खंबीरपणे उभा राहतो. अखंडपणे येणाऱ्या संकटांना तोंड देण्याचे सामर्थ्य त्यास येते ते या तात्त्विक बैठकीमुळे. अशी ही बैठक रणांगणावर अर्जुन मोहग्रस्त झाला असताना श्रीकृष्णाच्या मुखातून निर्माण झाली. निमित्त अर्जुनाचे झाले; पण साऱ्या जगास, सर्व काळी उपयुक्त होईल अशी भगवद्गीता 'वाङ्मयी मूर्ति श्री-प्रभूची' म्हणून आजही सर्वांच्या आदरास पात्र झाली आहे. सर्व उपनिषदांचे सार या भगवद्गीतेत आहे. श्रीकृष्णाच्या या तत्त्वप्रणालीवर श्रीशंकराचार्य, श्रीज्ञानेश्वर, वामनपंडित, दासोपंत, लो. टिळक, योगी अरविंद, म. गांधी, डॉ. राधाकृष्णन् यांसारख्या थोर विचारवंतांनी भाष्ये लिहून समाजास मार्गदर्शन केले आहे. जिथे संकटपरंपरा उभी

राहील, जिथे अन्यायाचे तांडव सुरू होईल, जिथे पाशवी वृत्ती भीषण स्वरूपात नाचू लागेल, जिथे मदोन्मत्त सत्ता अंध बनेल, जिथे आसुरी थैमान प्रकट होईल, तिथे तिथे श्रीकृष्णाची भगवद्‌गीता दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करील. दया, धर्म, प्रेम आणि बंधुभाव यांसाठी दुष्टसंहार करून माणसाचा संसार नीट मांडण्यासाठी भगवद्‌गीता आजही तत्पर आहे.

भारतीय युद्धात श्रीकृष्णाने अर्जुनाचे नुसतेच सारथ्य केले असे नाही. त्याचा ‘ मनोरथ ’ भलतीकडेच जाऊ लागला की तो सावरीत असे. अनेक प्रसंगी महत्त्वाचा सल्ला श्रीकृष्णाने पांडवांना दिला. पांडवांचा जय झाला. ते पुनः सिंहासनावर आले. सर्व अपमानाची शल्ये संपली. द्रौपदी कृतकृत्य झाली. पोटच्या मुलांच्या संहाराचे दुःख असले तरी ज्याने केसास हात घातला तो हातच छाटला गेल्याचे पाहून ती तृप्त झाली. भूमीस दुष्टांचा भार फार होत होता; पण आता त्यांचा संहार झाल्याने ती संतुष्ट झाली. श्रीकृष्णही आयुष्यात जे करणे अगत्याचे ते करून कृतकृत्य झाला. सर्व यादवांचा निरोप घेऊन मग तो वनात येऊन योगमुद्रा धारण करून बसला. त्याचा उजवा पाय डाव्या गुडघ्यावर होता. त्याचे डोळे मिटलेले असून तो ध्यानमग्न होता. दूर कुठे तरी एक भिल्ल उभा होता. श्रीकृष्णाचा तांबुस लालसर पाय एखाद्या हरिणशावका-प्रमाणे वाटला. त्याने त्याच्यावर एक बाण सोडला. अशा सहज साध्या प्रसंगाने मानवी धर्माचा संस्थापक श्रीकृष्ण निजधामास गेला.

* * *



ख्रिस्तपूर्व १,५०० वर्षे

## १ : मुक्तिदाता मोझेस

रोम येथील 'सेंट पीटर्स चर्च इन व्हिंकोली'मध्ये एक भव्य अशी पाषाण-मूर्ती पाहणाऱ्या माणसापेक्षा धिप्पाड व करारी अशी आहे. या मूर्तीच्या प्रत्येक रेखीव अवयवावर एक प्रकारचा रुबाब आहे. छातीवरून प्रशस्त-

पणे दाढी रुळत असून उजव्या हाताने ती त्याने थोडी सावरून धरली आहे. या मूर्तीच्या उजव्या काखेशी एक पाषाणशिला आहे. तीवर मानव जातीस उपकारक ठरतील अशा 'दहा आज्ञा' आहेत. ज्या मुक्त ज्यू लोकांसाठी मोठ्या प्रयत्नाने त्याने वर्तनाचे हे दहा नियम आणले होते ते ज्यू आपापसांतील भांडणांत, व्यसनांत, अधर्मात ख्याली-खुषालीत दंग झालेले पाहून त्यांचा हा स्वातंत्र्यवीर मोझेस क्रोधाने त्यांच्यावर प्रखर दृष्टी टाकीत आहे. प्रसिद्ध चित्रकार व शिल्पकार माय-केलांजेलो याने मोझेसचे सारे कर्तृत्व या विख्यात पुतळ्यात बोलके केले आहे. या पुतळ्यापुढे आपण अर्धाएक तास उभे राहिलो तर हाच मानवी इतिहासातील एक नाट्यपूर्ण प्रसंग खुलवून सांगेल.

इजिप्तच्या जुलमी राजांच्या तावडीत गुलामीचे जिणे कंठणाऱ्या ज्यूंचा मुक्तिदाता व त्यांना त्यांची मातृभूमी परत मिळवून देणारा एक थोर धर्मदूत म्हणून मोझेसचे नाव प्रसिद्ध आहे. ज्यू लोकांना त्याने नुसते स्वातंत्र्य मिळवून दिले असे नव्हे, तर त्यांना सतत उपयुक्त होतील असे सद्वर्तनाचे दहा नियमही त्याने प्राप्त करून दिले.

भटकत भटकत हेब्रू लोक पॅलेस्टाईनमध्ये म्हणजेच आजच्या इस्रायल-मध्ये राहावयास आले. पण या देशात त्यांचा चरितार्थ नीट चालेना. भूमी नापिक व ओसाड असल्यामुळे पीक निघत नव्हते. म्हणून पुढे यांनी इजिप्तच्या संपन्न भूमीत स्थलान्तर केले. या वेळी इजिप्तची राजसत्ता अतिशय वैभवशाली होती. ऐश्वर्य उतास जात होते, पण त्यांचा धर्म मात्र प्रगल्भ अवस्थेचा नव्हता. कुत्रा, मांजर, ससा, वासरू, पक्षी इत्यादींच्या वेडयावाकडया मूर्ती तयार करून हे लोक पूजीत असत. धर्माचा संबंध आचारविचारांशी व मनाच्या उन्नतीशी असतो हे यांना माहीत नव्हते. नाना प्रकारच्या ओबडधोबड मूर्तींची पूजा व त्यांच्या

पुढील घाणेरडे आणि चमत्कारिक आचार हेब्र ज्यूंना आवडले नाहीत. त्यांनी या बुरसटलेल्या धर्मास विरोध केला, परंतु त्यांच्या जवळ धर्माचे नवे रूप नव्हते. या नवागत ज्यू लोकांपासून आपल्या मूर्तींना व धार्मिक आचारांना धक्का पोचू नये म्हणून इजिप्तच्या राज्यसत्तेने सर्व ज्यू लोकांना गुलाम करून टाकले. मोठमोठ्या इमारतींच्या कामावर त्यांना जुंपले. जनावरांप्रमाणे त्यांना मारहाण होई. अत्यंत विपत्तीत व कष्टात ज्यू लोक इजिप्तमध्ये जीवन जगत होते.

तरी हेब्र लोकांची गुप्तपणे कारस्थाने चालत. त्यामुळे आणखी कठोर नियम करणे अगत्याचे झाले. हेब्र जमातीत जे मुलगे जन्मास येतील त्यांना पाण्यात बुडवावे म्हणजे पुढचे सर्व हेब्र पुरुष नष्ट होतील व मुली इजिप्तमधील पुरुषांबरोबर लग्न करतील. म्हणजे बंडखोरीचे संकटच दूर होईल. या भयानक नियमामुळे अनेक हेब्र आईबापांना आपले मुलगे पाण्यात सोडून द्यावे लागले. अशाच एका हेब्र कुटुंबात मोझेसचा जन्म झाला. आता या मुलास पाण्यात बुडवावे लागणार या विचाराने त्याची आई फारच कष्टी झाली. तिने आपल्या लहानग्या पोरास टोपलीत निजवले व अलगदपणे ती टोपली पाण्याच्या प्रवाहात सोडून दिली. योगायोगाची गोष्ट अशी की, इजिप्तच्या राजकन्येच्या नजरेस ही टोपली व तीमधील सुंदर बालमूर्ती पडली. या गोजिरवाण्या बालकाच्या दर्शनाने राजकन्या संतुष्ट झाली. तिने या पोराचा संभाळ केला. दैवयोगाने एक हेब्र पोरगा राजाश्रयानेच इजिप्तमध्ये वाढीस लागला. इजिप्तचा राजपुत्र म्हणूनच काही दिवस लोक यास ओळखत असत. या पोरास प्रथमपासूनच धर्मविचारांची आवड होती. इजिप्तच्या वतीने तो काही प्रसंगी लढाई करण्यासाठी गेला असला तरी तसल्या शौर्यात त्याला स्वारस्य वाटेना. त्याने व्यायाम करून चांगली शरीरसंपदा संपादन केली. अनेक पंडितांजवळ धर्मतत्त्वांचा सूक्ष्म अभ्यास केला.

पण या इजिप्तच्या राजपुत्राचे ज्यू रक्त त्याला स्वस्थ बसू देईना. त्याला ऐश्वर्याचा व ऐहिक वैभवाचा लौकरच तिटकारा आला. तो खालच्या पातळीवर असणाऱ्या सर्वसामान्य लोकांत मिसळू लागला. त्यांची दुःखे पाहून त्याचे मन विरघळले. त्यांच्या गुलामी जीवनातील यातना पाहून त्याचे चित्त व्यथित झाले. त्यांचे काबाडकष्ट पाहून तो कष्टी झाला. त्यांच्या पाठीवर बसणारे चाबकाचे फटकारे पाहून तो अस्वस्थ झाला. इजिप्तच्या वैभवात भर घालणाऱ्या इमारतीसाठी विटा घालणाऱ्या गुलाम मजुरांत तो मिसळू लागला. साध्या विटा घालणारे हे गुलाम मजूर आपल्या वैभवाची, गतऐश्वर्याची भाषा बोलतात हे पाहून त्यास नवल वाटले. विटेवर वीट रचून इमारत बांधणारे हे गुलाम साम्राज्य उभारण्याचे बेत करतात हे पाहून तो विचलित झाला. या गुलाम मजुरांनी या राजपुत्रास आपल्या ऐतिहासिक वैभवाच्या कथा ऐकविल्या. पिता अब्राहमची कथा त्यांनी त्याला सांगितली. स्वतःच्या देशात दुधा-मधाच्या नद्या कशा वाहतात याची सुरस कहाणी ऐकविली. आपण त्याच देशाचे कमनशिबी ज्यू. आपण दुर्दैवामुळे इजिप्तमध्ये अडकून राहिलो. अशी मनाची तळमळ त्यांनी या तरुण व उमद्या मोझेसच्या समोर व्यक्त केली.

या कष्टी मजुरांच्या वा गुलामांच्या मनोव्यथा ऐकून मोझेस अंतर्मुख बनला. तो पुन्हा पुन्हा त्यांच्या भेटीसाठी येई. त्यांच्याशी सुखदुःखाच्या गोष्टी करी. त्याचे रक्त अजाणता त्यांच्याशी नाते जडवीत होते. या असभ्य, असंस्कृत व कलाहीन लोकांबरोबर फार न राहण्याचा उपदेश इजिप्तच्या राजाने केला. पण मोझेसला तो मानवला नाही.

एके दिवशी मोझेस आपल्या ज्यू मित्रांचे काम पाहत उभा असताना एक चमत्कारिक घटना घडली. काबाडकष्ट करणाऱ्या एका गुलामास एक

इजिप्शियन अधिकारी निर्दयपणे पाठीवर चाबकाचे फटकारे देत होता! तो विचारा दर फटक्यासरशी कळवळून ओरडत होता. त्याचे कळवळणे मंद होई व माराचे फटके वाढत. असे हे क्रौर्य पाहून मोझेसचे तरुण रक्त उसळून आले. तो त्या जुलमी अधिकाऱ्याच्या अंगावर धावून गेला. त्याने त्याचा त्याच क्षणी वध केला! इजिप्तच्या इतिहासात ही भयानक घडना घटली होती! गुलाम ज्यू लोकांसाठी एका इजिप्तच्या अधिकाऱ्याचा खून? आता आपणांसही जबर शिक्षा होणार या जाणीवेने मोझेस शेजारच्या हद्दीवरील वाळवंटात पळून गेला!

येथून मोझेसच्या आयुष्यास निराळे वळण लागले. राजवाड्यामधील ऐश्वर्य संपले. दीन, दरिद्री व भटक्या लोकांच्या संगतीत इजिप्तचा हा 'राजपुत्र' एक नवे शिक्षण घेत होता. सर्वसामान्य माणसांचे दुःखी व कष्टी जीवन निरखून पाहत होता. येथे त्याचे मन मुक्तपणे दशदिशांना संचार करू लागले. रात्री आकाशात लुकलुकणाऱ्या तारका पाहून त्याचे चित्त स्फुरित होत राहिले. विविध प्रकारचे चमत्कारिक प्राणी देव म्हणून मानण्यापेक्षा या जगाचा काही वेगळा विचार त्याच्या मनात स्थिर झाला. वाळवंटात त्याची दृष्टी अमर्यादपणे सर्वत्र संचार करी. निर्जनता, भयाणता, वाळूची वादळे यांनी त्याचे मन चिंतनशील बनले. स्वतःच्या आवाजाचा वाळवंटातील प्रतिध्वनी त्याला स्फुरण देत राहिला. रणरणत्या उन्हात तप्त सूर्याच्या किरणांनी झाडे-झुडपेही ज्वालांच्या मुखात सापडल्याचा भास त्याला होई.

याच ओसाड वाळवंटात मोझेसला एक नवा देव सापडला. भयाण निर्जनता, प्रखर उष्णता, क्वचित ठिकाणी दिसणारी झाडे-झुडपे यांच्या सान्निध्यात मोझेसने एका नव्या देवाचा शोध घेतला. नाना प्राण्यांच्या मूर्तीपेक्षा याचे स्वरूप अधिक उदात्त स्वरूपाचे होते. अमर्यादपणे पसरणाऱ्या वाळवंटाप्रमाणे त्याची कल्पनाशक्ती पल्लवित होई. स्थिर व

स्तब्ध अशा वातावरणात त्याचे मनही शांत झाले. बेदोइनच्या एका प्रमुखाच्या मुलीशी मोझेसने लग्न केले. याचा संसार वाळवंटाच्या प्रखर जीवनाशी समरस होत सुरू झाला.

पण वरवर शांत दिसणाऱ्या या मोझेसच्या चित्तात एक चिंता सतत सलत होती. इजिप्तमध्ये गुलाम म्हणून भयानक आयुष्य कंठणाऱ्या ज्यू लोकांची आठवण त्याला वारंवार होई. आपल्या बेदोइन बांधवांना मोझेस ज्यूंच्या अपेष्टांची व कष्टांची वर्णने सांगत असे. इजिप्तमधील हेब्रू हेही या बेदोइन लोकांचे भाऊबंद असल्याने त्यांना या कथा ऐकून अतिशय वाईट वाटे. तेही अब्राहमपासूनच धर्मविचाराची परंपरा घेणार होते.

मोझेसच्या मनात येई, इजिप्तमधील ज्यू लोकांची मुक्तता आपणच का करू नये ? त्यांना त्यांच्या मायभूमीकडे आपणच का घेऊन जाऊ नये ? ज्यूंची मुक्तता करावी, त्यांना नवा धर्म द्यावा, त्यांची संघटना करावी या विचारांनी मोझेस अस्वस्थ झाला. याच सुमारास इजिप्तचा राजा मरण पावला व नवा राजा सिंहासनावर आला, ही माहिती फिरत्या अरबांकडून मोझेसला समजली. आणि निश्चय करून मोझेस प्रकटपणे इजिप्तमध्ये आला. हेब्रू गुलामांच्यांत मिसळून त्याने बंडाळ्यास प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. या गुलामांनी आता विटा घालण्याचे, दगड फोडण्याचे, इमारती बांधण्याचे काम सोडून मायभूमीसाठी स्वातंत्र्यासाठी उत्सुक व्हावे म्हणून त्यांची हालचाल सुरू झाली.

एके दिवशी मोझेस निर्भयपणे राजवाड्यात शिरला व बेधडकपणे नव्या राजास म्हणाला, " सरकार, आपल्या राज्यातील ज्यू गुलामांची सुटका करावी आपण. फार हाल होतात त्यांचे. मारहाणही फार होते त्यांना....जनावरांप्रमाणे त्यांना..."

" तू आहेस कोण ? कोणत्या अधिकारात तू इथे आलास ? "

मराठी ... शाखा.
अनुक्रमांक
क्रमांक ... नोंद दि. ...


" मी माझ्या ईश्वराच्या प्रेरणेने येथे आलो आहे. मी मोझेस."

" तुझा देव तरी कसला आहे? त्याने किती दिवस राज्य केले? त्याने किती राज्ये जिंकली? किती शहरांना बेचिराख केले?"

" माझा ईश्वर अशा प्रकारचा नाही. हे सर्व जग निर्माण होण्यापूर्वीपासूनच तो होता. हे जग नष्ट झाले तरी तो राहील. प्रेम, दया, कृपा ही माझ्या देवाची भूषणे आहेत. पण अन्यायाच्या, जुलमाच्या विरुद्ध मात्र तो झगडतो."

या भ्रमिष्ट मोझेसचे हे नवे विचार प्रथम कुणासच उमजेनात. पशुपक्ष्यांच्या प्रतिमा देव म्हणून पूजणाऱ्या पंडितांना या नव्या देवाचे भव्य दर्शन समजले नाही. नव्या राजासही ही वृथा बाष्कळपणाने बडबड वाटली. त्याने मोझेसचे ऐकले नाही. ज्यू गुलामांच्या विरुद्ध त्याने अधिकच कडक कायदे केले. नेहमीपेक्षा दुप्पट काम व्हावे असे फर्मान त्याने काढले. जर विटा कमी पडल्या तर गुलामांनी आपली लहान पोरे भिंतींत चिणून काम पूर्ण करावे अशा हुकुमापर्यंत मजल गेली. यामुळे मोझेसचा देव फार रागावला. इजिप्तमध्ये अनेक प्रकारची रोगराई पसरली. माणसे पटापट मरण पावू लागली. याचा फायदा मोझेसने घेतला. त्याने ज्यू गुलामांची सेवाशुश्रूषा चांगली केली. त्यांच्यांत मुक्ततेचे, स्वातंत्र्याच्या प्राप्तीचे प्रेम निर्माण करण्यात त्याला यश आले. सर्व ज्यू गुलाम एकत्र झाले. मोझेस त्यांचा पुढारी झाला.

आणि एके दिवशी सर्व ज्यू मोझेससह इजिप्त सोडून आपल्या मायदेशास निघाले. इजिप्तच्या राजास राग आला. या लोकांच्या श्रमावर तर इजिप्तचे वैभव उभे होते. त्याने मोठे सैन्य या गुलामांना परत आणण्यासाठी पाठविले. तांबड्या समुद्राच्या तीरावर तर एक चमत्कारच झाला. स्वातंत्र्याच्या लालसेने, तीव्र अशा इच्छाशक्तीने सर्व ज्यू

समुद्र पार करून गेले. समुद्राने त्यांना मायदेशाची वाट करून दिली. आणि त्याच समुद्रात इजिप्तचे हजारो सैनिक पाण्यात बुडून मरण पावले.

मोझेसचे एक स्वप्न आकारास आले. इजिप्तच्या जुलमी पाशातून ज्यू लोक मुक्त झाले. पण स्वातंत्र्य प्राप्त होताच माणसे बेताल होतात. पशूंप्रमाणे वागतात, व्यसनांत गर्क होतात हेही त्याच्या अनुभवास आले. मुक्त झालेल्या ज्यू लोकांना एक नवा धर्म द्यायला हवा, आचाराची एक नवी संहिता तयार व्हावयास हवी, साध्या व पवित्र जीवनाचा मार्ग त्यांना दाखविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य व्हावयास हवे, हे मोझेसला पटले. अत्यंत विस्कळित झालेल्या व पूर्वपरंपरांशी संबंध नसलेल्या रानटी लोकांना ' माणसांत ' आणण्याचे काम सोपे नव्हते. या पशुतुल्य लोकांना नव्या नीतीचे व आचारधर्मांचे पाठ देण्यासाठी मोझेसला एकान्तवासाची जरूरी होती. यासाठी त्याने शेजारी असलेला सिनाई पर्वत निवडला. त्याची उंच असणारी पाच शिखरे जणू मोझेसला मूकपणे आमंत्रणच देत होती. पर्वतावर जाऊन मोझेसने ईश्वराची प्रार्थना केली. शांत चित्ताने त्याची करुणा भाकली. चाळीस दिवसपर्यंत मोझेसची तपश्चर्या चालू होती. याहीपूर्वी तो अनेकदा या पर्वतावर येऊन परमेश्वराची चाहूल अनुभवीत असे. पण आज त्याला माणसास उपयुक्त होईल अशी आचारसंहिता हवी होती. जळत्या झुडपातून त्याला अनेकदा महत्त्वाचे संदेशही प्राप्त झाले होते. याच पवित्र स्थानापासून आपणांस नवी आचारसंहिता प्राप्त होईल अशी त्याची निष्ठा होती. त्याच्या या निष्ठेस अनुसरून एके दिवशी एका प्रज्वलित स्थानापासून त्याला परमेश्वरकृत ' दहा आज्ञा ' प्राप्त झाल्या. त्याचा हेतू सफल झाला.

मानवी वर्तनासाठी ' दहा आज्ञा ' घेऊन मोझेस सिनाई पर्वत उतरत

होता. तो त्याला मुक्त झालेल्या ज्यूंची पाशवी लीला पाहायला मिळाली. ते आनंदात, व्यसनात, ख्यालीखुशालीत दंग होते. भयानक पशूंच्या प्रतिमांचे पूजन त्यांनी चालू केले होते. या सर्वसामान्य लोकांना परमेश्वराच्या आज्ञा झेपतील की नाही, अशी एक शंका त्याच्या मनात येऊन गेली. त्याला थोडा रागही आला. या लोकांच्या मुक्ततेसाठी केवढे साहस त्याने केले होते! आणि हे पुनः पशूसारखे वर्तन करतात. मोझेसने सर्व परिस्थिती जाणली व याही माणसांना पेलतील अशा परमेश्वरकृत आज्ञा त्यांच्या स्वाधीन केल्या. त्यांच्यांत समाजव्यवस्था व नीतिधर्म नव्याने निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मानवी प्रगतीच्या व संस्कृतीच्या इतिहासप्रसिद्ध असणाऱ्या या दहा आज्ञा अशा आहेत :

१. माझ्याशिवाय दुसरा देव तू मानू नकोस.

२. माझी कसलीही प्रतिमा तू करू नकोस.

३. परमेश्वराचे नाव मनात नसताना तू वृथा घेऊ नकोस.

४. सहा दिवस काम केल्यावर सातव्या दिवशी विश्रांती घे. तो दिवस पवित्र मान.

५. आईबापांचा नीट मान राख.

६. कुणाचीही हत्या करू नकोस.

७. व्यभिचार कधीही करू नकोस.

८. चोरी कधी करू नकोस.

९. खोटी शपथ घेऊ नये; खोटी साक्ष देऊ नये.

१०. शेजाऱ्याचे घर, त्याची बायको, त्याची वस्तू यांचा लोभ धरू नकोस.

अशा या दहा आज्ञा मोझेसने मानवाच्या हितार्थ व प्रगतीसाठी

ईश्वराकडून प्राप्त करून घेतल्या. या आज्ञा माणसास किती रुचल्या, किती आवडल्या, त्याने त्यांचे आचरण किती केले हे सर्व प्रश्न महत्त्वाचे आहेत. प्रत्येक धर्मतत्त्वांचा उद्देश फार मोठा, त्यांचा प्रवर्तक फार मोठा असतो; पण कालांतराने सर्वच संपल्यासारखे होते. पुनः मनुष्य पशूसारखे वर्तन करू लागतो. त्याला पुनः पुनः वठणीवर आणण्यासाठी वारंवार धर्मवीर निर्माण व्हावे लागतात.

यासंबंधीची मोझेसचीच एक कथा सांगण्यात येते. सिनाई पर्वतावर जेव्हा मोझेसला परमेश्वर प्रकाशमान होऊन ' दहा आज्ञा ' देऊ लागला तेव्हा त्याच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. मोझेसला याचे भारी नवल वाटून त्याने कारण विचारले,

" देवा, तुझ्या डोळ्यांत अश्रू? एवढ्या आनंदाच्या प्रसंगी तू दुःखी? "

" मोझेस, मी या आज्ञा माणसासाठी तुझ्या स्वाधीन करीत आहे. पण लाडक्या मुला, या माझ्या आज्ञांचे मनुष्यजात काय करील ते मला चांगले दिसते आहे. या आज्ञांतून शहाणपण व शांततामय जीवन मूर्ख मानवजात शिकेल असे वाटत नाही. "

मोझेसला ईश्वराचे हे भाकीत स्वतःच्या आयुष्यातच समजले. ज्यांना त्याने स्वातंत्र्य प्राप्त करून दिले त्यांना त्याची फारशी किंमत नव्हती. अनेकांना पूर्वीची गुलामगिरी सवयीने सुखदायक वाटली. नवी जबाबदारी घ्यायला कुणी उत्सुक नव्हते. काही जण मायभूमीकडे डोळे लावून वाट बघत होते, तर काहींचे लक्ष परत गुलामगिरीकडे वळले होते. काहींना स्वातंत्र्याची चवच माहीत नव्हती. आणि नवलाची बाब अशी की, ज्याने त्यांना मुक्त केले त्याच्या विरुद्धच काहींनी कट केला. त्यांना एवढ्या तोलाचा पुढारी नको होता. परंतु या सर्व संकटांना मोझेसने धीराने तोंड दिले आणि ज्यू लोकांना त्यांच्या मायदेशापर्यंत त्याने नेऊन सोडले.

मोझेसचे स्वप्न सत्यसृष्टीत आले होते. अत्यंत चिवटपणे जगणारे व पुनः पुनः नव्या दमाने प्रभाव गाजविणारे एक नवे राष्ट्र जन्मास घालून मोझेसने कृतकृत्य अवस्थेत या जगाचा निरोप घेतला. ख्रिस्त शकापूर्वी सुमारे १५०० वर्षे निर्माण झालेले ज्यूंचे मोझेसप्रणीत हे राष्ट्र आज नव्या दमाने आश्चर्यकारक प्रगती करीत आहे.

* * *



ख्रिस्तपूर्व सातवे शतक

## ३ : झरतुष्ट्र

पारशी लोकांच्या धर्माचा संस्थापक झरतुष्ट्र. इंडोयुरोपियन अथवा आर्य-भारतीय मानववंशाच्या एका शाखेने इराणमध्ये वसती केली. ख्रि. पू. ६६० या वर्षी कॅस्पियन समुद्राच्या पश्चिमेस असलेल्या आझरबैजान

या शहरात झरतुष्ट्राचा जन्म झाला. याच्या वडिलांचे नाव पौरुशस्य व आईचे नाव दुग्धोवा असून पाच मुलांपैकी झरतुष्ट्र हा मधला होता. याच्या जन्माबरोबर त्या वेळच्या धर्मप्रमुखांना एकाएकी भीतीने कंप सुटला. हा पोरगा नव्याने धर्मस्थापना करून आपली मिरासदारी कमी करणार, आपले वर्चस्व नाहीसे करणार, या शंकेने ते व्यथित झाले. त्यांनी झरतुष्ट्राला लहानपणीच मारण्याचा बेत केला. यासाठी अनेक प्रयत्न झाले. शेवटी देवालयातील अग्निकुंडातही टाकण्याचा प्रयत्न झाला. आपले पोर आता जळून जाणार या भीतीने दुग्धोवा घाबरत घाबरत अग्निकुंडापाशी गेली, तेव्हा मुलगा ऊन पाण्यात, मूल आनंदाने खेळावे तशा प्रकारे संतोषाने वागडत असलेला तिला दिसला. या पोराचे रक्षण कसे करावे अशी चिंता जिच्या मनात होती, तिला हे दैवी उत्तर म्हणावे लागेल.

झरतुष्ट्रास लहानपणापासून परोपकाराची सवय होती. बापाच्या संपत्तीपैकी फक्त कमरेस बांधायची मेखला त्याने पसंत केली. पारशी लोकांच्या कमरेचा पट्टा आजही तिची आठवण करून देतो. त्याला जनावरांबद्दल नेहमी दया वाटे. धर्माच्या शिक्षणाबरोबर झरतुष्ट्राने शेतीवरच्या कामाचेही शिक्षण घेतले. जनावरांची वाढ कशी करावी, त्यांची निगा कशी राखावी, त्यांच्यांवर प्रेम कसे करावे, या गोष्टींत तो तत्पर होता. दुष्काळ आला की तो गोरगरिबांना अन्न वाटण्यात पुढाकार घेई. आपल्या पाच पिल्लांसह एक कुत्री मरणाच्या पंथास लागली होती. तिला व तिच्या पिलांना वाचविण्यासाठी काही खायला आणावे म्हणून झरतुष्ट्र उद्योगास लागला. भाकरीचे तुकडे घेऊन येतो तो ती कुत्री पाच पिलांसह मरण पावलेली त्याने पाहिली. या करुण प्रसंगाचा त्याच्या मनावर तीव्रतेने परिणाम झाला. याच वृत्तीतून त्याने अनाथांची सेवा मनापासून केली.

वयात येताच झरतुष्ट्राचे लग्न झाले, पण त्याचे चित्त संसारात रमेना. या जगात एवढे दुःख का ? चांगल्या लोकांनाच एवढे दुःख का सहन करावे लागते ? हे दुःख नाहीसे करता येईल का ? अशा विचारांत तो नेहमी मग्न असे. बाहेरच्या गलबल्यात व गर्दीत आपले मन एकाग्र होईल असे त्यास वाटेना. तेव्हा एके दिवशी झरतुष्ट्राने आपल्या बायकोस सांगितले,

" मी आता दूर कुठे तरी एकान्तात जाणार आहे. जगातील दुःखाचे मूळ मला शोधायचे आहे. चांगल्या–वाइटाचे स्वरूप मुळापासून तपासायचे आहे. मी आता दूर पर्वतावर जाऊन एकचित्ताने उपासना करणार आहे. "

बायकोला हा विचार पसंत नव्हता. त्याचे महत्त्वही तिच्या ध्यानात आले नाही. पण इतर विचार न करता झरतुष्ट्र एका पर्वतावरील गुहेत ठाण मांडून चिंतनात मग्न झाला. त्याच्या मनावर प्रथम निराशेची दाट छाया होती. तुराणी लोक इराणवर वारंवार स्वाऱ्या करून लोकांना त्रस्त करीत असल्याने त्याचे मन कष्टी झाले होते. लोक अंधश्रद्धेत बुडून गेले होते. भलभलत्या आचारांचे स्तोम माजले होते. अज्ञानाचा अंधार सर्वत्र पसरला होता. सर्वत्र दुःख, दैन्य, आपत्ती, निराशा यांचेच साम्राज्य त्याला दिसत होते. झरतुष्ट्राच्या मनास पर्वतावरील गुहेत अशी जाण आली की, हे दुःख, ही आपत्ती, हे अज्ञान एका दुष्ट प्रवृत्तीची ही सारी फळे असावीत. एक प्रकारच्या सैतानी प्रवृत्तीने साऱ्या जगास कवटाळले असावे. असत्य, संशय, दुःख यांचा अग्रणी म्हणजे हा सैतान. हाच चांगल्या लोकांना छळतो, कष्ट देतो. या दुष्ट सैतानास मी कधीच हार जाणार नाही, असा त्याने निश्चय केला. या जगात त्याने दोन तत्त्वे मानली. एक कल्याणकारक, शुभदर्शक, प्रकाशमान तत्त्व व दुसरे अपायकारक, अशुभदर्शक, अंधकारमय तत्त्व. या दोहोंचा झगडा सतत होत राहतो.

प्रकाशतत्त्वास यामुळे नेहमीच त्रास होतो, परंतु आपण या शुभदर्शक प्रकाशतत्त्वाची उपासना करायला हवी.

आपण या प्रकाशरूपी परमेश्वराला शरण जायला हवे. सत्य व प्रकाश यांच्या या कल्याणकारक देवाचे नाव अहुरमझ्द असे त्याने मानले. जे वाईट आहे, अज्ञानजन्य आहे, अपायकारक व अंधकारग्रस्त आहे, त्यास त्याने अंग्रमन्यू असे नाव दिले. याच अंग्रमन्यूचे तामसी दूत चांगल्या लोकांवर संकटे आणतात, शेतीवरची गुरे पळवितात, तुराणी लोकांना स्वारीसाठी बोलावितात. तेव्हा या असुरांच्या तावडीत आपण सापडता कामा नये. सत्य व प्रकाश यांचा देव अहुरमझ्द हा अंग्रमन्यू व त्याचे दूत यांचा पूर्ण पराभव करण्यास समर्थ आहे. हा एक विलक्षण आत्मविश्वास झरतुष्ट्राच्या मनात निर्माण झाला.

झरतुष्ट्रास झालेल्या या नव्या जाणीवेस दैवी साक्षात्काराचे पाठबळही मिळाले. त्यामुळे त्याचा लौकिक वाढत चालला. ख्रि. पू. ६३० या वर्षी मे महिन्याच्या पाचव्या तारखेची ही हकीकत. पवित्र दैती नदीच्या काठी झरतुष्ट्र शांतपणे उभा होता. त्याच्या हातांत नदीचे पवित्र पाणी होते. याच वेळी दक्षिणेकडून हातात एक उज्ज्वल दंड घेतलेली आकृती येताना त्याला दिसली. या आकृतीचा आकार माणसापेक्षा नऊ पटींनी मोठा होता. झरतुष्ट्राने या विशाल आकृतीस वंदन केले. ही भव्य आकृती म्हणजे देवदूत वोहुमाना होती. या देवदूताच्या सूचनेवरून झरतुष्ट्राने आपला जड देह सोडून आत्मतत्त्वाने तो वोहुमानाबरोबर अहुरमझ्द व त्याचे पवित्र दूत यांच्या मंदिरात गेला. ईश्वराच्या सांनिध्यात त्याच्या मनास अलौकिक सुख झाले, पण चालताना आपली सावली का पडत नाही, अशी एक शंका त्याच्या मनात येऊन गेली. मग त्याचे त्यासच उमगले की, आपण आपले शरीर दैती नदीच्या काठीच ठेविले आहे. आपल्या आत्मतत्त्वाची सावली कशी पडणार? अहुरमझ्दाने खऱ्या

धर्मतत्त्वांचा उपदेश झरतुष्ट्राला या वेळी केला. धर्माचे रहस्य त्याच्या ध्यानात आले. मग त्याने परत नदीकाठी येऊन आपले शरीर धारण केले.

आता अहुरमझ्दाच्या प्रेरणेने एका नव्या धर्मतत्त्वाचा प्रचार करण्यास झरतुष्ट्र सिद्ध झाला. प्रकाश, ज्ञान, सत्य यांचा देव अहुरमझ्द याचाच विजय नेहमी होणार असल्याचे त्याने सांगितले. असत्य, कष्ट-दायक, अंधकारमय अशा दैत्याचा त्याग करावा, त्या पापी वृत्तीचा संपर्कही नसावा, अशा प्रकारचा एक नवाच धर्म तो सांगे, पण पिढ्यान् पिढ्या जुने विचार त्यांच्या मनांवर रुजले होते; त्यामुळे झरतुष्ट्राचे म्हणणे लोकांना नीट समजेना. लोकांनी त्याचा उपहासही केला. अफगाणिस्तान, बलुचिस्तान इत्यादी देशांत हिंडूनही त्याने लोकांना आपले विचार सांगितले; पण त्याच्या मतांना फारसे अनुयायी मिळाले नाहीत. आपले मत लोकांना कसे पटवावे या विचारात तो नेहमी मग्न राहिला. दैती नदीच्या पवित्र जलाचा औषधासारखा उपयोग करून त्याने पाहिला. जवळच्या नातेवाइकांशीच लग्न करण्याचा उपदेश त्याने केला.

मधून मधून झरतुष्ट्रास दिव्य दर्शने होत असत. ज्ञानाच्या व प्रकाशाच्या आणखी निरनिराळ्या अवस्था त्याला समजून येत. सैतानी वृत्तीचा नाश कसा करता येईल यासंबंधी त्याला जाणीव येई. अनेक देवदूत त्याला ज्ञानाचे वेगवेगळे प्रकार अनुभवास आणून देत. उदात्त विचार ( वोहुमना ) याने त्याला जनावरांची काळजी कशी घ्यावी हे शिकविले. आशा किंवा सद्वर्तनाने त्याला अग्नीची उपासना करण्यास सांगितले. सामर्थ्याने त्याला खनिज धातूंचे ज्ञान करून दिले. अरमैती अथवा पावित्र्य याने निरनिराळ्या प्रदेशांच्या सीमांचे ज्ञान प्राप्त करून

दिले. आरोग्याच्या देवदूताने झरतुष्ट्राला पाण्याचे गुणधर्म शिकविले. अमृतत्त्वाने वनस्पतींचे उपयोग त्याला समजावून दिले.

अशा प्रकारे झरतुष्ट्र जीवनाच्या विविध अंगांनी परिपुष्ट होत होता. त्याच्या चिंतनास आध्यात्मिक व व्यावहारिक जोड मिळत होती. जगातील चांगले व वाईट यांची निवड करून चांगल्याचा प्रसार अधिक कसा होईल यासंबंधी तो उत्कंठित असे. मधून मधून त्याच्या मनास अनुयायी न मिळाल्यामुळे निराशेची काळोखी येई. अंग्रमन्यूचे कपटी दूत त्याच्या भोवती वेढा देत. शुभकारक अशा प्रकाशमय रस्त्यावरून धावणाऱ्या त्याच्या मनास मागे खेचीत.

एके दिवशी सैतान अंग्रमन्यू त्याच्या जवळ आला व म्हणाला,

" तू मला का मिळत नाहीस ? तुझी आई, तुझा बाप मलाच देव मानीत. "

" पण मी तुझ्या नादी लागणार नाही. " झरतुष्ट्राने निग्रहाने उत्तर दिले.

" मग तू काय करणार ? तुला यश तरी कसे मिळणार ? "

" मी माझ्या स्वतःच्या सामर्थ्याने प्रकाश व सत्य या देवाची उपासना करीन व नक्की यशस्वी होईन. मला तुझा मोह कधीच होणार नाही. "

झरतुष्ट्राच्या या आत्मविश्वासाच्या उत्तराने सैतानवृत्तीचा दैत्य पराभूत झाला. त्याचे या खंबीर मनाच्या श्रेष्ठ पुरुषापुढे काही चालले नाही. पण अगदी नवा विचार सांगणाऱ्या या झरतुष्ट्रास अनुयायी कसे मिळणार ? कोण याचे विचार समजावून घेणार ? त्याचा एक नातेवाईक मेत्योमा त्याचा पहिला अनुयायी झाला व त्याची धर्मतत्त्वे त्याने स्वीकारली. आणखी अनुयायी मिळावेत म्हणून त्याचा प्रयत्न होता.

सर्वसामान्य लोकांना आपली धर्मतत्त्वे समजत नाहीत. तेव्हा अधिक शहाणा व अधिक विचारी असा राजा विश्तष्प याच्याकडे तो निघाला. राजा-राणीने तरी आपले विचार ऐकावेत असे त्याला वाटले. इराणच्या पूर्व दिशेचा विश्तष्प हा एक मोठा राजा होता. पण त्याच्या देशात जुन्या धर्माचे महत्त्व फार होते. अंधश्रद्धा, वेडगळ कर्मकांड, जादुटोणा यांचेच प्राबल्य तेथे असल्याने झरतुष्ट्राच्या नव्या विचारांचा प्रवेश होणे कठीणच होते. झरतुष्ट्र राजाच्या भव्य वाड्यापाशी येऊन उभा राहिला. या अनोळखी माणसास कोण आत सोडणार ? दारावरील रखवाल-दाराने त्यास अडविले. या वेळी स्वतःच्या हातावर एक जळता गोल धरून झरतुष्ट्राने त्या पाहरेकऱ्यास आपले सामर्थ्य दाखविले. तेव्हा या दैवी पुरुषाची त्यास प्रचीती येऊन त्याने त्याला आत नेण्याची तयारी केली.

राजाने झरतुष्ट्राची विचारपूस केली. त्याचे नवे विचार समजावून घेण्यासाठी राजाने आपल्या राज्यातील मोठमोठ्या विद्वानांची व पंडितांची सभा भरविली. झरतुष्ट्राने या सभेत आपले विचार सांगण्यास सुरुवात केली.

" अहुरमझ्द हा खरा देव आहे. जगात जे चांगले आहे ते यानेच निर्माण केले. आणि जे वाईट आहे ते अंग्रमन्यू नावाच्या दैत्याने तयार केले. शेवटी सत्याचा, चांगल्याचा, प्रकाशमय ज्ञानाचा विजय होणार असल्याने आपण अहुरमझ्दासच देव मानावे. भूत, वर्तमान आणि भविष्य या तीनही काळांवर या देवाची सत्ता असते. तमोगुणी अंग्रमन्यू मात्र वर्तमानकाळातच वावरतो. त्याचा विजय क्षणिक झालेला दिसतो. म्हणून माणसाने या सैतानी वृत्तीचा त्याग करून नेहमी सद्‌विचार, सदाचार, चांगले उच्चार यांच्याच मार्गाने चालावे. सत्य हे चांगले, असत्य वाईट, जो संकटात असेल त्याला मदत करावी,

जमिनीची मशागत उत्तम करावी, अनेक ठिकाणी वृक्ष लावावेत, मुक्या प्राण्यांवर दया करावी, दुःखितांची सेवा करावी...."

चांगल्या आचारविचारांवर असलेला झरतुष्ट्राचा हा नवा धर्म शहाण्या लोकांना व राजाला पटू लागला. त्याचे अनुयायी वाढत राहिले, परंतु आपला पुरातन धर्म बुडत चालला असे पाहून कर्मठ सनातन्यांनी झरतुष्ट्राला छळायला सुरुवात केली. हा नवविचार सांगणारा चेटक्या आहे, मंत्रतंत्र जाणणारा आहे, याच्या नादी कुणी लागू नये म्हणून त्यांनी झरतुष्ट्राविरुद्ध प्रचार केला. पण या वेळी झरतुष्ट्राकडे यश धावत येत राहिले. यास एक निमित्त झाले. राजाचा एक आवडता घोडा एकाएकी आजारी झाला. दरबारातील अनेक लोकांनी औषधांचे व मंत्रतंत्रांचे प्रयोग केले, पण कुणासच यश मिळाले नाही. शेवटी झर-तुष्ट्राने आपल्या दैवी सामर्थ्याने व औषधोपचारांनी घोड्याचा रोग नाहीसा केला. राजाचा घोडा पूर्णपणे बरा झाला. राजा व त्याचा परिवार यांनी झरतुष्ट्राचा नवा धर्म स्वीकारला. इराणात झरतुष्ट्राच्या धर्माचा प्रसार होत राहिला. ग्रीसपासून हिंदुस्थानाच्या सीमेपर्यंत झरतुष्ट्राचे अनुयायी आता दिसू लागले.

तुराणी लोकांचे इराणशी पूर्वीपासूनच वैर होते. त्यांनी मात्र झर-तुष्ट्राचा धर्म स्वीकारला नाही. दोन देशांत यासाठी धर्मयुद्ध सुरू झाले. यात इराणच्या लोकांना विजय मिळाला; पण त्यांना आपला धर्मदूत झरतुष्ट्र गमवावा लागला. याच धामधुमीत झरतुष्ट्र आपल्या ऐंशी अनुयायांबरोबर एका मंदिरात स्तब्धपणे प्रार्थना करीत होता. अग्निदेव-तेच्या चिंतनात असतानाच शहरावर तुराणी लोकांनी स्वारी केली. सर्वत्र एकच धांदल उडाली. रक्ताचे पाट वाहू लागले. कत्तली सुरू झाल्या. इराणच्या राजाच्या प्रेरणेवरून झरतुष्ट्राच्या वचनांचा एक संग्रह **अवेस्ता** या नावाने तयार झाला होता. हा धर्मग्रंथ शत्रूने जाळून

टाकण्याचा प्रयत्न केला; मंदिराचा विध्वंस करण्यात आला. झरतुष्ट्रा-बरोबरच्या अनुयायांना शत्रूने तरवारीच्या वारासरशी यमलोकी पाठविले. झरतुष्ट्र डोळे मिटून प्रार्थना करीत असताना दुष्टांनी त्याच्या पाठीत खंजीर खुपसला, आणि या श्रेष्ठ धर्मप्रवर्तकांचा शोचनीय अंत घडवून आणला. झरतुष्ट्र शेवटचा श्वास घेत असतानाच आकाशांत सप्तरंगी इंद्रधनुष्य चमकू लागले.

"या सप्तरंगी धनुष्याचा अर्थ काय ?" एकदा झरतुष्ट्राने अहुर-मझ्दाला विचारले होते. "या पृथ्वीवर ज्या सज्जनांना दुःख सहन करावे लागते, त्यांना सहानुभूती दर्शविण्यासाठी स्वर्गातील देवदूत या इंद्रधनूच्या रूपाने स्मित करतात." अहुरमझ्दाने उत्तर दिले होते.

झरतुष्ट्राच्या रक्ताचा पाट वाया गेला नाही. त्याच्या भयानक मृत्यूने प्रेरित होऊन राजाने तुराणी लोकांवर स्वारी केली. त्यांचा पराभव करून त्यांना झरतुष्ट्राचा धर्म स्वीकारण्यास भाग पाडले. चांगले विचार, चांगले आचार, दया, ज्ञान इत्यादी झरतुष्ट्राच्या धर्मतत्त्वांचा प्रसार होत राहिला, परंतु या धर्मपंथीयांना तुराणी लोक, ग्रीक लोक, मुसलमान लोक इत्यादीं-च्याकडून फार त्रास सहन करावा लागला. आक्रमक शक्तींना कसेतरी तोंड देत देत इराणच्या लोकांनी झरतुष्ट्राचा धर्म राखला. आपल्या भारतात या धर्माचे अनेक अनुयायी तेराशे-चौदाशे वर्षांपूर्वी आले. त्यांनी 'अवेस्ता' धर्मग्रंथ व झरतुष्ट्राची मते यांचा संभाळ निष्ठेने केला.

* * *



ख्रिस्तपूर्व ५६३–४८३

# ४ : गौतम बुद्ध

सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीची हकीकत !

हिमालयाच्या पायथ्याशी अनेक राज्ये होती. यांपैकी कपिलवस्तू, लुंबिनी इत्यादी गावांचा राजा शाक्य कुलातील शुद्धोदन होता. या

शाक्यांचा मुख्य धंदा शेतीचा असे. एके दिवशी धान्यपेरणीचा समारंभ सुरू होता. लोक नटून थटून सिद्ध झाले होते. सारे शहर देवनगराप्रमाणे शृंगारलेले होते. दासदासी, कामगार यांनी नवी वस्त्रे नेसून, अंगांवर गंधमालादी अलंकार घालून कामास सुरुवात केली होती. राजाच्या प्रमुख शेतीवर सुमारे हजार तरी नांगर जमा झाले होते. यांतील कित्येक नांगरांच्या दोऱ्या, बैलांची वेसणे रुप्याने मढविलेली होती. आणि राजाचा नांगर तर शंभर नंबरी सुवर्णाने मढविलेला होता. समारंभाची धामधूम सुरू होती. जो तो आपल्याच नादात गर्क होता. शुद्धोदन राजाचे वैभव वाढत होते. त्याची शेती वर्धमान होत राहिली. त्याच्या वैभवाच्या खुणा पाहून लोक चकित होत होते.

अशा या महत्त्वाच्या उत्सवप्रसंगी लहानशा बोधिसत्त्वालाही बरोबर नेले होते. हा बोधिसत्त्व खि. पू. ५६३ या वर्षी या प्रसिद्ध अशा शाक्य कुळात जन्मला. बोधिसत्त्वाची आई मायादेवी देवगृह नगरातील अंजन शाक्य व त्याची पत्नी सुलक्षणा यांची मुलगी. ही दहा महिन्यांची गरोदर असताना शुद्धोदनाने तिला तिच्या इच्छेप्रमाणे माहेरी पाठविण्याची तयारी केली. कपिलवस्तूपासून देवगृह नगरापर्यंतचा रस्ता साफसूफ केला. लतापल्लवांनी शृंगारला. आणि सुवर्णाच्या पालखीमधून ही अवघडलेली राजपत्नी माहेरास निघाली. परंतु तिच्याच्याने हा प्रवास झेपण्यासारखा नव्हता. तिला फार श्रम होत असत. आता तर प्रवासात ती अधिकच बेचैन झाली. विश्रांतीसाठी चौदा-पंधरा मैल जाताच लुंबिनी वनातच ती थोडी थांबली, आणि एका वृक्षाखाली उभी असतानाच प्रसूत झाली. बरोबरच्या लोकांची, सख्यांची एकच धांदल उडाली. मोठ्या सावधगिरीने मायादेवीस परत कपिलवस्तूस मुलासहित आणण्यात आले. शुद्धोदन राजास मुलगा झाल्याचे पाहून सर्वत्र आनंद झाला. पण हा आनंद फार दिवस टिकला नाही. मुलाच्या जन्मानंतर सातच

दिवसांत माता मायादेवी मरण पावली.

नवजात मुलाचे पालनपोषण करण्याचे काम दासदासींच्यावर आले. या मुलाचे नाव गौतम असे ठेवण्यात आले. कुणी त्याला मायादेवीपुत्र, सर्वार्थसिद्ध, सिद्धार्थकुमार असेही म्हणत. बोधिसत्त्व असेही नाव प्रचारात होते. हा बोधिसत्त्व लहान असतानाच एकदा शुद्धोदन राजाच्या कृषि-समारंभास गेला होता. त्याच्या बरोबरच्या दासींनी त्याला एका जंबुवृक्षाखाली निजविले व त्या समारंभ पाहण्यासाठी निघून गेल्या. थोड़ा एकान्त मिळताच बोधिसत्त्व अंथरुणावर उठून बसला. त्याने आसन-मांडी घातली व डोळे मिटून ध्यान करायला सुरुवात केली. अशा या ध्यानस्थ अवस्थेत तो बराच काळ होता. कृषिसमारंभ संपला. दासदासी व स्वतः शुद्धोदन राजा मुलाजवळ आले. पाहतात तो कुमार बोधिसत्त्व ध्यानात मग्न झालेला. लहान पोराचे हे साहसी कर्तृत्व पाहून सर्वांनाच धन्यता वाटली.

बोधिसत्त्वाला अशी ध्यानाची आवड लहानपणापासूनच लागली. एकान्तात जावे आणि रोजच्या सर्व चिंता दूर करून, सुखोपभोगाची साधने दूर लोटून, अंतःकरणात दृष्टी स्थिर करून ध्यानस्थ होण्यातील अद्वितीय सुखाची चटक सिद्धार्थास प्रथमपासूनच लागली होती. घरसंसारात, राज्यविस्तारात, शेतीच्या वाढीत याचे मन किती रमणार, याची शुद्धोधनाला शंकाच होती. तरी एक उपाय म्हणून शुद्धोदनाने बोधिसत्त्वाचे लग्न करून दिले. बोधिसत्त्वाच्या बायकोचे नाव यसोधरा अथवा यशोधरा असे असून गोपा अशा नावानेही ती ओळखली जात असे. यशोधरा रूपवान असल्याने ती वयात येणाऱ्या बोधिसत्त्वाचे मन लौकिक व्यवहारात गुंनवून ठेवू शकेल अशी अपेक्षा. थोड्याच अवधीत या तरुण दांपत्यास एक पुत्र झाला. त्याचे नाव राहुल. राहुलमाता म्हणून पुढे यशोधरेचा उल्लेख होत राहिला.

सुंदर व गोजिरवाणा मुलगा आणि नक्षत्रासारखी देखणी पत्नी यांचा लोभ बोधिसत्त्वास फार काळ पडेल असा रंग दिसेना. पित्याचे राज्य-वैभव आणि शेतीची वाढ यांचीही छाप त्याच्या मनावर उमटेना.

बोधिसत्त्वाचे ध्यानावरील प्रेम वाढत होते. उद्यानात जाऊन स्वस्थ चित्ताने दृष्टी नासाग्री लावून तासन् तास तो ध्यानात रममाण होई. ऐन तारुण्यातच त्यास प्रखर वैराग्य निर्माण झाले. आळार काळामा नावाच्या योगी व तत्वज्ञानी महात्म्याच्या आश्रमात जाऊन तो ध्यानाची प्रगती साधीत असे. भोवतीच्या कुठल्याच प्रसंगात त्याचे मन रमेना. माणसे स्वार्थासाठी भांडतात, मारामाऱ्या करतात, एकमेकांचा खून करतात हे पाहून बोधिसत्त्वाचे अंतःकरण व्यथित झाले. शस्त्र धारण करून हिंडणाऱ्या माणसाची त्याला घृणाच वाटे. अपुऱ्या पाण्यात मासे जसे तडफडतात तशीच अवस्था परस्परांशी भांडणाऱ्या प्रजेची पाहून तो कष्टी झाला. सर्व जग त्याला असार वाटू लागले. स्वार्थ, भांडण, मारामारी, हिंसा, रक्तपात यांसाठी का माणसाचा जन्म ? क्षुद्र लोभाने माणसाने उन्मत्त व्हावे ? अशा प्रश्नांनी तो सचिंत होई. त्याची वृत्ती अंतर्मुख होऊन जाई. या सर्व कलहांचे मूळ शोधण्याचा तो प्रयत्न करी. रोहिणी नदीच्या पाण्यावरून शाक्य व कोलिय यांच्यांत भांडणे होत असत. शस्त्राने ती वाढीस लागत.

या कटकटीस तो पूर्णपणे विटला. गृहस्थाश्रमाबद्दलही त्याला फारशी आस्था वाटेनाशी झाली. ती एक कचऱ्याची व अडचणीची जागा त्याला वाटे. प्रव्रज्या म्हणजे मोकळी हवा. तिच्या सहवासात आपण वाढावे असे त्याच्या मनाने घेतले. डोक्याचे मुंडण करावे, भगवे वस्त्र धारण करून परिव्राजक बनावे अशी ओढ त्याच्या मनाची वाढत राहिली. पुत्र, पत्नी, दास, दासी, संपत्ती यांचा मोह लोटून द्यावा असे त्याच्या मनाने घेतले. यांच्यावर आपले सुख अवलंबून नाही हे त्याने जाणले. म्हातारपण, रोग,

मरण, शोक यांच्या फेऱ्यांत कायमचे अडकण्यात कसले सुख आहे? यांच्याखेरीज काही एक अजर, अजात, अव्याधी, अमर, अशोक असे परमश्रेष्ठ निर्वाणपद आहे काय? अशा प्रश्नांनी बोधिसत्त्व व्यथित झाला. त्याला कुठल्याच गोष्टीत रस वाटेना.

बोधिसत्त्वाचे चिंतन अहोरात्र असे. शाश्वत अशा सुखाचा शोध लागल्याखेरीज त्याच्या चित्तास शांती मिळणार नव्हती. तो सतत बेचैन असे. तरुण व रूपसंपन्न यशोधरा त्याच्या मनाची समजूत घाली. त्याच्या मनास बरे वाटेल असेच ती वागे. त्याचे मन नाना प्रकारांनी रमवीत असे. एके दिवशी रात्री बोधिसत्त्व कमालीचा अस्वस्थ दिसत होता. यशोधरा काळजीत पडली. परिवारातील इतर स्त्रियांनी, दासींनी वाद्य-संगीतादी उपचारांनी त्याचे मन शांत करण्याचा प्रयत्न केला. पण बोधिसत्त्वाचे मन शांत झाले नाही. शेवटी कंटाळून त्या कलावती स्त्रिया तेथेच झोपी गेल्या. त्यांची अवस्था पाहून बोधिसत्त्वाला उबग आला. क्षणापूर्वी नखरेलपणाने गायन-वादन, शृंगारक्रीडा करणाऱ्या या स्त्रिया अस्ताव्यस्त होऊन लोळत होत्या, एकेकीचे चाळे पाहण्यासारखे होते. कुणी झोपेत बडबडत होत्या, कुणाच्या तोंडातून लाळ गळत होती, कुणी भयानकपणे घोरत होती. या सर्व दृश्यांचा विपरीत परिणाम त्याच्या आधीच उदास असणाऱ्या मनावर झाला!

आपण हे ऐश्वर्यशाली घरच सोडून दिले तर! त्याच्या मनात हा विचार गेले कित्येक दिवस स्थिर होत राहिला होता. ऐन तारुण्यात प्रपंच सोडावा, रूपवान पत्नी व लडिवाळ मुलगा यांचा त्याग करावा, धनवैभवाचा लोभ सोडावा, अशा विचारांनी तो अस्वस्थच होता. पण त्याला तशी परवानगी कोण देणार? शुद्धोदन राजा, यशोधरा, गौतमी यांपैकी कुणीच त्याच्या विचारांना साथ दिली नाही. बोधिसत्त्वाचे तारुण्य ऐन भरात आलेले, एकही केस पिकलेला नाही, मग असे वैराग्य कशासाठी? अशा विचाराने

घरातील वडील मंडळी चिंताग्रस्त झाली. बिचारी यशोधरा सतत डोळ्यांत पाणी साठवून वागे.

पण आता बोधिसत्त्व कुणाचेच ऐकायला तयार नव्हता. मध्यरात्रीच्या सुमारास तो आपल्या मंचकावरून हलकेच उठला. पलीकडे शांतपणे राहुलमाता लहान पोरास कुशीत घेऊन झोपली होती. तिच्याकडे बोधिसत्त्वाने एकदा निश्चल दृष्टीने पाहिले व तो शयनमंदिराच्या दाराशी आला. क्षणभर त्याच्या मनाची चलबिचल झाली. पुनः त्याने यशोधरेकडे पाहिले. निरागस, निष्पाप व सुंदर अशा रूपाची राहुलमाता स्वस्थ चित्ताने झोपली होती. तिच्या स्तनांशी राहुलकुमार बिलगला होता; आणि अशा या लोभनीय दृश्यास मागे सारून बोधिसत्त्व घर सोडून जाण्यास सिद्ध झाला होता. तो हलक्या पावलांनी राहुलमातेजवळ गेला. यशोधरा जागी झाली तर सारेच फुकट जाईल; ती कधी परवानगी देणार नाही, रडून रडून आकान्त करील, हे त्याला माहीत होते. बोधिसत्त्वाने राहुलच्या गालांवरून हात फिरवला व झटकन तो शयनमंदिराच्या बाहेर आला.

खाली येऊन त्याने छन्न नावाच्या सारथ्याला हाक मारली. कंथक नावाचा एक घोडा सज्ज करण्यात आला. या घोड्यावर बसून छन्नासहित बोधिसत्त्व नगराच्या बाहेर अनोमा नदीच्या काठी आला. तेथे तरवारीने त्याने आपले केस कापून टाकले. अंगावरले दागदागिने छन्नाच्या स्वाधीन केले आणि बोधिसत्त्वाने राजगृहाकडे प्रयाण केले. तो प्रथम आळार कालामापाशी गेला. त्याच्यापाशी आश्रमात राहून बोधिसत्त्वाने ध्यानमार्गाचा अभ्यास वाढविला. उद्दक रामपुत्त यानेही त्याला समाधीच्या अवस्थांचे ज्ञान दिले. पण या दोघांच्याही सहवासात खरे सुख त्याला मिळाले नाही. बोधिसत्त्व सतत भटकत राहिला. शाश्वत सुखाचा मार्ग तो

शोधीत होता. भिक्षा मागून जीवधारणेपुरतेच अन्न तो सेवन करीत असे. राजगृहाहून तो उरुवेला येथे आला. येथे त्याने रमणीय भूभाग पाहून तपश्चर्या केली. प्रथम त्याचा भर हठयोगावर फार होता. दातांवर दात लावून, जीभ टाळ्याला लावून तो चित्ताचे दमन करी. अनेक दिवस उपवास करी. कधी अत्यल्प आहारावरच भागवी. त्यामुळे त्याचे शरीर कृश झाले. त्याच्या अवयवांचे सांधे स्पष्टपणे दिसू लागले. उंटाच्या पावलाप्रमाणे त्याचा कटिबंध झाला. सुताच्या चात्यांच्या माळेप्रमाणे त्याच्या पाठीचा कणा दिसू लागला. मोडक्या घराच्या वाशांप्रमाणे त्याच्या बरगड्या दिसत होत्या. खोल विहिरीत पडलेल्या नक्षत्रांच्या छायेप्रमाणे त्याची बुबुळे खोल दिसत होती. उन्हात पडलेल्या कच्च्या भोपळ्याप्रमाणे त्याच्या डोक्याची चामडी कोमेजून गेली होती.

हठयोगाची नाना साधने, उपोषणे, खडतर व्रते यांच्या मार्गांनी बोधिसत्त्व शाश्वत सुखाचा मार्ग शोधीत होता. शरीरधर्माच्या अनेक विकारांशी त्याला झगडावे लागले. अनेक संकटांवर मात करावी लागली. आणि याच मार्गात असताना त्याला एके दिवशी तत्त्वबोध झाला. वैशाखी पौर्णिमेच्या दिवशी सुजाता नावाच्या कुलीन तरुण स्त्रीने त्याला उत्तम अन्नाची भिक्षा दिली. ही भिक्षा ग्रहण करून निरंजना नदीच्या तीरावर तो विश्रांतीसाठी थांबला. एका पिंपळाच्या झाडाखाली तो धानस्थ बसला असताना त्यास भुलविण्यासाठी माराने तृष्णा, अरती आणि रगा अशा आपल्या तीन मुलींना त्याच्याकडे पाठविले, परंतु मारसेनेचे वा या तीन कन्यांचे काहीही चालले नाही. याच वृक्षाखाली बोधिसत्त्वाला ज्ञानबोध झाला. या ज्ञानप्राप्तीने तो तृप्त झाला; अलौकिक सुखाचा ठेवा प्राप्त करून संतुष्ट झालेला बोधिसत्त्व येथून पुढे गौतम बुद्ध म्हणून प्रसिद्धीस आला. त्याच्या मनाची तगमग थांबली. त्याला शाश्वत सुखाचा मार्ग सापडला.

आपल्याला झालेल्या ज्ञानाचा लाभ इतरांना करून द्यावा म्हणून तो आषाढी पौर्णिमेच्या सुमारास वाराणशीस येऊन पोचला. तेथील ऋषिपत्तनातील अनेक भिक्षू व साधक त्याच्याभोवती जमा झाले. त्यांना त्याने आपला नवीन धर्म समजावून सांगितला. त्याचे हे ‘ धर्म-चक्र प्रवर्तन ’ फारच महत्त्वाचे मानले जाते. दया, करुणा, क्षमा, साधे-सुधे जीवन यांवर आधारलेला व कर्मकांडास थारा न देणारा एक नवा धर्म समजावून सांगताना गौतम बुद्ध म्हणाला,

“ भिक्षूहो, कामोपभोगात सुख मानू नका. देहदंडनासारख्या दुःखकारक व हानिकारक मार्गानेही तुम्ही जाऊ नका. या टोकांना दूर सारून मी ज्ञानचक्षू निर्माण करणारा असा एक नवा धर्ममार्ग शोधला आहे. या मार्गाने उपशम, प्रज्ञा, संबोध यांची प्राप्ती होईल. सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्मान्त, सम्यक आजीव, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती, सम्यक समाधी हा माझा अष्टांगिक मार्ग होय. हे जीवन दुःखकारक आहे. जन्म, जरा, व्याधी, मरण, दुःखानेच भरलेल्या या गोष्टी आहेत. पुनः पुनः उत्पन्न होणारी तृष्णा ही सुद्धा दुःखदायकच आहे. या तृष्णेचा पूर्ण निरोध वैराग्याने करावा. हिचा त्याग करून मुक्ती मिळवावी. ”

अशा प्रकारचा उपदेश गौतम बुद्ध भोवतीच्या लोकांना करीत राहिला. त्याच्याबरोबर आता अनेक भिक्षू जमा झाले. त्याचा धर्मपंथ वाढीस लागला. अनेक श्रीमान राजकुमार वैराग्य धारण करून गौतमाच्या भिक्षुसंघात सामील झाले. सर्वसामान्य लोकांचे दुःख दूर करण्यासाठी गौतम बुद्धाची तळमळ असे. त्याने आपल्या अनुयायांना म्हटले, ‘ तुम्ही प्रापंचिक पाशांतून मुक्त व्हा. भिक्षूहो, बहुजनांच्या हितासाठी, सुखासाठी, लोकांवर दया करण्यासाठी, देवांच्या आणि मनुष्यांच्या कल्याणासाठी

धर्मोपदेश करण्यास सिद्ध व्हा. कल्याणप्रद मार्गाचा उपदेश लोकांना करा.' या उपदेशाने प्रेरित होऊन बुद्धाचे शिष्य चारी दिशांना भ्रमण करीत. अनेकांना उपदेश करीत. अनेक नवीन तरुण बुद्धाच्या नव्या धर्मात सामील होत असत. राजगृहाच्या बिंबिसार राजाने बुद्धाचे व त्याच्या अनेक भिक्षूंचे मनापासून स्वागत केले. सारिपुत्त आणि मोग्गल्लान हे दोन मोठे विचारी शिष्य गौतमास येऊन मिळाले. बुद्धाने आपल्या भिक्षूंचा एक संघ स्थापन केला. त्याची एक प्रकारची शिस्त बसविली. लोकोद्धाराच्या कार्याची दिशा त्याने आखून दिली. निरनिराळ्या पद्धतींनी उपदेश करून त्याने आपला नवा धर्म प्रतिष्ठित केला.

एकदा गौतम बुद्ध भ्रमण करीत असता भारद्वाज नावाच्या ब्राह्मणाच्या शेतावर गेला. भारद्वाज शेतावर काम करणाऱ्या मजुरांना जेवण देत होता. गौतम भिक्षेसाठी उभा असलेला पाहून भारद्वाज त्याला म्हणाला, 'असा स्वस्थ उभा का? शेती कर, नांगर हातात धर. माझ्यासारखे परिश्रम कर. भिक्षा का मागतोस?' त्यावर गौतम बुद्ध म्हणाला,

"मी देखील शेतकरी आहे. मी श्रद्धेचे बी पेरतो, त्यावर तपश्चर्येची मेहनत करतो. प्रज्ञा हा माझा नांगर आहे. पापलज्जा हा इसाड, चित्त दोऱ्या, स्मृती अथवा जागृती नांगराचा फाळ आहे. मी कायेने व वाचेने संयमी आहे. सत्याच्या साह्याने मी मताची खुरपणी करतो. संतोष ही माझी सुट्टी आहे. उत्साह हे माझे बैल असून माझे वाहन अशा दिशेकडे धाव घेते की जेथे शोकाची पाळीच येत नाही."

गौतम बुद्धाचे भाषण भारद्वाजाने जाणले. तो त्याचा शिष्य बनला. ऐहिक व लौकिक शेतीबरोबरच गौतम बुद्धाने मनाच्या मशागतीचे महत्त्व उत्तम रीतीने वर्णन केले आहे. लोकांना शाश्वतचे सुख प्राप्त व्हावे म्हणून गौतम बुद्ध अशा प्रकारचा उपदेश करी. काही दिवस राजगृहात राहिल्या-

वर गौतम बुद्ध कपिलवस्तू येथे येऊन दाखल झाला. एके दिवशी तो शुद्धोदनाच्या घराजवळूनच भिक्षा मागत जात होता. याच गृहात तो लहानाचा मोठा झाला होता. येथेच त्याचा पिता शुद्धोदन, पत्नी यशोधरा, मुलगा राहुल त्याचे चिंतन करीत दिवस कंठीत होते. त्यांनी मोठ्या प्रेमाने गौतमास घरी बोलावले. त्याला स्वगृहाची भिक्षा दिली. राहुलकुमारास त्याच्या वडिलांचा परिचय करून देताना यशोधरेस धन्यता वाटली.

गौतम बुद्धाने अनेक भिक्षू शिष्य म्हणून जमविले. त्यांचे संघ स्थापन करून त्याने उत्कृष्ट प्रकारची संघटना निर्माण केली. दया, धर्म, शांती, शुद्ध आचरण, अहिंसा यांचा उपदेश त्याने सतत केला. त्याने कर्मकांडाचे, व्रत-वैकल्यांचे, यज्ञयागांचे महत्त्व कमी केले, दंभाचरणास आपल्या धर्मपंथात वाव दिला नाही. शांतीने जग जिंकणारा हा धर्मवीर मानवी इतिहासात अद्वितीय आहे. लोकोत्तर असे कार्य गौतम बुद्धाने निष्ठेने केले. आयुष्याच्या अखेरीस पावसाळ्याच्या सुमारास तो राजगृहाला आला. तेथून अनेक भिक्षूंसहित वैशालीजवळ असलेल्या वेलुव नावाच्या गावात पावसाळ्यासाठी थांबला. या काळात त्याची प्रकृती बिघडली. थोडे उपचार केल्यावर त्याला हुशारी वाटली. पण क्षीण प्रकृती असतानाही तो परत वैशाली येथे आला. भिक्षुसंघासह त्याने भांडग्राम, हस्तिग्राम, आम्रग्राम, तंबुग्राम इत्यादी ठिकाणचा प्रवास करून तो पावाग्रामात चुंद नावाच्या लोहाराच्या आम्रवनात उतरला. लोहाराने कौतुकाने भिक्षूंना व गौतमाला भोजनासाठी बोलाविले. 'सूकर-मद्दव' नावाचा पदार्थ त्याने यांच्यासाठी केला होता. त्याच्या सेवनाने गौतमाची प्रकृती बिघडली. अतिसाराच्या विकाराने तो आजारी झाला. तशाच अवस्थेत त्याने ककुत्था व हिरण्यवती या नद्या ओलांडल्या. कुसिनारेपर्यंत कसाबसा प्रवास त्याने उरकला. तेथेच एके दिवशी रात्री

एका शालवनात गौतम बुद्धाचे परिनिर्वाण झाले. दयाधर्माचा, अहिंसा-धर्माचा, करुणेचा, बहुजनहिताचा फार मोठा ठेवा मानवजातीस देऊन गौतम बुद्धाने जगाचा शांतचित्ताने निरोप घेतला. ही घटना ख्रि. पू. ४८३ या वर्षी घडली.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ......... दि .........
क्रमांक ...... नोंद दि .........



खिस्तपूर्व ५५१–४७८

## ५ : कन्फ्यूशियस

दोन अडीच हजार वर्षांपूर्वीचा काळ. चीन देशात सर्वत्र बंडाळी माजलेली होती. छोटी छोटी संस्थाने व त्यांचे धनी एकमेकांशी क्षुल्लक कारणावरून युद्ध करीत. वैयक्तिक व सामाजिक जीवनच त्यामुळे धोक्यात आले होते.

जुलमी राजसत्तांना लोक विटून गेल्यामुळे परागंदा होण्याच्या पंथाला लागले होते. काल वैभवशिखरावर असणारी राजसत्ता आज धुळीस मिळत होती. ' ल्व ' संस्थानचा धनी सरदार कॉओ असाच संकटात सापडला होता. की, शूह आणि मॅंग या तीन घराण्यांनी खुद्द राजाविरुद्धच युद्ध पुकारले. लहानमोठ्या चकमकी झाल्यावर सरदार कॉओला राजधानी सोडून त्सी संस्थानात आश्रयासाठी पळ काढावा लागला. त्याच्याबरोबर त्याचा एक अती विश्वासू असा उण्यापुऱ्या उंचीचा व दिलदार दिलाचा एक मित्र होता. आपल्या राजाचे रक्षण व्हावे म्हणून या मित्राचा प्रयत्न होता. ताई पर्वताच्या शेजारच्या रस्त्याने राजाचा हा मित्र चाललेला असताना त्याला एक विलक्षण दृश्य दिसले. एका थडग्याशेजारी बसून एक हतभागी स्त्री ओक्साबोक्शी रडत होती. दुःखाने होरपळून निघालेल्या त्या दुर्दैवी स्त्रीची त्या मित्रास कीव आली. आपल्याबरोबरच्या एका माणसाकरवी त्याने तिची चौकशी केली.

' बाई, दुःखाचे डोंगर कोसळलेले दिसतात तुमच्यावर. काय झाले सांगा ना आम्हांला ? '

' काय सांगू बाबा माझी कर्मकहाणी...या ठिकाणी आम्ही राहत असता माझ्या सासऱ्यावर वाघाने झडप घातली...माझा नवराही वाघाच्या पोटातच गडप झाला...आणि आता माझ्या मुलाची, एकुलत्या एक मुलाचीही तीच गत झाली...काय करू मी... ? ' बाई आपली दुःखद कथा सांगत होती. राजाच्या मित्राने तिला सहानुभूती दाखविण्यासाठी विचारले, ' मग ही अशी भयंकर जागा तुम्ही अजूनही का नाही सोडीत ? '

यावर बाईने उत्तर दिले,

' जागा कशी सोडावी ? इथे एक तरी सुख आहे. या ठिकाणी जुलमी सरकार तरी नाही—'

बाईच्या या उत्तराने राजाच्या उमद्या मित्राचे अंग शहारून निघाले. क्षणार्धात चीनची राजकीय बंडाळी त्याच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. राजे लोकांची पाशवी परंपरा त्याला आठवली; व या दुर्दैवी बाईवर आलेला प्रसंग पाहून त्याने आपल्या मित्रांशी उद्गार काढले, ' पाहिलेत , ध्यानात ठेवा या बाईचा प्रसंग. जुलमी राजसत्ता वाघापेक्षाही क्रूर वाटते—'

राजाच्या तरुण मित्राच्या बोलण्यात सत्यार्थ पुरेपूर भरलेला होता; राजेलोकांच्या जुलुमाखाली प्रजा त्रस्त होऊन गेली होती. या जाचातून लोकांना मुक्त करावे व राजेमंडळींनाही शहाणपण शिकवावे म्हणून प्रयत्न करणाऱ्यांत वरील राजाच्या मित्राचा – कन्फ्यूशियसचा वाटा फार मोठा आहे. सामान्य माणसाचे दुःख ओळखून ते निवारण करण्यात ज्या साधुसंतांनी आपली आयुष्ये खर्च केली, त्यांत चीन देशाच्या या महापुरुषाचे नाव अग्रस्थानी झळकावयास हवे. कन्फ्यूशियस नुसता संत नव्हता, नुसता तत्त्ववेत्ता नव्हता, तर समाजकारण आणि राजकारण यांत श्रेष्ठ आदर्श व्यावहारिक भूमिकेवरून विशद करणारा एक थोर व खऱ्या अर्थाने धर्मप्रवर्तक होता. वैयक्तिक आदर्शाबरोबर सामुदायिक हितांचा विचारही या महात्म्याने केलेला आहे. आणि म्हणूनच दोनअडीच हजार वर्षे होऊन गेली तरी कन्फ्यूशियसचा उपदेश आजही ताजा-तवाना वाटतो. आजचे अनेक प्रश्न जणू त्या वेळीही कन्फ्यूशियससमोर होते. महात्म्यांच्या श्रेष्ठत्वाचे लक्षण हेच की, देशकालांच्या बंधनातीत असणारी त्यांची विचारसूक्ते नित्य नूतन विचार प्रसवणारी असतात आणि कोणत्याही काळातील समस्यांना समाधानपूर्वक उत्तरे पुरविण्याचे सामर्थ्य त्यांच्यांत असते. उगाच ऐट मिरवून आपण वारंवार म्हणत असतो की, माणसाचे जीवन आज पार बदलून गेले आहे; जुन्यापुराण्या धर्मविचारांचा आज काही उपयोग नाही. पण थोडा विचार केल्यास दिसून

येईल की, मानवी जीवन त्याच त्या अडचणींतून अजून घुटमळून आहे. आपापसांतील कलह, युद्धे, मारामाऱ्या, खून, दरवडे, जुलूमजबरदस्ती, दंभ, ढोंग या सर्व कचाट्यातून माणसास बाहेर पडण्यासाठी अजून किती काळ वाट पाहावी लागणार आहे कोणास माहीत ? त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट ही की, पुरातन कालापासून वहकत जाणाऱ्या मानव-जातीस सत्पथावर आणण्याची कामगिरी करणारे महापुरुषही प्राचीन काळापासून दीपस्तंभाप्रमाणे चमकून दिसतात. अंधारात चाचपडणारी व अज्ञानाच्या अंधारात धडपडणारी जनता या दीपश्रेष्ठांच्या प्रकाशात सन्मार्ग धरू शकली. चीन देशात बजबजपुरी माजली असता समाज-धर्माचा पुरस्कार करणाऱ्या या दीपस्तंभाचा – कन्फ्यूशियसचा – प्रकाश अजूनही जसाच्या तसा आहे.

कन्फ्यूशियसचा बाप शुहलिंग हॅह हा एक लष्करी अधिकारी असून पराक्रमाबद्दल त्याची विशेष ख्याती होती. भोवती सर्वत्र लष्करी अंमलच वावरत असल्याने शुहलिंगचा दरारा चांगला होता. त्या वेळच्या लू प्रांताचा तो रहिवासी असल्यामुळे त्या देशाचे रक्षण करण्याची जबाबदारीही त्याच्यावरच होती. शुहलिंगचा मानमरातब खूपच वाढला होता, पण दिवसेंदिवस त्याचे मन मात्र उदास होत गेले होते. वयाची सत्तरी उलटण्याची वेळ येऊन ठेपली तरी पुत्रसंतानाचा लाभ मात्र त्याला झालेला नव्हता. त्याला नऊ अपत्ये होती, पण त्या सर्व मुलीच असल्यामुळे त्या वेळच्या चिनी रिवाजाप्रमाणे स्वर्गाची वाट खुली करण्यासाठी औरस मुलाची शुहलिंगच्या या उतारवयातही फारच आवश्यकता होती. मृत पित्यासाठी करावयाचे विधी औरस पुत्राखेरीज कोण करणार ? याच चिंतेत शुहलिंग असताना त्याने आपली सोय आपणच करण्याचे ठरविले. एका सोळा-सतरा वर्षांच्या कुमारिकेशी शुहलिंगने आपल्या वयाच्या सत्तराव्या वर्षी पुनः लग्न केले. या मुलीचे

नाव येन चिआंगत्सी असून तिने आपल्या पतीची मनकामना संपूर्णपणे तृप्त केली. ख्रि. पू. ५५१ या वर्षी या नव्या बायकोपासून शुहलिंगला मुलगा झाला आणि त्याच्या स्वर्गाचे दरवाजे खुले झाले.

या अद्‌भुत अपत्याच्या जन्मावेळी जे जे चमत्कार घडले, त्याच्या नोंदी चिनी दंतकथांतून अजूनही सापडतात. दृष्टान्त झाल्याप्रमाणे गर्भवती चिआंगत्सी देवाच्या दर्शनासाठी म्हणून 'नी' पर्वतावर गेली असताना तेथेच एका गुहेत ती प्रसूत झाली ! मुलाच्या जन्मानंतर वनदेवतांनी व जलदेवतांनी गुहेच्या तोंडाशी पहारा करून मुलाचे व मुलाच्या आईचे रक्षण केले. पुत्रजन्माबरोबरच एक प्रकारच्या मधुर संगीताने त्याच्या आईचे कान संतुष्ट झाले. "हा तुझा मुलगा दिव्य धर्माचा प्रेषित होईल" म्हणून दिव्य वाणीही चिआंगत्सीच्या कानी आली. नुकत्याच जन्मास आलेल्या या मुलाच्या अंगावर एकूणपन्नास खुणा असून "हा मुलगा नव्या तत्त्वांना जन्म देऊन समाजधर्माचा पुरस्कार करील" अशी अक्षरेही स्पष्टपणे उमटलेली होती.

गुहेच्या मध्यभागी एकाएकी पाण्याचा झरा निर्माण झाला व त्यातून जलदेवतेचा आलेख बाहेर पडला. त्यावर भविष्य वर्तविले होते : "हा दिव्य मुलगा चीनचा अनभिषिक्त राजा होईल." पुत्रजन्माचे वर्तमान शुहलिंगास समजले तेव्हा त्याच्या आनंदास सीमा उरली नाही. आपल्या सैनिक मित्रांसह तो जेव्हा पुत्रमुख पाहावयास आला, तेव्हा मुलाचे विस्तीर्ण कान पाहून त्यास नवल वाटले. कानांच्या लांबीरुंदीवर डोक्यातील अक्कल असते या चिनी समजुतीस अनुसरून नवजात शिशूच्या कानांचे कौतुकच झाले. उतारवयातील ही फलप्राप्ती पाहून संतोषाने भारावलेल्या बापाने उद्‌गार काढले, "पोर मोठ्या गुणाचे दिसते.. महापुरुष होईल पुढे कोणीतरी..." या नव्या मुलाचे नाव कुंग-फू-त्सी – शहाणा कुंग – असे ठेवण्यात आले.

आणि खरेच कुंग-फू-त्सी हा सामान्य मुलाप्रमाणे वाढलाच नाही. या महाबुद्धिमान् मुलाची प्रतिभा बालवयातच चमकू लागली. वयाच्या तिसऱ्या वर्षी कन्फ्यूशियसच्या पित्याचे निधन झाले तरी त्याच्या अध्ययनात मात्र खंड पडला नाही. घरची अतिशय गरिबी आणि त्यात वडिलांचा मृत्यू. त्यामुळे सर्व भार लहानग्या कुंगवरच पडला. पण तो सर्व सहन करीत करीतच त्याने विद्येची आराधना एकनिष्ठपणे केली. व्यायामाची आवड त्याला फार होतीच; पण त्याहीपेक्षा तो काव्यसंगीताचा मोठा भोक्ता होता. वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंतच त्याने अस्तित्वात असणारी सर्व विद्या आत्मसात केली.

वयाच्या एकोणिसाव्या वर्षी घरचा प्रपंच पेलता यावा म्हणून त्याला कारकुनाची नोकरी करावी लागली. तशात आईच्या इच्छेखातर त्याला लग्नही करावे लागले. सर्व जगतावर सुखासमाधानाचा अमृतवर्षाव करणाऱ्या कन्फ्यूशियसचे वैवाहिक आयुष्य केव्हाच सुखदायक नव्हते. एक मुलगा व दोन मुली या अपत्यांचा जरी त्याला लाभ झालेला होता तरी नवरा-बायकोची एकवाक्यता केव्हाच झाली नाही. शेवटी तर कन्फ्यूशियसला पत्नीशी काडीमोड करून घ्यावी लागली ! घरचा प्रपंच सांभाळण्यासाठी देशातील एका धान्याच्या दुकानावर त्याला नोकरी करणे प्राप्त झाले. तेथून त्याची बढती सार्वजनिक शेतजमिनीचा रक्षक म्हणून झाली. याच वेळी त्याला पहिला मुलगा झाला. या वेळी कन्फ्यूशियसचा मान एवढा वाढला होता की, त्याच्या राजाने पुत्रजन्माच्या आनंददर्शनाप्रीत्यर्थ एक मत्स्याकृती देणगी त्याजकडे पाठवून दिली. या देणगीचा आदर करण्यासाठी म्हणूनच कन्फ्यूशियसने आपल्या मुलाचे नाव 'मत्स्य' या अर्थीच 'ली' असे ठेवले. या मुलाची साद्यंत हकीकत कन्फ्यूशियसच्या चरित्रात मिळत नाही. पुढे कोणा एका शिष्याने आपल्या गुरूच्या म्हणजे कन्फ्यूशियसच्या मुलास विचारले, " तुमच्या

वडिलांपासून तुम्हांस काही शिक्षण मिळाले का ?" यावर लीने उत्तर दिले, " नाही. एकदा पिताजी संथपणे उभे असताना मी तेथून चालली होतो तेव्हा त्यांनी विचारले, " काय रे, स्तोत्रे म्हटलीस का ?" मी म्हटले, " अजून नाही." त्यावर पिताजींनी उत्तर दिले, " तर मग माझ्याशी बोलण्याची तुझी लायकी नाही, "...पुनः एकदा त्यांनी मला विचारले, " नीतिधर्माचे नियम तू वाचले आहेस काय ?" मी नाही म्हटल्यावर त्यांनी उत्तर दिले, " नीतिधर्माची साधी तत्त्वेही तू वाचली नाहीस तर मग तुझे चारित्र्य कसे घडणार ?" आपल्या वडिलांशी झालेली ही प्रश्नोत्तरे लीने वडिलांच्या एका शिष्याजवळ नमूद केली आहेत. त्यावरून कन्फ्यूशियसच्या उपदेशाचा रोख ध्यानात येण्यासारखा आहे.

आणि खरे म्हणजे कन्फ्यूशियस हा जातिवंत उपदेशक वा नव्या धर्माचा प्रवर्तक होता. सरकारी नोकरीत बढतीवर बढती मिळविण्यात त्याला सुख नव्हते; म्हणूनच वयाच्या बाविसाव्या वर्षी त्याने नोकरी सोडून दिली व तो अध्यापक बनला. माणसामाणसांत सद्वर्तन कसे असावे व राज्यकर्त्यांशी त्यांनी कसे वागावे, यांसंबंधी लोकांना शिक्षण देण्यासाठी त्याने एक विद्यालयच चालू केले. देशातील सारे तरुण त्याच्या भोवती गोळा झाले. गरीब-श्रीमंत हा भेद नव्हता. फी मिळावी अशी सक्तीची योजना नव्हती. त्यामुळे कन्फ्यूशियसचे विचार सर्वांना सुलभपणे प्राप्त होऊ लागले. तल्लख बुद्धीच्या विद्यार्थ्यांवर तो नेहमी खुश असे. विद्येची अभिरुचीच ज्याला नाही त्याबद्दल कन्फ्यूशियसला प्रेम वाटणे शक्य नव्हते. तो म्हणत असे, " ज्याला ज्ञानाची थोडीसुद्धा भूक नाही, त्याच्यापुढे मी सत्याचे एवढेसुद्धा दर्शन करवणार नाही. स्वतः होऊन जो ज्ञानसिद्ध होण्याचा प्रयत्न करीत नाही त्याला मी यत्किंचितही मदत करणार नाही...एखाद्या विषयाचा मी नुसता एक भाग शिकविला

तर उरलेला सर्व विषय ज्याचा त्याने आत्मसात् केला पाहिजे. " उत्तम अध्यापक म्हणून कन्फ्यूशियसचा लौकिक गतीने वाढला. मध्यंतरी त्याच्या आईचे निधन झाले. कन्फ्यूशियसला तेवढेच एक बंधन उरले होते. तेही संपल्यानंतर ज्ञानप्रसारार्थ तो मुक्त झाला. पण त्याची मातृ-निष्ठाही प्रखर होती. त्या वेळच्या चिनी रिवाजाप्रमाणे आईच्या थडग्या-जवळ एका खोपटीत राहून तीन वर्षेपर्यंत कन्फ्यूशियसने एकान्तवासात विचारसाधना करीत आपल्या आयुष्याचा काळ काढला ! आणि नंतरच्या काळात त्याच्या प्रचाराला बहर येऊ लागला. चारी दिशांना तो भटकत असे. आपल्याकडील संन्यासी-यतीप्रमाणे त्याचा सर्वत्र संचार असे. सौम्य व शांत स्वभावाचा बुद्धिमान उपदेशक म्हणून त्याची सर्वत्र ख्याती झाली होती. त्याची बुद्धी खरोखरीच तेजस्वी होती. त्याचे मन प्रगल्भ होते. मित्रांनी आग्रह केल्यावरून तो फिरता आचार्य बनला; परिव्राजक वा उपदेशक झाला. तो जेथे जाई तेथे निष्ठावंत शिष्यांचा मेळावा त्याच्या भोवती जमा होई...तो एखाद्या नदीकाठी थांबे, शिष्यांना प्रवचन देई, देताना प्रश्नोत्तरे चालत, चर्चा होई...अशा रीतीने सर्वत्र संचार करीत असता व्यवहाराला उपयोगी असे ज्ञान तो सर्वत्र प्रेरीत जाई.

हळूहळू कन्फ्यूशियसचे शिष्यमंडळही वाढत गेले. ख्रि. पू. ५१७ च्या सुमारास ल्ह संस्थानचे दोन अधिकारी तरुण पुरुष त्याचे शिष्य बनले. त्यांच्याबरोबर कन्फ्यूशियसने राजधानीस भेट दिली. तेथील राजेशाही ग्रंथालयात त्याने इतिहासाचा अभ्यास केला; आणि आपल्या आवडत्या संगीतकलेच्या व्यासंगाची हौस त्याने येथेच भागवून घेतली. संगीताच्या नादात त्याला भुकेचेही भान उरत नसे.

* * *

असे सांगतात की, याच समयास चीनचा प्रसिद्ध तत्त्ववेत्ता व टोइस्ट पंथाचा संस्थापक लाओत्से याची गाठ कन्फ्यूशियसने घेतली. लाओत्से त्याच्यापेक्षा पन्नास वर्षांनी वडील होता. लाओत्सेचे तत्त्वज्ञान दिसावयास आकर्षक व रम्य असले तरी त्यात गूढता असल्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या आटोक्यात ते येण्यासारखे नव्हते. अंदाधुंदीच्या काळात चीनच्या लोकांना सहजासहजी समजेल अशा व्यावहारिक धर्माची आवश्यकता होती आणि यासाठी लाओत्सेपेक्षा चीन देशाला कन्फ्यूशियसची अधिक जरूरी होती. लाओत्से स्वप्नात वावरणारा, ध्येयवादी व रहस्यमय वृत्तीचा होता; तर कन्फ्यूशियस व्यवहारचतुर, पृथ्वीवर वावरणारा आणि स्पष्ट बोलणारा. तरीसुद्धा लाओत्सेच्या भेटीचा तीव्र संस्कार कन्फ्यूशियसच्या मनावर झालेला होता.

या भेटीच्या वर्षीच कन्फ्यूशियसच्या ल्यू प्रांतात बंडाळी झाली. त्याचा राजा ड्यूक ऑफ काओ शेजारच्या देशात पळून जाऊ लागला. रोबर कन्फ्यूशियस होताच. आणि याच वेळी या चरित्रकथेच्या प्रारंभी विस्ताराने निवेदन केलेली एका अभागी स्त्रीच्या जीवनातील घटना घडली व कन्फ्यूशियसला जुलमी राजसत्तेचे मूर्तिमंत स्वरूप किती भयानक असते याची खात्री पटली.

यानंतर कन्फ्यूशियस जेव्हा त्सी प्रांतात येऊन पोचला तेव्हाच त्याने राजपुत्राची भेट घेऊन जुलमी सरकार नष्ट करण्यासंबंधीचे आपले विचार त्याच्या कानांवर घातले. त्सी प्रांताच्या राजासही या तत्त्वज्ञानी माणसाच्या हाती कारभार द्यावा असे वाटले. राजकारणातल्या अनेक गोष्टींवर त्याने कन्फ्यूशियसशी चर्चा केली. " चांगली राज्यव्यवस्था म्हणजे काय ? " असा एक प्रश्न राजाने कन्फ्यूशियसला केला. त्यावर या तरुण मुत्सद्द्याने उत्तर दिले, " उत्तम राज्यव्यवस्थेत राजा राजाचे, प्रजा प्रजेचे, प्रधान प्रधानाचे, बाप बापाचे आणि मुलगा मुलाचे कर्तव्य

योग्य प्रकारे वजावीत असतो." त्सी देशाच्या राजपुत्राने या वक्तव्यावर मान डोलावली व स्पष्टपणे उद्गार काढले, "महाशय, आपण म्हणता त्यातील काहीही मला समजले नाही. पण एकंदरीत ते चांगले दिसते." त्सीच्या राजपुत्रावर कन्फ्यूशियसने चांगलाच परिणाम केला होता. काही कारभारही या तत्त्वज्ञ माणसाकडे देण्याचा विचार राजपुत्राने केला; पण त्याच्या सल्लागारांनी या सर्व गोष्टींना कडाडून विरोध केला. या भ्रमिष्ट आणि अव्यवहार्य माणसाच्या हातांत देशाचा कारभार ? गैन इंग नावाच्या मुख्य प्रधानाने सांगितले, "सरकार, हे तत्त्वज्ञानी लोक अगदी अव्यवहार्य असतात. यांनी सांगितलेल्या गोष्टी लोकांना समजणार देखील नाहीत...या लोकांपासून सावध राहावे हे बरे..."

अर्थातच कन्फ्यूशियसला त्सी प्रांतात काहीही प्रयोग करणे शक्य झाले नाही. देशात पसरलेली अंदाधुंदी थांबलेली असल्यामुळे तो परत आपल्या ल्व संस्थानात आला. येथे त्याचे सर्व मित्रमंडळ तयार होतेच. त्सीच्या राजपुत्राने आपल्या थोर पुढाऱ्यास नीट वागणूक दिली नाही, या एकाच बुद्धीने ल्व प्रांताच्या राजाने आपले चांगटयू शहर व्यवस्थेसाठी म्हणून कन्फ्यूशियसच्या हवाली केले ! या शहराच्या लोकांच्या जीवनास हवा तसा आकार देण्यास व त्यांना पाहिजे तसे शिक्षण देण्यास कन्फ्यूशियस आता मुक्त होता. थोड्याच अवधीत बारीकसारीक सुधारणा करून आपल्या आदर्शवादाप्रमाणे कन्फ्यूशियसने लोकजीवनात क्रांती घडवून आणली. लोकांच्या वयपरत्वे आहाराची व्यवस्था त्याने लावून दिली. खाजगी समारंभास व सार्वजनिक उत्सवादी प्रसंगास लोकांनी कोणते पोषाख वापरावयाचे हेही ठरवून दिले. एकमेकांना नमस्कार करताना कोणते शब्द, केव्हा, कितीदा उच्चारावयाचे यासंबंधीही नियम घालण्यात आले. सर्व पुरुषांनी रस्त्याच्या उजव्या बाजूने रांगेत चालावे व बायकांनी डाव्या बाजूने जावे या नियमाची अंमलबजावणी सुरू

झाली. प्रेत वाहून नेण्याची पेटी कशी असावी व थडग्याची लांबीरुंदी किती व कशी असावी याचेही नियम ठरवून गेले. लोक निःस्वार्थी बनले. रस्त्यावर पडलेली वस्तू कोणीही उचलीनासे झाले. कारण ती चोरी असू शकते. कन्फ्यूशियसच्या छोट्या राज्यात लहानसान गुन्हे एकदम दूर झाले. ल्ह देशाचा राजा या तत्त्वज्ञ राजकारणी पुरुषावर एकदम संतुष्ट झाला आणि त्याने त्याला एकदम न्यायाधीशाच्या जागेवर नेमून टाकले.

> "—जादूच्या कांडीप्रमाणे सर्वत्र होणारा अन्याय थांबला. गुन्हे होतच नसत. गैरविश्वास व अप्रामाणिकपणा औषधालाही उरला नाही. सभ्यता व एकमेकांवरील विश्वास ही पुरुषांची भूषणे झाली. आचरणातील पावित्र्य आणि नम्रता हे स्त्रियांचे अलंकार बनले. कन्फ्यूशियसचे चीन घरोघरी दिसू लागले. आणि लोकांनी त्याचे नाव काव्यात ग्रथित करून टाकले."

कन्फ्यूशियसचा प्रयोग पूर्णपणे सफल झाला होता. तत्त्वज्ञानी माणसाच्या हातात राज्यकारभार आला तर काय काय गोष्टी होतील, याची चित्रे नंतर प्लेटोपासून अनेकांनी रंगविली आहेत. पण चीन देशाच्या या व्यवहारी तत्त्वज्ञान्याने आचरून दाखविलेले लोकजीवनाचे स्वरूप निःसंशय रमणीय व उद्‌बोधक आहे.

शेवटी कन्फ्यूशियस ल्ह प्रांताचा मुख्य प्रधान बनला व येथूनच त्याच्या पाडावास प्रारंभ झाला. कन्फ्यूशियसच्या असामान्य कर्तृत्वामुळे ल्ह प्रांताची होणारी भरभराट पाहून आसपासचे राजे लोक मत्सराने जळफळू लागले. ल्ह प्रांतातील सुधारणा व सुबत्ता पाहून त्यांना खंत वाटू लागली. लोकांची मने जिंकणाऱ्या राजाची सत्ता नेहमीच मोठी असते हे त्यांना चांगलेच समजत होते. कन्फ्यूशियस जर यापुढे मुख्य कारभारी राहील तर सबंध ल्ह प्रांत डोईजड होईल, या एकाच कल्पनेने

भोवतीचे राजे द्वेषाने त्रस्त झाले. आपलीही प्रजा ल्व प्रांतात जाऊन कन्फ्यूशियसचे पवाडे गाईल ही भीती त्यांना वाटू लागली. त्या सर्व राजांनी एकत्र बसून ल्व प्रांताचा राजा व कन्फ्यूशियस यांची ताटातूट कशी होईल याचा विचार केला. या भ्रमिष्ट तत्त्ववेत्त्याच्या छायेतून राजा कसा दूर होईल हाच विचार गंभीरपणे ते करीत होते. तत्त्वज्ञानापेक्षा अधिक आकर्षक व रमणीय असे दर्शन राजापुढे उभे केले तरच ल्वच्या राजास कन्फ्यूशियसचा विसर पडेल. या ठरावास अनुसरून त्सी प्रान्ताच्या राजाने दिसावयास अतिशय सुंदर अशा ऐंशी नृत्यांगना ल्वच्या राजाकडे पाठवून दिल्या. लावण्याने बहरलेल्या या मदिराक्षींचा परिणाम राजावर योग्य तोच झाला. त्या अद्वितीय सौंदर्याच्या दर्शनाने व मोहक कटाक्षांनी राजा मोहित झाला. परपक्षाच्या जाळ्यात तो पूर्णपणे सापडला; त्याने उघडेनागडे सौंदर्य सन्मानाने वाड्यात आणले व आपल्या मंचकावर बसविले आणि त्याच क्षणी शहाण्या कन्फ्यूशियसला रस्त्यात हाकून दिले ! राज्यातील सर्व सुधारणा एकदम थांबल्या. आपला धनी केव्हा तरी सावध होईल म्हणून कन्फ्यूशियसने वाट पाहिली; पण शेवटी निराश होऊन त्याला अज्ञातवासात भटकावे लागले.

*                *                *

कन्फ्यूशियस तेरा वर्षे भटकत होता. त्याचे ध्येय सफल झालेले पाहावयास कोणीही तयार नव्हते. जिकडे तिकडे त्याची हेटाळणी सुरू झाली. त्याला कोणी दाराशीही उभे करीनात. त्याच्या भोवती हजारो शिष्य गोळा झाले होते; पण सत्ता हाती आल्याखेरीज लोकजीवन सुखी करणे अशक्य आहे असा त्याचा विश्वास असल्यामुळे त्याचे नैराश्य वाढत गेले. राजे लोकांची पाशवी वृत्ती आणि प्रजेचे वाढणारे अज्ञान

पाहून कन्फ्यूशियस दुःखीकष्टी झाला. प्रवासाच्या वेळी तर त्याचे फारच हाल होत असत. प्रसंगी अन्न मिळण्याचीही पंचाईत होऊन बसे. लोकांनी त्याच्यावर शिव्यांचा भडिमार केला; कित्येकांनी त्यास दगडही मारले. ज्या झाडाखाली बसून कन्फ्यूशियस उपदेश करी ते झाडच एकाएकी त्याच्या अंगावर पडावे व त्यात तो चिरडून जावा म्हणूनही काही योजना आखण्यात आल्या. पण मोठ्या धीमेपणाने कन्फ्यूशियस याही आपत्तीतून मार्ग काढीत होता. सर्व प्रकारचे शिक्षण जणू तो घेत होता. आपल्या विपरीत परिस्थितीचे चित्र काढताना तो म्हणतो :—

'कन्फ्यूशियस ज्ञानासाठी इतका तहानेलेला आहे की, पुष्कळ वेळा खाण्यापिण्याचीही आठवण त्याला राहत नाही. आपल्या प्रयत्नांना यश येत आहेसे जरा दिसले की त्या आनंदात तो सारे दुःख विसरून जातो. ज्ञानोपासना करता करता व ध्येयसिद्धीसाठी धडपडत असता वार्धक्य जवळ येत आहे हे माझ्या ध्यानीही आले नाही.—' स्वतःसंबंधी विचार करावयास त्यास वेळ तरी कोठे होता ? ज्यांच्या जीवनात दुःखे आहेत, कष्ट आहेत. अपयश आहे, निराशा आहे, अशा सर्वांच्या दुःखाचा विचार एकटा कन्फ्यूशियस करीत असे. आपल्या धन्याचे हे वर्तन एका शिष्याला आवडले नाही. तो उद्गारला, "महाराज, या दरिद्री व मूर्ख लोकांबद्दल आपण एवढी चिंता का करता ?" त्यावर त्याने शांतपणे उत्तर दिले, "दीनदुबळ्या सामान्य जनतेच्या दुःखाशी मी एकरूप होऊ नको तर काय करू ?...या जगापासून दूर जाणे मला तरी अशक्य आहे...ज्या पशुपक्ष्यांशी आपले काहीही साधर्म्य नाही त्यांच्याशी एकरूप तरी कसे व्हावयाचे ?" कन्फ्यूशियसचा धर्म अशा प्रकारे व्यावहारिक होता. अतिरंजित अशा ध्येयात त्यास गुरफटून बसणे मानवणारे नव्हते. मागच्या व पुढच्या जन्मींची चर्चाही त्यास निरर्थक वाटत असे. परलोकासंबंधी प्रश्न करणाऱ्या आपल्या एका

शिष्यास त्याने उत्तर दिले, "जीवन जगावयाचे कसे तें मला नीट समजले नाही, समजावून सांगता आले नाही, मग मरणाच्या गोष्टीची कथा कशाला?...अलौकिक व दिव्य अशा अतिमानुष गोष्टींची चर्चा हवीच कशाला? माणसाची सेवा करीत राहणे हाच सर्वोत्तम धर्म आहे." कन्फ्यूशियसचा व्यावहारिक धर्म तो हाच.

मानवी व्यवहारात ज्या दृश्य घटना घडतात त्यांवरच कन्फ्यूशियसची दृष्टी असे. तत्त्वज्ञानातील गूढरम्य वातावरणात हवेत किल्ले बांधण्याची हौस त्याच्या स्वभावातच नव्हती. त्याने आपल्या तत्त्वज्ञानाचे सार एकाच सूत्रात गोविले आहे. "जशास तसे हा माणसाच्या वर्तणुकीचा योग्य असा धर्म आहे. जे तुम्ही स्वतःच्या बाबतीत करू इच्छिणार नाही ते दुसऱ्यांच्या बाबतीत करू नका.–" कन्फ्यूशियसने जी नीतितत्त्वे सांगितली ती त्याची स्वतःचीच होती असेही नव्हे. पूर्वसूरींच्या ज्ञानभांडारातूनच त्याने आपल्या सुभाषितवजा सूक्तांची पेरणी चिनी भाषेत मुक्त हस्ताने केलेली आहे. वैयक्तिक धर्म व सामाजिक धर्मविचार यांचे एवढे समतोल व मर्मग्राही विवेचन इतरत्र सापडणे कठीण आहे. ज्ञानाचे सुवर्णकण त्याने सर्वत्र पेरून ठेवले व म्हटले, "मानवाच्या हृदयात या सत्त्वबीजांची रुजणी होऊ द्यात. कदाचित त्यांनाच जीवनाची रसाळ फळे लगटतील." सुव्यवस्थित सरकारचेही स्वरूप कन्फ्यूशियसने अनेक वेळा स्पष्ट करून सांगितले आहे. भरपूर अन्नवस्त्र, संरक्षकवर्ग आणि विश्वासार्ह प्रजा या तीन मुख्य गोष्टी सुव्यवस्थित राज्यकारभारास लागतात. लोकांचा एकमेकांवरील व सरकारवरील विश्वास या गोष्टींस तर कन्फ्यूशियसने फारच महत्त्व दिले आहे.

पापपुण्याच्या वा स्वर्गनरकाच्या कल्पनांत कन्फ्यूशियसची धर्मचर्चा गुरफटलेली दिसत नाही. रामदासांप्रमाणेच त्यानेही उत्तम पुरुषांची लक्षणे सांगितली आहेत. व्यासंग, सद्‌वर्तन, प्रामाणिकपणा आणि विश्वासू

वृत्ती या चार महत्त्वाच्या लक्षणांनी युक्त असा उत्तम पुरुष ( Superior Man ) असतो. प्रेम व ज्ञान या गोष्टी तर या पुरुषाच्या आत्म्याप्रमाणे आहेत. ( Love and wisdom are the heart and soul of the Superior Man ) वैयक्तिक श्रेष्ठता माणसाने प्राप्त करून घेतली की समाज आपोआप सुधारत राहील असा त्यांचा विश्वास होता. व्यक्तित्वाचा उदोउदो तर आधुनिकांना लाजवील असा त्याने केला आहे. राजा हा पित्याप्रमाणे असून प्रजा ही त्याची लेकरे आहेत ही भावना तर अनेक ठिकाणी त्याने पुरस्कारिली आहे. राजा अन्याय करू लागला तर त्यास प्रजेने विरोध करावा. ( The right of rebellion is of divine origin ) ही क्रांतिकारक विचारपरंपराही त्यानेच निर्माण केलेली दिसते.

प्लेटोप्रमाणेच कन्फ्यूशियसने आदर्श राज्यवस्थेचेही सुंदर चित्र रंगविले आहे. सर्वोत्तम राज्यघटना आपल्या मंत्रिमंडळाचा चैनविलास संपुष्टांत आणते, आणि संपत्तीची समप्रमाणात वाटणी लोकांत करण्याच्या दृष्टीनेही तिचे प्रयत्न असतात. सर्वोत्तम राज्यव्यवस्थेत शिक्षांचे प्रमाण कमी होऊन शिक्षणाचे क्षेत्र वाढत असते. वर्तनाचे नियम आणि संगीतादी कला लोकांना शिकविण्याकडे सरकारचा कल असला पाहिजे. कन्फ्यूशियस स्वतः उत्तमपैकी अलगुज वाजवीत असे. त्याची संगीतावर नितान्त भक्ती होती. या द्रष्ट्या धर्मप्रवर्तकाने सुखीसमाधानी राज्यव्यवस्थेचे मनोहर असे चित्र रंगविले आहे. " सर्व विश्वात माणसामाणसांत बंधुभाव नांदेल; सर्व जगात एकच लोकसत्तात्मक राज्य निर्माण होईल; मोठ्या ममतेने आणि सच्चेपणाने लोक एकमेकाशी बोलणी करतील आणि सर्व जगतात शांतता प्रस्थापित होईल. लहान मुले मोठ्यांच्याकडे वडीलकीच्या आदराने पाहतील, मोठी माणसे लहानांकडे वात्सल्याच्या कौतुकाने पाहात राहतील. प्रत्येक पुरुषाला स्वतःचा हक्क राहील. प्रत्येक स्त्रीला स्वतंत्र व्यक्तित्व उरेल. दरोडेखोर, खुनी, फसवे यांचा पृथ्वीवरून

नायनाट होईल आणि मी म्हणतो त्याप्रमाणे एकतेचे व शांततेचे राज्य सर्वत्र स्थापन होईल. " पण कन्फ्यूशियसचे हे सर्व स्वप्न तर नव्हे? अडीच हजर वर्षे होऊन गेली, माणसाने आपला स्वभाव सोडलेला दिसत नाही. श्रीकृष्ण, ख्रिस्त, बुद्ध, कन्फ्यूशियस यांचे सर्व उपदेश व भाकिते खोटी की काय? ––कन्फ्यूशियस मोठा धोरणी तत्त्वज्ञ होता. त्याने बजावले, " अशा प्रकारे आदर्श मानवसमाज निर्माण होईल हे खरे, पण केव्हा? तर When I have met with a man who loves Virtue as he loves Beauty. " सद्गुणावर व सौंदर्यावर प्रेम करावयास माणूस शिकणार तरी केव्हा?

० ० ०

कन्फ्यूशियसच्या शिकवणुकीचे वर्णन तरी कोठवर करावे? चीन देशाच्या पोराबाळांच्या तोंडी कन्फ्यूशियसची वचने सहजासहजी दिसून येतात. टोइसम, बुद्धधर्म, ख्रिश्चनधर्म या सर्वांना तोंड देऊन आजही कन्फ्यूशियसचा व्यावहारिक धर्म समतेचा व शांततेचा उद्घोष करीत जगाला मार्ग दाखविण्यास तयार आहे. कन्फ्यूशियसच्या व्यावहारिक शहाणपणास आजचे जागतिक मुत्सद्दीही भुललेले दिसतात. अमेरिकेतील मॉडर्न पॉकेट लायब्ररीनें काही वर्षांपूर्वी आपल्या मालेत Man and Man; The Social Philosophers या नावाचे जे एक विचारप्रवर्तक पुस्तक प्रसिद्ध केले आहे, त्यात कन्फ्यूशियसच्या कामगिरीचा मुक्तकंठाने गौरव केलेला आहे. कन्फ्यूशियसच्या धर्मविचारांचा संक्षेपाने आढावा त्याच्या सामाजिक अर्थापुरता या पुस्तकात उद्बोधक रीतीने घेण्यात आलेला आहे.

छ राजाच्या दरबारातून निघाल्यानंतर तेरा वर्षांपर्यंत कन्फ्यूशियस भटकत राहिला. चौदाव्या वर्षी परिस्थिती थोडी पालटली. मोहास बळी

पडलेल्या राजाची कारकीर्द संपल्यानंतर त्याच्या मुलाने कन्फ्यूशियसची योग्यता ओळखून त्यास परत बोलाविले. कन्फ्यूशियस आपल्या धन्याची प्रीती जाणून होता. केव्हातरी ल्व प्रांताच्या राजाकडे आपण जाणार ही त्याची निष्ठा होती. तेरा वर्षांच्या भ्रमन्तीत कोणाही राजाचे फुकट वेतन त्याने पत्करले नाही. वतनाचा व देणगीचा लोभ दर्शविणाऱ्यांना त्याने स्वच्छ सांगितले की, 'माझ्या श्रमांचा मोबदला घेतल्याखेरीज तुमची एक पैही मी घेणार नाही....जाडेभरडे तांदूळ मी खाईन, स्वच्छ पाणी पिईन आणि दुमडलेल्या हाताच्या उशीवर मला शांतपणे झोप घेता येईल. या सर्व गोष्टींत मला आनंदच वाटेल. तुमच्यासारख्या जुलमी व दुर्गुणी राजांपासून मानसन्मान मिळविणे व्यर्थ होय... '

ल्वच्या राजपुत्राने त्याला सन्मानाने बोलावले, पण कन्फ्यूशियस आता सत्तरीच्या आसपास आला होता. तेरा वर्षांच्या भटकंतीमुळे तो अधिकच वृद्ध दिसू लागला. ल्वच्या राजपुत्राकडे तो आला पण आता पूर्वीचा दुर्दम्य आशावाद आणि कर्तृत्वशक्ती यांचा ऱ्हास झालेला होता. पण आयुष्याच्या सायंकाळी थोडी स्वस्थता लाभल्यावर त्याने आपले एकुलते एक स्वतंत्र असे पुस्तक Spring and Autumn लिहून संपविले. बाकीचे त्याचे ग्रंथ संपादित असे आहेत. तो स्वतःस "Transmitter, not a maker" म्हणून संबोधीत असे. शेवटी शेवटी कन्फ्यूशियसला दुःखाचे दिवस आले. त्याचे प्रिय शिष्य मरून गेले. एकुलता एक मुलगा होता, त्याचेही निधन झाले. पत्नीशी काडीमोड घेतली होती तरी तिजवर त्याचा लोभ होता. तीही निवर्तली ! कन्फ्यूशियस उदासवाणा दिसू लागला. सर्व जगास हसरे आशावादी तत्त्वज्ञान जन्मभर सांगण्याचा अट्टाहास करणारा कन्फ्यूशियस खिन्न झाला. "आता आपणही निघावे. आपली वेळ आलीच आहे..." या अर्थाचे उद्गार त्याने काढण्यास सुरुवात केली. खि. पू. ४७८ च्या हिवाळ्यात एके

दिवशी संध्याकाळी आपल्या घराच्या दरवाज्यात संथपणे उभे राहून तो गुणगुणत होता :

" The Great Mountain must crumble;
The strong beam must break;
And the wise man withers away like a plant."

त्सेकुंग नावाच्या शिष्याने आपल्या स्वामीचे हे गीत ऐकले आणि तो चपापला. त्याला भीती वाटू लागली. कन्फ्यूशियसची प्रकृती फारच ढासळली आहे हे त्याने जाणले. त्याच दिवशी कन्फ्यूशियसने अंथरूण धरले आणि आठ दिवसांच्या आत पूर्वेकडील या शहाण्या माणसाचा अंत झाला! लू नगराच्या उत्तरेस सी नदीच्या तीरावर शिष्यांनी कन्फ्यूशियसचा दफनविधी केला; आणि सर्वांनी तीन वर्षेपर्यंत शोक-प्रदर्शन म्हणून तो काळ त्याच ठिकाणी विरक्त बुद्धीने काढला. त्याचा अत्यंत विश्वासू शिष्य त्सेकुंग यास हाही काळ थोडाच वाटला. म्हणून त्याने एकट्याने आणखी तीन वर्षेपर्यंत आपल्या गुरूच्या समाधीशेजारी राहण्याचा निश्चय केला.

* * *



ख्रिस्तपूर्व ४ ते इ. स. २९

## ६. जीझस ख्रिस्त

नाझरेथ येथील सुताराच्या एका तरुण मुलाने कॅपेरनाम येथे मोठाच लौकिक मिळविला. मोठ्या देखण्या व तरतरीत अशा या जीझसने सर्वांची चित्ते आकर्षित करून घेतली. भावपूर्ण डोळे व शांत आणि प्रसन्न वृत्ती यांचा

वेध ज्याला त्याला वाटायचा. एकदा गॅलिली समुद्राच्या काठाने हा जीझस हिंडत असताना त्याला सायमन आणि अँड्र्यू या नावाचे दोन पुरुष मासे धरताना दिसले. जीझस त्यांच्याजवळ गेला आणि म्हणाला, " तुम्ही माझ्याबरोबर या. तुम्ही तुमच्या जाळ्यात आज मासे पकडता; पण थोड्याच दिवसांत माणसांना प्रेमजालात पकडाल. या माझ्या संगतीत. " आणि नवल असे की, दोनही माणसे जीझसची शिष्य बनली.

गॅलिलीच्या आसपास असणाऱ्या ज्या ज्या खेड्यात जीझस गेला त्या त्या ठिकाणी त्याने माणसांना असेच वेधून घेतले. त्याच्या आवाजातच एक अद्‌भुत अशी जादू होती. कॅपेरनाम येथील एका रोमन अधिकाऱ्याचा एक मुलगा अर्धांगवायूने अंथरुणास खिळून होता. सर्व डॉक्टर्सनी उपचार केले, पण काही उपयोग झाला नाही. शेवटी हा रोमन अधिकारी या सुताराच्या पोराकडे आला. जीझसने त्याच्याकडे पाहून म्हटले, " तू तुझ्या मुलाकडे घरी जा. तुझ्या मनासारखे होईल. " आणि त्याचा मुलगा पूर्णपणे बरा झालेला त्याला दिसला !

' या मुलाला काही दैवी पाठबळ असावे ' असे गावची माणसे म्हणत असत. एक नाविक एकदा आपल्या मित्रास सांगत होता, " गॅलिली समुद्रावरून आमचे जहाज चालले होते. एकदम मोठ्या वादळास सुरुवात झाली. आमचे जहाज आता कोलमडणार, उलटणार अशी भीती सर्वांना वाटली. पण जहाजात असणारा जीझस जणू काहीच होत नाही अशा वृत्तीने शांतपणे झोपला होता. पण आम्ही मात्र भीतीने गांगरून गेलो होतो. या संकटातून वाचीव म्हणून आम्ही त्याला प्रार्थना केली. मग त्याने आम्हांस ' भिऊ नका ' असे सांगितले व तो सोसाट्याने वाहणाऱ्या वाऱ्याशी बोलला. तुफानाने त्याचे ऐकले.

एकदम सर्व शांत झाले. आमचे जहाज पहिल्यासारखे मोठ्या डौलाने चालू लागले. असा हा जीझस दैवी गुणांचा !"

लहान वयातच जीझसच्या अशा कितीतरी गोष्टी सांगितल्या जातात. त्याच्या रूपाचा, त्याच्या गुणांचा मोह ज्याला त्याला वाटे. याच्या जन्माआधीपासूनच भोवतीच्या लोकांना देवाचा पुत्र आता लौकर अवतार घेणार असल्याचा वेध लागला होता. रोमच्या अधिकाऱ्यांनी पॅलेस्टाइन देश जिंकलेला होता. या देशात मोठी अनर्थपरंपरा सुरू होती. जिकडे तिकडे अंदाधुंदी पसरली होती. कुणी कुणास विचारीत नव्हते. अशा या विपरीत काळातच देवाचा पुत्र अवतार घेतो अशी लोकांची श्रद्धा होती. जो तो देवाच्या पुत्राच्या आगमनाची वाट पाहण्यात उत्सुक होता.

या अवताराच्या शोधासाठी, देवाच्या सुपुत्रासाठी तीन मोठे पंडित अती उत्सुक बनले होते. त्यांनी एकदा पूर्वेच्या बाजूस एक तारा पाहिला. तो तेथून हळूहळू खाली सरकत होता. त्याच्या अनुरोधाने हे तीन पंडित त्याचा माग घेत होते. शेवटी जेरुसलेमहून निघून तो तारा बेथलेहम गावी थांबला. याच सुमारास येथील एक सुतार जोसेफ आणि त्याची बायको मेरी यांच्या घरी जीझसचा जन्म झाल्याचे त्यांना समजले. या तीन पंडितांनी या लहानग्या देवपुत्राचे दर्शन घेऊन समाधान व्यक्त केले.

पॅलेस्टाइनमध्ये देवपुत्राचा जन्म होणार, त्याचा अधिकार सर्वत्र पसरणार अशी कुणकुण रोमन अधिकाऱ्यांच्या कानावर होतीच. जीझस जन्मला त्याच रात्री जोसेफला स्वप्न पडले. रोमन लोक आपल्या मुलाला ठार मारण्याचा कट करीत आहेत हे त्याच्या ध्यानात आले. काही दिवस मग जोसेफ, जीझस व मेरी यांना घेऊन इजिप्तमध्ये गेला. रोमन अधिकाऱ्यांची दृष्टी निवळल्यावर तो परत आला..

जीसझचे गाव नाझरेथ. डोंगरदरीच्या उतारावर वसलेले. सूर्य-प्रकाशात चमकणारे. गवताळ भूमीने सुशोभित झालेले. अशा या आड-बाजूस असणाऱ्या एका सामान्य घरी जीझसचे शिक्षण सुरू झाले. तिथे शाळा नव्हती, तिथे धर्मसंस्था नव्हती. काही धार्मिक विचार परंपरेने आले होते. त्यांच्या गोष्टी मेरी आपल्या मुलाला सांगत असे. सकाळ-संध्याकाळ ती त्याच्याकडून प्रार्थना म्हणवून घेई. बायबलच्या जुन्या कराराचे मधून मधून वाचन होई. जीझस मोठा विचारी मुलगा होता. आपल्या वयाच्या मुलांत तो कधी मनापासून खेळला नाही, बागडला नाही. चर्चेमधील चर्चा चित्त लावून ऐकण्यात त्याला मोठीच गोडी वाटे. निसर्गाच्या सोबतीने, डोंगरदऱ्यांतून एकटेच भटकण्यात त्याला मौज वाटे.

जीझसला बारावे वर्ष लागले. आता त्याला धर्माची दीक्षा द्यावयास हवी होती. जेरुसलेमच्या मंदिरात जाऊन धार्मिक विधी करणे अगत्याचे होते. नाझरेथपासून जेरुसलेम पंचावन्न मैल दूर होते. ही यात्रा कुणी उंटावरून तर, कुणी गाढवावरून करीत. जेरुसलेमविषयी लोकांच्या अंतःकरणात मोठेच प्रेम असे. अनेकांना या पवित्र स्थानाची ओढ होती. हजारो यात्रेकरू चोहोबाजूंनी या क्षेत्राकडे लोटत असत. जीझस जेरु-सलेमास येण्यासाठी पायीच निघाला. एका पवित्र स्थानाच्या दर्शनासाठी तो उत्सुक होता. त्याचे मन उल्हसित बनले होते. पण जसजसे जेरुसलेम जवळ येत राहिले तसतसे त्याचे मन उतरत गेले. अगदी परक्या अशा रोमन शिपायांची कडक वागणूक त्याला आवडली नाही. भोवतीचे लोकही त्याला स्वार्थाने प्रेरित होऊन देवापाशी येतात असे दिसले. देवाच्या दारात लोकांनी बाजारच मांडला होता. तेथे किळसवाणी अशी व्यापारी देवाणघेवाण होती. मेंढयांचा, शेळ्यांचा भयानक आवाज होत होता. यांच्या रक्ताचे पाट वाहात होते. धर्मग्रंथांच्या प्रवचनात यांत्रिक

निर्जीवता आली होती. अंतःकरणाच्या धर्मास कुणीच विचारीत नव्हते. बाह्य अवडंबराचे प्रस्थ फार माजले होते.

जेरुसलेमच्या दर्शनाने धर्म किती हीन अवस्थेला पोचला आहे एवढेच समजून जीझस अगदी खिन्न होऊन गेला. तो आपल्या सोबत्यां-बरोबर परत नाझरेथ गावी आला. तेथील एकान्तात व डोंगराळ भागात त्याने आणखी काही वर्षे काढली. त्याचे वडील मरण पावल्यावर आपल्या घरचा सुतारकीचा धंदा तो पाहू लागला. रविवारी तो मंदिरात जाऊन प्रार्थना करी. धर्मग्रंथातील विचारांवर चर्चा करी.

रूढ चाकोरीमधील अर्थापेक्षा वेगळा अर्थ जीझस लावी. त्याच्या प्रवचनांनी भोवतीचे लोक संतुष्ट होत असत.

याच सुमारास जीझसच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा प्रसंग घडला. जॉर्डन नदीच्या काठी जॉन नावाचा सत्पुरुष लोकांना बाप्तिस्मा देण्या-साठी आला आहे असे जीझसला समजले. इतर लोकांबरोबर जीझस जॉनकडे गेला. त्याच गर्दीत त्याने ‘ मला पवित्र पाण्यात स्नान करू द्या. मला बाप्तिस्मा द्या ’ असे त्याने जॉनला म्हटले. जॉनने जीझसकडे पाहिले मात्र. या तरुण पोराचे भावपूर्ण डोळे व मुखावरचे तेज पाहून तो चमकला. या पोराच्या अंगी अद्‌भुत शक्ती असल्याचे त्याच्या ध्यानी आले. जॉनने मोठ्या सद्‌भावनेने जीझसला बाप्तिस्मा दिला.

जीझसच्या आयुष्यास येथून पुढे वेगळे वळण लागणार होते. त्याला लौकिक संसाराचा, व्यवहाराचा वीट आला. एकान्तवासाची गरज त्याला मोठीच वाटू लागली. डोंगरांच्या एका ओसाड भागात त्याने चाळीस दिवसपर्यंत चिंतन केले. न्याय, नीती, शांती इत्यादींचा धर्म कसा वाढेल याविषयी त्याने विचार केला. पुनः जेरुसलेमच्या यात्रेस जावे असे त्याच्या मनात आले. जेरुसलेमचे स्वरूप काही बदलले नव्हते. तोच बाजारी-

पणा, तोच देवाच्या नावावर हिंसाचार, तीच व्यापाऱ्यांची, संधिसाधूंची गर्दी जीझसच्या मनात या सर्व प्रकारची चीड उत्पन्न झाली. त्याच्या अंगात एक प्रकारचे वारे संचारले. त्याने बळी देण्यासाठी आणलेल्या सर्व जनावरांना मोकळे सोडून दिले. व्यापारी लोकांचे कुटिल डाव उधळून दिले. देवळाचे पावित्र्य राखण्यासाठी तो उत्सुक होता. खऱ्या भाविकांना त्याचे हे कृत्य आवडले. अंतःकरणावर संस्कार करणारा नवा धर्म लोकांना सांगण्यासाठी तो आता उत्सुक होता.

आता जीझसची कीर्ती सर्वत्र पसरू लागली. अनेक लोक त्याच्यापाशी येऊ लागले. अनेकांनी त्याचा उपदेश घेतला. नाझरेथ, कॅपेरनाम येथील लोकांचा पुढारी सर्व पॅलेस्टाईन प्रांतात आता प्रसिद्ध झाला. त्याच्या अनुयायांची संख्या वाढत राहिली. तो एकदा या लोकांना घेऊन दूरच्या डोंगरावर गेला. तेथे त्याने त्यांना आपल्या धर्माची रहस्ये समजावून दिली. पर्वतावरील या प्रवचनात त्याने खऱ्या धर्माचे स्वरूप स्पष्ट व मोजक्या शब्दांत विशद केले. अंतःकरणाने लीन असणाऱ्या, विनम्र होणाऱ्या लोकांना परमेश्वर जवळ आहे. पवित्र व दयाळू लोकांना परमेश्वर जवळ घेतो, आजवरच्या सर्व धर्मपुत्रांना नष्ट करण्यासाठी मी आलेलो नाही, तर त्यांचेच कार्य पुरे करण्यासाठी माझा प्रयत्न आहे. दुसऱ्यास ठार मारणे हे पाप आहे. दुसऱ्यावर व्यर्थ रागावूही नका. तुम्ही कुणाचाही प्रतिकार करू नका. कुणी एका गालावर मारले तर दुसरा गाल पुढे करा, तुम्ही आपल्या शत्रूवरही प्रेम करा, दुसऱ्यांच्या चुकांबद्दल क्षमा करा, परमेश्वराजवळ शुद्ध अंतःकरणाने मागा म्हणजे मिळेल, शोधा म्हणजे सापडेल, दार ठोठवा म्हणजे ते उघडेल, दुसऱ्याने आपल्याशी जसे वागावे असे तुम्हांस वाटते, तसे तुम्ही दुसऱ्यांशी वागा. अशा प्रकारचा साधा, सोपा पण माणसाच्या मनाची मशागत करणारा धर्म जीझसने लोकांना सांगितला. त्यात कर्मकांड नव्हते, त्यात व्यापारी

देवाण-घेवाण नव्हती, त्यात ग्रांथिक पांडित्य नव्हते, ईश्वर आपला पिता आहे, आपण त्याची लेकरे असून एकमेकांचे बंधू आहोत हा फार थोर उपदेश जीझसने लोकांना दिला.

जीझस आपल्या बारा शिष्यांसहित धर्मोपदेश करीत सर्व खेड्यांतून हिंडत असे. त्याच्या साध्या, सरळ व अंतःकरणास भिडणाऱ्या उपदेशाची छाप जनमानसावर चटकन पडत असे. त्याच्याभोवती लोक नेहमीच जमलेले असत. कुणाचा रोग तो बरा करी, कुणाच्या मनातील तळमळ तो दूर करी. याच सुमारास त्याला उपदेश देणाऱ्या जॉन दि बॅप्टिस्टचा रोमन अधिकाऱ्यांनी खून केल्याचे जीझसला समजले. त्याच्या मनास या घटनेने फार वेदना झाल्या. या जॉनने जुडा येथे धर्मप्रसारासाठी आपले प्राणही गमावल्याचे पाहून जीझस अंतर्मुख झाला. त्याच ठिकाणी जाऊन आपणही तेच कार्य करावे असे त्याच्या मनाने घेतले. तो निर्भयपणे जेरुसलेमला गेला. तेथील लोकांना त्याने आपल्या नव्या धर्माचा उपदेश करायला प्रारंभ केला. जुन्या पंडितांना जीझसचे हे कृत्य आवडले नाही. त्यांनी त्याचा निषेध केला. त्याचा छळ करण्यास त्यांनी सुरुवात केली. स्वार्थ बुडत होता, धर्माचा बाजार बसत होता, धर्माच्या नावाखाली अनाचार संपत होता; आणि हे सर्व या जीझसमुळे होत असल्याचे त्यांच्या ध्यानी आले. त्यांनी मग जीझसलाच त्रास द्यायला सुरुवात केली. जीझस हा धर्मद्रोह, राजद्रोह करीत असल्याची हाकाटी त्यांनी चालू ठेवली. हेब्रू पंडितांचा व त्याचा वादविवाद होई. मतभेद वाढत असत. अंतःकरणाचा धर्म कुणास नको होता आणि जीझस तर त्याचाच प्रवर्तक होता.

जीझसचा द्वेष करण्याचे आणखी एक कारण लोकांच्या मनात होते. त्याच्याभोवती आता पुष्कळच लोक जमत. त्याच्या अनुयायांची

संख्या वाढत होती. जीझस हा नाझरेथचा अवतारी पुरुष असल्याचे लोक मानीत होते. जीझसच्या या लोकप्रियतेचा हेवा सर्व पंडितांना वाटला. रूढ धर्म बुडणार, व्यापारी वृत्तीचा व्यवहार बंद होणार आणि जीझसचा नवा धर्म वाढणार या कल्पनेने लोक खवळले होते. जीझसवर सूड घ्यायला ते प्रवृत्त झाले. जीझसचा मुक्काम या वेळी जेरुसलेमजवळच बेथनी नावाच्या गावी होता. धर्माचे अभिमानी आपल्याविरुद्ध उठले आहेत. जॉन दि बॅप्टिस्टसारखेच ते आपणास मारणार हे त्याला समजून चुकले होते. आपल्या अंतकाळचे स्पष्ट चित्र जीझसच्या डोळ्यांसमोर उभे राहिले. तसे त्याने आपल्या शिष्यांना बोलूनही दाखविले.

जेरुसलेमच्या यात्रेच्या निमित्ताने असंख्य लोक चहू दिशांनी जमत होते. लोकांच्या मनात उत्साह होता, पण जीझस मात्र मनातून खिन्न झाला होता. यात्रेच्या आदल्या दिवशी एका शिष्याच्या घरी जीझस आपल्या बारा शिष्यांबरोबर भोजन करीत होता. जो तो जीझस-बरोबर बसण्याच्या प्रयत्नात होता. इतक्यात जीझस उठला व त्याने आपल्या सर्व शिष्यांचे पाय पाण्याने धुतले. कुणी कुणापेक्षा मोठा नाही हे त्याला दाखवायचे होते. जेवण सुरू झाले तरी कुणाचेच लक्ष भोजनावर नव्हते. सर्वत्र शांत व थोडे भेसूर वातावरण होते. मध्येच थबकून शांत चित्ताने जीझस म्हणाला, ‘ शिष्यहो, तुमच्यापैकी एक-जण उद्या माझा विश्वासघात करणार आहे. ’ जीझसच्या या वाक्याने प्रत्येकजण चपापला. कुणी कुणाशी बोलत नव्हते. शिष्यमंडळी कावरी-बावरी झाल्याचे पाहून तो शांत व प्रेमळ वाणीने म्हणाला, ‘ माझा विश्वासघात करणारा जन्मास आला नसता तर बरे झाले असते....पण मित्रांनो, मी आता फार थोडा वेळ तुमच्यांत आहे. तुम्ही मला शोधाल, पण मी आता अशा ठिकाणी जाईन की तुम्ही तेथे येऊ शकणार नाही...माझे शेवटचे सांगणे तुम्ही नीट ऐका. एकमेकांशी प्रेमाने वागा.

मी जसे तुमच्याशी वागलो, तसेच तुम्ही एकमेकांशी वागा. तरच माझ्या शिष्यत्वाचे नाव राखाल ..'

आपला अंतकाळ जवळ आल्याचे ओळखून जीझस आपल्या शिष्यांची काळजी घेत होता. यांच्यापैकी एकजण उद्या त्याच्यावरच उलटणार होता. या रात्री जीझस गेयसीमेन नावाच्या बागेत ध्यान करण्यासाठी गेला होता. जुडास नावाच्या शिष्याखेरीज इतर सर्व शिष्य त्याच्याबरोबर होते. ते सर्व झोपी गेले. एकटा जीझस ध्यानमग्न असताना मध्यरात्री हातात कंदील, शस्त्रे घेऊन येणाऱ्या शिपायांच्याबरोबर जुडासने त्या स्थानास वेढा दिला. जीझस शांतपणे अधिकाऱ्यांना म्हणाला,

"तुम्हांस कोण हवे? कशासाठी तुम्ही एवढया रात्री....?"

"नाझरेथचा जीझस कोण?"

"मीच आहे तो...काय काम?"


जीझसचे वाक्यही पूर्ण झाले नाही. अधिकाऱ्यांनी जीझसला पकडले या वेळी त्याचे उरलेले शिष्य जीझस आपला कुणी नाही असे समजून पळून गेले. जीझसची चौकशी रोमन अधिकारी पाँटिअस पायलेट याच्यासमोर झाली. देवाचा व राजाचा भयंकर अपराध जीझसने केला असल्याचा आरोप ठेवण्यात आला. लोकांना चिथावून धर्माविरुद्ध वर्तन जीझस करतो असे सांगण्यात आले. गॅलिली येथील प्रमुख हेरॉड अँटिपस याच्यापुढे जीझसला हात बांधून उभे करण्यात आले. चौकशीचे नाटक झाले. हेरॉडने जीझसला फाशीची शिक्षा ऐकविली. नाझरेथच्या जीझसला क्रुसावर चढवून मारावे अशी शिक्षा झाली. दयेचा, शांततेचा, न्यायाचा, बंधुत्वाचा धर्म सांगणाऱ्या जीझसला देहान्त शासन द्यावे असे रोमच्या सत्तेने ठरविले. राजाविरुद्ध कट करणाऱ्या बाराब्बास यासही फाशीची शिक्षा झाली होती; पण ती रद्द झाली व जीझसची

कायम करण्यात आली. त्याच्याबरोबर आणखी दोन चोरांना क्रुसावर चढवायचे होते.

मानवजातीस शांतीचा, समतेचा, बंधुत्वाचा संदेश देणाऱ्या ख्रिस्तास फासावर देण्याचा हा विलक्षण सोहळा गोलगॉथा शहराजवळच्या टेकडीवर होणार होता. हजारो लोक हे दृश्य पाहण्यासाठी जमा झाले. काही कुचेष्टेने हसत होते, काही धर्मद्वेष्टा आता संपणार म्हणून आनंदित होते, आणि काही थोड्या लोकांच्या चित्तात दुःखाची वेदना उठत होती, पण ती प्रकट करणे त्यांना त्या वेळी शक्य नव्हते.

बाराबाससाठी तयार केलेला भला मोठा क्रूस जीझसला स्वतःच्या खांद्यावरून घेऊन जावा लागला.. बाराबास सुटला होता. त्याचा क्रूस ख्रिस्ताला उपयोगी पडला. रोमन अधिकारी या अखेरच्या क्षणीही जीझसची कुचेष्टा करीत होते. जीझसला याचे भारी वाईट वाटले. ' देवा, तू यांना क्षमा कर. कारण आपण काय करीत आहोत हेच यांना समजले नाही. ' जीसझला क्रुसावर चढविण्यात आले. त्याच्या हातांना, पायांना खिळे ठोकण्यात आले. सर्व वेदना त्याने शांतपणे सहन केल्या. " देवा, मला तू विसरलास का रे ? हा असा माझा अंत..." एवढे बोलताच जीझसचा प्राण गेला. त्याचे शरीर क्रॉसवर लोंबू लागले, जीझसचा शेवट असा झाला. पण त्याला देव कसा विसरणार ? त्याचा अंत भयानक झाला तरी त्याचा धर्म त्याच्या वधानंतर सर्वत्र पसरला. एका मोठ्या धर्माचा प्रसारक म्हणून जीझस ख्रिस्त प्रसिद्ध झाला.

* * *



सन ७७८-८२० अथवा
ख्रि. पू. ५०९-४७७

# ७ : आद्य शंकराचार्य

केरळ प्रांतातील एक लहानसे कालडी नावाचे छोटे गाव. अती निसर्गरम्य असून शेजारूनच पूर्णा नदी वाहते. या गावामधील एका लहानशा घरात एक वयस्कर बाई चिंतातुर होऊन बसली होती. तिचा संसार बेताचाच

व आटोपशीर होता. गावामधील श्रीवृषाद्रिनाथाच्या कृपेने तिला सात वर्षांपूर्वी एक बुद्धिमान पुत्र झाला. शंकर असे तिने त्याचे नाव ठेविले. त्याची बालबुद्धी उगवत्या सूर्याप्रमाणे प्रकाशमान होत होती. त्याच्या वडिलांनी, शिवगुरूंनी त्याला तिसऱ्याच वर्षी शिकविण्यास आरंभ केला. एकदा ऐकले की शंकराचे सर्व पाठ होई. पाचव्या वर्षीच शंकराने व्याकरण, साहित्य इत्यादी शास्त्रांचा अभ्यास पूर्ण केला. याच वर्षी त्याची मुंज झाली. विष्णुशर्मा किंवा चित्सुखाचार्य यांची व शंकराची भेट गुरुकुलात झाली. वयाच्या आठव्या वर्षीच तेथीलही अध्ययन शंकरने पूर्ण केले. 'बालबोधसंग्रह' नावाचा एक ग्रंथ त्याने वयाच्या सहाव्या वर्षीच रचून सर्वांना चकित केले.

शंकराचे वाढते बुद्धिवैभव पाहण्यासाठी त्याचे वडील जिवंत राहिले नाहीत. शंकरास आठवे वर्ष लागले तेव्हा शिवगुरू निधन पावले. सर्व भार माता आर्याम्बा व लहानगा शंकर यांच्यावर येऊन पडला. पति-निधनाचे दुःख कसेबसे सावरले जाते न जाते तो आर्याम्बेस आणखी एका संकटास तोंड द्यावे लागले. वयात येऊ पाहणारा एकुलता एक मुलगा संसार करणार नाही असे म्हणत होता. घरातून दूर निघून जावे, संन्यास घेऊन लोकोद्धाराचे कार्य करावे अशा विचारात शंकर होता, परंतु त्याची आई त्याला परवानगी देत नव्हती. एकुलता एक मुलगा निघून गेल्यावर मग आपणास कोण, अशी चिंता तिच्या मनास होती. हा महाबुद्धिवान व प्रखर मुलगा आपल्या घरात राहणार नाही. तो न कळविताच एके दिवशी निघून जाईल की काय, अशी शंका वारंवार तिच्या मनात येत असल्याने ती कष्टी होऊन दिवस कंठीत होती.

अशाच एका दिवशी काही मुले आर्याम्बेच्या घराभोवती जमून गडबड करू लागली. ही मुले म्हणत होती, "माताजी, लौकर चला. तुमचा शंकर नदीत बुडतोय. चला तुम्ही." माता आर्याम्बेचे चित्त

उन्मळून गेले. ती तशीच ' शंकर शंकर ' करीत नदीकाठी आली. नदीमध्ये शंकर गटांगळ्या खात असून त्याचा पाय मगरीने धरला असल्याचे तिला समजले. व्यथित हृदयाची ती माता कळवळून बोलली,

" शंकर, लौकर काठावर ये रे. माझा जीव पाहा कासावीस झालाय. "

" आई, मी नदीबाहेर येतो. या मगरीच्या तावडीतून सुटतो. "

" चल, लौकर बाहेर ये. "

" पण आई, तू मला संन्यास घ्यायला परवानगी देशील ? "

" हो देईन, संन्यास घे. हवे ते कर. पण पाण्याबाहेर ये. "

हताश झालेल्या मातेने सांगितले. तिला तिचा मुलगा सुखरूपपणे हवा होता. या शोकग्रस्त मातेने शंकरला संन्यास घेण्यास परवानगी दिली. शंकराला अतिशय आनंद झाला. आई आपले स्मरण करील तेव्हा आपण हजर होऊ असे तिला वचन देऊन तो संन्यासदीक्षेसाठी घराबाहेर पडला. प्रवास करता करता तो नर्मदातीरावर श्रीगौडपादाचार्यांचे शिष्य श्रीगोविंदमुनी होते त्यांना येऊन भेटला. विष्णुशर्मा किंवा चित्सुखाचार्य शंकराला मध्येच प्रवासात येऊन मिळाले. आचार्य श्रीगोविंदमुनी व शंकर यांची भेट होताच दोघांनाही अतिशय आनंद झाला, निर्वाणपंचक, मायाविवरण इत्यादी प्रकरणे आधीच शंकराने लिहिली होती. योग्य असा शिष्य पाहून गोविंदमुनींनी शंकरास संन्यासदीक्षा दिली. कालडीचा शंकर शंकराचार्य म्हणून पुढे प्रसिद्धीस आला. दीक्षा देणाऱ्या श्रीगुरूपाशी राहून शंकराचार्यांनी वेदांचे अध्ययन पूर्ण केले. प्रातःस्मरण, नर्मदाष्टक, साधनपंचक, वाक्यवृत्ती, विवेकचूडामणी, आत्मानात्मविवेक वगैरे प्रकरणे याच सुमारास आचार्यांनी लिहिली. गोविंदमुनींच्या बरोबर आचार्यांनी बद्रिकाश्रमाचा प्रवास केला. श्रीगौडपादाचार्यांची परंपरा समजावून घेतली. त्यांनीही आचार्यांना

आपली सर्व विद्या शिकविली. त्यांच्याजवळ चार वर्षे राहून आचार्य वेदान्तविद्येत पारंगत झाले. गौडपादाचार्यांकडून प्रेरणा मिळाल्याने शंकराचार्यांनी प्रस्थानत्रयीवर भाष्ये लिहिण्याचे मान्य केले. आचार्यांचा लौकिक त्यांच्या ग्रंथांमुळे, त्यांच्या विद्वत्तेमुळे सर्वत्र वाढत राहिला.

हिमालयाच्या यात्रेत असतानाच ज्ञानसंपन्न आचार्यांना कैलास शिखरावर एक भव्य मूर्ती दिसली. या मानवदेहधारी आकृतीचे तेज चंद्राप्रमाणे होते. तिच्या मस्तकावर चंद्र होता. एका हातात मुक्तामणि-माला, दुसऱ्या हातात अमृतकुंभ, तिसऱ्यात पुस्तक, चौथ्या हातात योगचक्र, गळ्यात तेजस्वी मोत्यांचा हार, अशा थाटात साक्षात शिव-शंकरांनी आचार्यांना श्रीदक्षिणामूर्तींच्या रूपाने दर्शन दिले. याच मूर्ती-पुढे आचार्यांनी दक्षिणामूर्ती स्तोत्र रचले. परापूजा नावाच्या अती रम्य व तत्त्वदर्शी स्तोत्राची निर्मिती याच प्रसंगाने झाली. श्रीदक्षिणामूर्तींच्या मदतीने आचार्यांनी आपले ब्रह्मसूत्रावरील भाष्य पूर्ण केले.

आचार्यांचे ग्रंथ सर्वांना मार्गदर्शक ठरले. हिंदुधर्माच्या तत्त्वज्ञानाचे अतिशय रम्य असे दर्शन त्यांच्या ग्रंथांमुळे होत राहिले. अद्वैत तत्त्व-ज्ञानाच्या प्रसारासाठी सारा भारत वर्ष पाहण्याचा त्यांनी विचार केला. ग्रंथातील तत्त्वज्ञान ग्रंथात न राहता लोकांच्या अभ्युदयास व मनोधारणेस त्याचा उपयोग व्हावा म्हणून सर्वत्र संचार करण्याचा विचार त्यांनी केला. एवढयात घरी आई आजारी असून मुलाचे स्मरण करीत असल्याचा निरोप त्यांना मिळाला. आईच्या भेटीसाठी बद्रिनाथाहून शंकराचार्य त्वरेने कालडीस येण्यास निघाले.

घरी आई अंथरुणावर पडून अगदी क्षीण होऊन पराक्रमी मुलाची स्मृती काढीत बसली होती. मुलगा फार थोर निघाला, तत्त्वज्ञानी झाला, आचार्य झाला, वगैरे गोष्टी तिच्या कानांवर येत. पण त्याला डोळे भरून पाहण्यासाठी ती प्राण कंठाशी धरून उत्सुक बनलेली होती. बाळ शंकर

कालडीस आला असे समजताच आर्याम्बेच्या डोळ्यांत अश्रू तराळून आले. शंकराचार्यांनीही आईस भेटून कडकडून मिठी मारली. एक संन्यासी पुत्र आपल्या आईस तिच्या अखेरच्या काळात भेटत होता. माता आर्याम्बेस ब्रह्मानंद झाला. शंकराने सर्वत्र एकच चैतन्यतत्त्व पसरले आहे, ब्रह्म तेवढे सत्य आहे वगैरे तत्त्वज्ञान सांगितले असले तरी वृद्ध मातेस मात्र पुत्रभेटीतच ब्रह्मानंद वाटला यात नवल नाही. आईची क्षीण झालेली प्रकृती पाहून त्यांना चिंता वाटली. तिला रोज पूर्णा नदीवर स्नानासाठी जाववत नव्हते; म्हणून शंकराचार्यांनी पूर्णा नदीस प्रार्थना करून तिलाच स्वतःच्या घरापासून वाहण्याविषयी विनंती केली. ती त्यांच्या घराजवळून वाहू लागल्याने लोक तिला अंबा नदी असेही म्हणू लागले.

कालडी येथे राहून शंकराचार्यांनी आपल्या वृद्ध आईची मनोभावे सेवा केली. आपले तत्त्वज्ञान सोप्या भाषेत समजावून सांगण्यासाठी त्यांनी सोप्या सोप्या भाषेत सगुण परमेश्वराची सुंदर स्तोत्रे रचली. आईस धन्यता वाटली. पुत्राचे पोट भरून कौतुक करीत असतानाच एके दिवशी तिचा अंत झाला. त्यांनी आपल्या घराच्या आवारातच तिचा अंत्यसंस्कार विधिपूर्वक केला. 'मातृस्मृती' नावाचे एक मातृप्रेमाने भरलेले स्तोत्र त्यांनी रचले. वृद्ध मातेची मनोभावे सेवा करणाऱ्या आचार्यांची कीर्ती सर्वत्र वाढीस लागली.

पुढे थोड्याच दिवसांत यतिधर्माचा संपूर्ण उपदेश करून त्यांच्या श्रीगुरूंनीही नर्मदातीरावर देह ठेविला. नंतर सद्गुरूंच्या प्रेरणेनुसार शंकराचार्य साऱ्या भारताची यात्रा करण्यासाठी सिद्ध झाले. माघ महिन्यात प्रयागला जाऊन त्यांनी श्रीगुरू व आई यांच्या नावे तर्पणे केली. येथेच प्रयागाष्टक, यमुनाष्टक, माधवाष्टक, लक्ष्मीनृसिंहपंचरत्न, वेदसार

शिवस्तोत्रे अशी पाच स्तोत्रे रचली. त्यांचा शिष्यपरिवार वाढत होता. त्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानास प्रतिष्ठा प्राप्त होत होती.

याच वेळी प्रवासात असताना आचार्यांची व त्या वेळच्या प्रसिद्ध अशा कुमारिलभट्ट नावाच्या मीमांसकाची गाठ पडली. त्यांनी त्यास वेदान्त रहस्याचा उपदेश केला. कुमारिलभट्टाचे शिष्य मंडनमिश्र हेही प्रख्यात मीमांसक होते. मंडनमिश्र व त्यांची पत्नी भारती ही दोघेही मोठी विद्वान होती. त्यांच्या भेटीसाठी आचार्य काश्मिरात गेले. आचार्य व मंडनमिश्र यांची तत्त्वज्ञानावर फार मोठी व महत्त्वपूर्ण अशी चर्चा झाली. शंकराचार्यांचे आत्मज्ञानाचे तत्त्वज्ञान मंडनमिश्रांना शेवटी मान्य झाले. त्यांनी आचार्यांचे शिष्यत्व पत्करले. आचार्यांनी त्यांना ‘ सुरेश्वराचार्य ’ अशी पदवी दिली.

अशा प्रकारे सर्वत्र प्रवास करून, सर्वांना वादविवादात जिंकून शंकराचार्यांनी थोडक्याच काळात अद्वैत तत्त्वज्ञानाची छाप सर्व भारतभर बसविली. पाखंडी मतांचा व वेदविरोधी चळवळींचा पायाच खिळखिळा करून टाकला. यासाठी आचार्यांनी हिंदुस्थानाच्या चार दिशांना चार मठांची स्थापना केली. द्वारकेला पहिला मठ स्थापन करून मंडनमिश्रांच्या बंधूंना, ब्रह्मस्वरूपाचार्यांना त्यांनी तेथील आचार्य नेमले. बद्रिकेदार येथे ज्योतिर्मठ स्थापून तेथे तोटकाचार्यांची नेमणूक त्यांनी केली. पूर्व किनाऱ्यावर जगन्नाथपुरी येथे गोवर्धन मठाची स्थापना करून त्यांनी तेथे पद्मपादाचार्यांची नेमणूक केली व शेवटी दक्षिणेत शृंगेरी येथे शारदा मठ स्थापन करून तेथील अधिपती म्हणून त्यांनी हस्तमलकाचार्य यांची योजना केली. येथेच शारदांबेचे एक मंदिर बांधून श्रीचक्राचीही त्यांनी स्थापना केली.

सर्वत्र आत्मतत्त्व पसरून राहिलेले असल्याने बाह्यतः विविध रूपांनी दिसणारी सृष्टी वस्तुतः एकरूप असल्याचा फार मोठा संदेश शंकरा-

चार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानाने दिला आहे. त्यांच्या बनारस येथील वास्तव्यात त्यांनी गीता, उपनिषदे व ब्रह्मसूत्रे या प्रस्थानत्रयींवर भाष्ये लिहिली असेही सांगितले जाते. त्यांच्या वेदान्तविचाराचे अध्ययन करण्यासाठी अनेक विद्यार्थी त्यांच्याभोवती जमा होत असत. पद्मपाद हे त्यांचे एक थोर विद्यार्थी होत.

जगप्रसिद्ध अशा अद्वैत तत्त्वज्ञानाच्या या थोर पुरस्कर्त्यांच्या जीवितामधील एका घटनेचा उल्लेख येथे करण्यासारखा आहे. शंकराचार्य बनारस येथे असताना एके दिवशी त्यांच्या रस्त्यात एक चांडाळ मध्येच आडवा आला. वर्णश्रेष्ठत्वाची किंचित जाणीव मनात निर्माण होऊन शंकराचार्यांनी त्याला दूर होण्यास सांगितले. त्या चांडाळाने नम्रतेने विचारले, " महाराज, आपण कुणाला दूर व्हा म्हणता ? माझ्या शरीराला की माझ्या आत्म्याला ? विटाळ कुणाला आहे ? " चांडाळाच्या या अनपेक्षित व खोचक प्रश्नामुळे शंकराचार्य चपापले. एकाच ब्रह्मतत्त्वाचा वास याही चांडाळाच्या देहात असताना त्यास विटाळ कसला, याची यथार्थ जाणीव त्यांना झाली. त्यांनी चटकन त्या चांडाळाचे पाय धरले आणि त्याचा गौरव केला. या प्रसंगावर मनीषापंचक नावाचे त्यांनी पाच श्लोकही रचले. सर्वत्र एकच ब्रह्मतत्त्व पाहणारा, मग तो ब्राह्मण असो वा चांडाळ असो, तो आपल्या गुरुस्थानी असल्याचे त्यांनी मानले.

शंकराचार्यांच्या या विशिष्ट तत्त्वज्ञानामुळे भारतीय एकत्वास विशेष महत्त्व आले. हिंदुस्थानात अनेक भाषा, अनेक रूढी, अनेक पोषाखपद्धती, अनेक चालीरीती असल्या तरी अद्वैत तत्त्वज्ञानामुळे या विविधतेमधील ऐक्य शंकराचार्यांनी सर्वांच्या प्रत्ययास आणून दिले. वास्तविक जन्माने ते दक्षिण भारतातील केरळ प्रांतामधील. त्यांचा प्रवास सर्व भारतात झाला. चारही दिशांना त्यांनी मठांची स्थापना केली. संस्कृत भाषेचे समान बंधुत्व सर्वांना अनुभवास आले. याच एकत्वाच्या दृष्टीमधून त्यांनी

समकालीन लोकांनी सुरू केलेल्या मूर्तिपूजेचा विचार केला. शिव, विष्णू अंबिका, गणपती, सूर्य यांच्यासारख्या देवतांच्या प्रतीकांची पूजा लोकांनी सुरू केली होती. वरवर भिन्न असणाऱ्या या देवतांची रूपे वास्तविक पाहता एकाच ईश्वराच्या आविष्काराची आहेत, त्यांच्यांत मूळ स्वरूपाच्या दृष्टीने भेद नाही, असेच शंकराचार्यांनी या देवदेवतांची 'पंचायतन पूजा' मान्य करून स्पष्ट केले.

निरनिराळ्या देवांची वा देवतांची उपासना विविध प्रकारची असली तरी तेवढयामुळे उपासकांनी स्वतंत्र मत प्रस्थापित करून एकमेकांशी फटकून वागू नये, सर्वत्र ईश्वर तत्त्व एकच आहे अशा एकत्वाच्या तत्त्वामधून त्यांनी शिव, विष्णू, गणेश, देवी व सूर्य यांचे पंचायतन निर्माण करून त्यांची पूजा रूढ केली. यासाठीच त्यांनी विविध देव-देवतांची स्तोत्रेही रचिली.

आपल्या प्रदीर्घ प्रवासात शंकराचार्य रामेश्वरीही आले होते. कांची येथेही त्यांनी एक मठ स्थापिला असे सांगितले जाते. शिवकांची व विष्णुकांची अशी या मोक्षपुरीची विभागणी करून त्यांनी तेथील श्रीकामाक्षी मंदिराचीही पुनर्रचना केली. येथील सर्वज्ञपीठावर त्यांनी स्वतः आरोहण केले असल्याचे सांगतात.

अशा प्रकारे वेदान्ताचे, तत्त्वज्ञानाचे उज्ज्वल स्वरूप ग्रंथलेखनाने, मठस्थापनेने शंकराचार्यांनी पुनः लोकांसमोर उभे केले. वैदिक धर्माची पताका उभ्या भारतात त्यांनीच कायमची फडकत राहील अशी व्यवस्था केली. जगात ज्या अद्वैत तत्त्वज्ञानाचे मुक्त कंठाने गुणगान केले जाते त्याचे प्रणेते आद्य शंकराचार्यच होत. आचार्यांनी प्रवर्तित केलेली मठयोजना व तत्त्वपरंपरा यांचे आजही दर्शन घेण्यासारखे आहे. त्यांच्या प्रस्थानत्रयीवरील भाष्यांत व विविध स्तोत्रांत त्यांच्या तत्त्व-ज्ञानाचा सुंदर परिपाक उतरलेला दिसतो. उदंक नावाच्या एका

जिज्ञासू शिष्यास एका श्लोकातच त्यांनी वेदान्ताचे रहस्य स्पष्ट करून सांगितले. त्या श्लोकातील प्रश्नोत्तरे सहज समजण्यासारखी आहेत.

प्रश्न : तुला प्रकाश कशामुळे दिसतो ?

उत्तर : दिवसा सूर्यामुळे व रात्री दीपामुळे.

प्रश्न : सूर्य, दिवा यांचा ग्राहक कोण ?

उत्तर : डोळा.

प्रश्न : डोळे मिटल्यावर कोण प्रकाशक ?

उत्तर : बुद्धी.

प्रश्न : बुद्धीचा प्रकाशक कोण ?


उत्तर : मी स्वतः.

प्रश्न : मग तू कोण आहेस ?

उत्तर : श्रेष्ठतम ज्योतिःस्वरूप असा परमात्मा तो मीच.

वयाच्या अवघ्या बत्तीस वर्षांच्या अवधीत शंकराचार्यांनी एवढा मोठा अद्वितीय पराक्रम केला. हिंदुधर्माला भक्कम अशी तात्त्विक बैठक त्यांनी प्राप्त करून दिली. भरतखंडभर प्रवास करून लोकांत धर्मजागृती केली. पाखंडी मतांचा पराभव केला. चार दिशांना चार मठ स्थापिले. अध्यात्मशास्त्राची, अद्वैत तत्त्वज्ञानाची परंपरा दृढ करण्यासाठी अनेक ग्रंथ लिहिले. भक्तीच्या सुखासाठी सरस अशा स्तोत्रांची निर्मिती केली. त्यांनी योजिले होते ते कार्य अवघ्या बत्तिसाव्या वर्षीच समाप्त झाले. मग एके दिवशी त्यांनी वैशाखी पौर्णिमेस कांची येथे कामाक्षी देवीसमोर योगासन मांडून स्वतःस अनंतत्वात विलीन करून घेतले.

* * *



सन ५७१–६३२

# ८ : हजरत पैगंबर

व्यापारवृद्धी व तीर्थस्थान या दोनही कारणांनी सहाव्या शतकात अरबस्तानातील मक्का शहर प्रसिद्धीस आले होते. येथील विख्यात काबा मशिदीशी संबंधित असलेल्या अबदुल्ला व अमीना यांच्या पोटी सन

५७१ या वर्षी हजरत पैगंबर यांचा जन्म झाला. मुलाचा जन्म होण्याच्या आधी काही थोडे दिवस मुलाचे वडील मरण पावले असल्यामुळे या लहान मुलाचे आता कसे होईल या चिंतेत विचारी अमीना सदोदित असे. याच काळजीने आई खंगत चालल्यामुळे महंमदांना हालिमा नावाच्या दायीच्या दुधावर राहावे लागले. पैगंबर पाच वर्षांचे झाले तोच त्यांची आईही मरण पावली. आता त्यांना अगदी जवळचे मायेचे असे कुणी नव्हते. थोडे दिवस आजोबांनी व पुढे चुलते अबू तालीब यांनी त्यांचे पालनपोषण केले.

अशा या परिस्थितीमुळे पैगंबरांची वृत्ती लहानपणापासूनच विचारशील बनली. वयास शोभून दिसणारे खेळ न खेळता सतत एकान्तवासाची आवड त्यांच्या मनास लागली. देवाच्या, धर्माच्या नावावर अरबस्तानात फारच अनाचार माजले होते. तत्त्व न पाहता अनेक देवांच्या भल्या मोठ्या मूर्ती सर्वत्र पसरल्या होत्या. हिंसाचाराला ऊत आला होता. रोज कटकटी, मारामारी, कलह यांनी सारे वातावरण दूषित झालेले असल्यामुळे महंमद पैगंबरांच्या मनास स्वस्थता नव्हती.

एकदा तर त्यांचे मन भारीच उदास झाले. जिल्काद महिन्यात उकाझ शहरात मोठा उत्सव असे. अनेक ठिकाणचे लोक या यात्रेसाठी येत असत. नाच, गाणे, कविता-वाचन, शर्यती यांनी उत्सवास रंग येई. हसण्या-खेळण्याचे, वैर विसरण्याचे दिवस हे. पण या वर्षी बोलाचाली होऊन गोंधळ उडाला. मारामारी झाली. तरवारी उपसून एकमेकांनी एकमेकांचा सूड घेतला. यातून मोठ्या युद्धाचा अग्नी भडकला. महंमद पैगंबरांचे अंतःकरण या प्रकाराने चिंताग्रस्त झाले. लोकांच्या मनात हिंसेविषयी असणारा लोभ कमी कसा होईल, या एका प्रश्नाच्या भोवती ते विचार करू लागले. ऐन वयात एवढा विचार करून चिन्ताग्रस्त होणाऱ्या पैगंबरांची चिंताच चुलत्यांना वाटू लागली.

मनाची उदासीनता कमी व्हावी म्हणून त्यांनी व्यापारी पेशा पत्करला. त्या निमित्ताने नाना देश व नाना रीतिरिवाज पाहायला मिळतील, मनास विरंगुळा प्राप्त होईल अशी त्यांना आशा वाटली. व्यापारात त्यांना चांगला लाभ झाला. मक्केमधील खदिजा नावाच्या एका धनाढय स्त्रीने त्यांच्या स्वाधीन आपलाही व्यापार केला. या प्रेमळ स्त्रीने पैगंबरांना सर्व प्रकारची मदत केली. शेवटी त्यांच्याशी तिने लग्नही केले. या श्रीमान व प्रेमळ स्त्रीच्या सहवासात त्यांना अतोनात सुख झाले.

हिच्याच सहवासात त्यांचे मूळ विचार पुनः आकार धारण करू लागले. धर्माच्या नावावर फार विलक्षण प्रकार रूढ होता. गरिबांना छळणे, हिंसा करणे, सुंदर स्त्रियांना पळविणे, व्यसनांत गढून जाणे इत्यादी निंद्य आचारविचारांत समाज पूर्णपणे गढून गेला होता. 'काबा' मशिदीच्या दुरुस्तीच्या वेळी पवित्र दगड कुणी बसवायचा, यासारख्या क्षुल्लक प्रसंगातून युद्ध निर्माण होण्याचा प्रसंग आला. महंमद पैगंबरांनी यातून युक्ती काढून अनर्थकारक प्रसंग टाळला. प्रत्येक जमातीस त्या दगडाचा हात लागल्याने सर्वजण खूष झाले व महंमदांचे नावही ज्याच्या त्याच्या तोंडी झाले. नव्या धर्माची ही पूर्वतयारीच होती असे म्हणायला हरकत नाही.

याच वेळी गुलामांच्या व्यापारास मोठेच तेज चढले होते. गुलामांची भर बाजारात विक्री होत असे. त्यांच्याकडून जुलमाने काम करवून घेण्यात येई. त्यांना वाटेल तशा भयानक शिक्षा होत असत. या अनिष्ट चालीकडे पैगंबरांचे लक्ष होतेच. खदिजाच्या एका पुतण्याने झैद नावाचा एक गुलाम पैगंबरांना बक्षीस म्हणून दिला. आणि महंमदांनी या गुलामाला ताबडतोब मुक्त केले. त्याचा दर्जा वाढावा म्हणून

आपल्याच नातेवाईकातील एका मुलीशी त्यांनी त्याचे लग्न लावून दिले. याही कृत्यामुळे त्यांचा लौकिक अधिक वाढला.

पण या लहानसहान बाबींनी त्यांचे समाधान होईना. भोवतीचा अनाचार व हिंसाचार पाहून त्यांचे अंतःकरण तुटत असे. या भ्रमिष्ट लोकांना कोण शहाणपण सुचविणार ! हे त्यांना समजत नसे. मग त्यांनी इतर थोर धर्मप्रवर्तकांचाच मार्ग स्वीकारला. ते एका हीरा नावाच्या पर्वतावरील गुहेत गेले. रात्रंदिवस तेथे एकान्तवासात ध्यानस्थ बसून त्यांनी आपल्या मनाचे सामर्थ्य वाढविले. या ठिकाणी त्यांना साक्षात्कार झाला. खऱ्या धर्माचा प्रसार करून केवळ अरबस्थानाचेच नव्हे तर सर्व जगाचे हित साधण्याचा आदेश त्यांना मिळाला. परमेश्वराची अशी आज्ञा झाली तेव्हा ते ध्यानातून सावध झाले. त्यांच्या अंगाला दरदरून घाम सुटला होता. अंगात जणू कापरे भरले होते. काय झाले हेही त्यांच्या ध्यानी नीटसे येईना.

गुहेच्या बाहेर येऊन त्यांनी तडक घर गाठले. त्यांची अवस्था पाहून खदिजाही प्रथम घाबरून गेली. पण सर्व वृत्तान्त ऐकल्यावर तिच्या मनास फार समाधान वाटले. " खदिजा, मला वेड लागायची पाळी आली आहे " असे म्हणणाऱ्या पैगंबरांना तिने धीर दिला. ती त्यांना म्हणाली, " असे कसे होईल ? आपण गरिबांचे कैवारी आहात. आजच्या तुमच्या अनुभवावरून तुम्ही आता सद्धर्माचे प्रवर्तक होणार अशी माझी खात्री आहे. " पत्नीच्या या उत्साहजनक शब्दांनी पैगंबरांना मोठाच धीर आला. आणि त्यांनी इस्लामी धर्माच्या प्रसारास सुरुवात केली. त्यांचा पहिला अनुयायी अर्थातच खदिजा होती. महंमदांचे चुलत बंधू हजरत अल्ली व झैद यांनी नंतर हा नवा धर्म स्वीकारला. अबू बक्र, उस्मान, अबदुल रहिमान इत्यादी संबंधितांनीही या धर्माची दीक्षा घेतली. दोन-तीन वर्षांत त्यांना फक्त तीस अनुयायी

मिळाले. स्वैराचारास व स्वार्थास उपयुक्त असणारा प्रस्थापित धर्म सोडायला कुणी फारसे उत्सुक नव्हते. खरे म्हणजे तो धर्म नव्हताच. वेडगळ समजुतींवर आधारलेल्या काही अज्ञानजन्य अशा आचारांची ती एक विस्कळित अशी मालिका होती; तिचाच आधार लोकांना वाटत असल्यास नवल नाही.

शेवटी एके दिवशी आपल्या धर्माची महती पटवून देण्यासाठी त्यांनी मक्केतील विचारी लोकांची एक जाहीर सभा बोलाविली. सत्य, न्याय, सदाचार, शांती, प्रेम, भूतदया इत्यादी मानवी सद्गुणांचा धर्म त्यांनी समजावून दिला. पण त्याचे महत्त्व कुणासच पटले नाही. बहुतेकांनी त्यांच्या बोलण्याची थट्टाच केली. त्यांचा लोक द्वेष करू लागले. त्यांना त्रास देऊ लागले. नवा धर्म समजावून घेण्याची इच्छा कुणासच होईना. कुरेश पुढाऱ्यांनी काबा मशिदीत प्रार्थना करण्यास पैगंबरांना मनाई केली! महंमदांना व त्यांच्या अनुयायांना लोकांनी छळण्यास सुरुवात केली. त्यांची मानहानी केली. काही अनुयायांचे हालही करण्यास प्रतिष्ठितांनी कमी केले नाही. बिलाल नावाच्या एका गुलामाने इस्लाम धर्म स्वीकारला तेव्हा लोकांनी रक्त ओकेपर्यंत त्याला मारले. तापलेल्या वाळूवर त्यास उघड्या अंगाने निजविले. पण या वीराने धर्म सोडला नाही.

आपल्या डोळ्यांदेखत अनुयायांचे हाल होत असल्याचे पाहून पैगंबरांचे अंतःकरण कळवळून येई. आपल्यामुळे एवढा जाच होतो तर आपण दुसऱ्या देशात निघून जावे असा विचार त्यांच्या मनात आला. ब्याऐंशी अनुयायांसहित महंमद पैगंबर शेजारच्या नेगस नावाच्या देशात निघून गेले. तरी कुरेशांनी त्यांची मानहानी करण्याचे कमी केले नाही. काहीही चमत्कार न करता महंमद धर्मप्रवर्तक कसे होतात? 'परमेश्वराने मला चमत्कार करायला न पाठविता उपदेश करण्यासाठी

पाठविले आहे ' या त्यांच्या बोलण्याकडे लोकांचे लक्ष नव्हते. त्यांना चमत्कार हवा होता. शेवटी महंमदांना ठार मारण्याचाही विचार काही श्रमिष्ठांनी केला. परंतु निर्भयपणे महंमद पैगंबर आपल्या धर्माचा उपदेश करीतच होते. त्यांची तत्त्वनिष्ठा पाहून मक्केमधील उमर व अबू बक्र हे दोन पुढारीही इस्लामचे अनुयायी बनले. तरी कुरेशांची छळणूक कमी झाली नाही.

याच सुमारास महंमद पैगंबरांना एक जबर धक्का बसला. हरएक कामात त्यांना साथ देणारी त्यांची पत्नी मरण पावली. तिच्या सहवासात त्यांची आध्यात्मिक उंची वाढली होती. महंमदांना पुष्कळ मुले झाली; पण ती जगली नाहीत. फातिमा नावाची एक मुलगी मात्र जगली. पत्नीच्या मृत्यूने महंमदांचे मन काही काळ उदासीन झाले. मनास थोडी विश्रांती मिळावी म्हणून त्यांनी आपल्या आवडत्या झैद नावाच्या नोकराबरोबर ताईफला प्रयाण केले. याही गावी त्यांनी आपल्या नव्या धर्माचा प्रसार केला. पण येथील लोकांचीही पैगंबरांची विटंबना केली. नव्या धर्माची ओढ कुणासच वाटण्यासारखी नव्हती. काही दिवसांनी ते मक्केस परत आले. कुरेशांचा विरोध वाढतच होता. शक्य झाल्यास पैगंबरांना ठार मारण्याचाच बेत त्यांनी केला. रात्रीं त्यांच्या निवासस्थानास लोकांनी वेढा दिला. मोठ्या शिताफीने महंमद पैगंबर व अबू बक्र यांनी मक्का शहर सोडून मदिना शहराकडे प्रयाण केले. याच प्रयाणास हिजरात असे नाव मिळाले.

महंमदांचे स्वागत मदिनेच्या लोकांनी उत्साहाने केले. लतापल्लवांनी सारे नगर शृंगारून काढले. प्रमुख मंडळींनी त्यांचा सत्कार केला. या शहरात त्यांना आणखी अनेक अनुयायी मिळाले. सत्य, दया, सदाचार यांनी युक्त असलेल्या त्यांच्या नव्या धर्मावर व प्रवचनांवर लोक संतुष्ट झाले. मदिनेच्या सार्वजनिक व राजकीय जीवनातही महंमद पैगंबरांना

थोर दर्जाचे स्थान मिळाले. ज्यू व ख्रिस्ती लोकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात त्यांनीच पुढाकार घेतला. त्यांच्या या गौरवाचा परिणाम 'मक्केच्या लोकांवर काहीच झाला नाही. कुरेशांनी त्यांचा अजूनही छळ चालू ठेवला. मोठे सैन्य घेऊन कुरेश मदिनेवर चाल करून आले. चांगल्या इमारतींची व बागबगीचांची त्यांनी नासधूस केली. निरपराध लोकांना मारहाण केली. आता मात्र महंमदांना नाइलाज म्हणून हातात शस्त्र घेणे भाग पडले. काही निवडक सैनिक हाताशी घेऊन त्यांनी कुरेशांशी सामना दिला. त्यात महंमदांच्या अनुयायांना विजय मिळाला. अशा लढाया वारंवार होत राहिल्या. महंमद पैगंबरांना जय मिळत गेल्याने त्यांच्यावरील लोकांचा विश्वास दृढ होत गेला. शेवटी मक्केची यात्रा आपल्या अनुयायांसहित करून त्यांनी तेथील लोकांचेही प्रेम जिंकले. अनेकांनी व कुरेशांनी सुद्धा नव्या धर्माची दीक्षा घेतली.

स्वतः पैगंबर अतिशय दयाळू अंतःकरणाचे होते. दुसऱ्यावर उपकार करण्यात त्यांना मोठीच धन्यता वाटे. त्यांच्या चरित्रावर व त्यांच्या धर्माच्या प्रवृत्तीवर अनेक आक्षेप घेण्यापूर्वी त्यांच्या वचनांचा संग्रह पवित्र कुराण म्हणून जो प्रसिद्ध आहे तो पाहण्यासारखा असल्याने अगोदर त्याचे अध्ययन नीट व्हावे. ' ला इकराहा फिद्दीन '–धर्माच्या बाबतीत जबरदस्ती करू नका ' हे पैगंबरांचे वचन आहे. ' लोकांनी तुमचे मानले नाही तर तुम्ही फक्त उपदेश करीत राहावे ' असे ते म्हणत असत. परमेश्वर सत्कृत्ये करणाऱ्यांवर प्रेम करतो, स्त्रियांशी दयाळूपणाने वागा, मातेच्या पायांखाली स्वर्ग आहे, स्त्रियांचे हक्क पवित्र आहेत, प्रत्येकाने आजन्म विद्यार्जन केले पाहिजे, हुतात्म्याच्या रक्तापेक्षा विद्वान माणसाच्या लेखणीमधील शाईचा थेंब अधिक पवित्र होय, स्वदेशाभिमान हा धर्माचा एक भाग मानावा, परमेश्वराने निर्माण केलेल्या प्राणिमात्रावर प्रेम न करणाऱ्यावर ईश्वरही प्रेम करणार नाही, मानवाची

सेवा ही परमेश्वराची सर्वश्रेष्ठ भक्ती होय, दया हे धर्माचे चिन्ह आहे, इत्यादी पैगंबरांची वचने पुरोगामी व विचारप्रवर्तक नाहीत असे कोण म्हणेल ? शांततेचा, दयेचा, बंधुत्वाचा प्रसार करणारा इस्लाम धर्म स्थापून त्यांनी जगतावर उपकारच करून ठेविले आहेत.

महंमद पैगंबर स्वभावानेही अतिशय दिलदार होते. सर्वांशी ते मोकळ्या मनाने चर्चा करीत असत. लहान मोठा, गरीब-श्रीमंत असा भेद त्यांच्या मनात नसे. ऐषआराम, डामडौल, सत्ता, अधिकार यांचा त्यांना तिटकरा होता. स्वतःच्या अंगावरचा कपडा फाटला तर ते स्वतः तो शिवून दुरुस्त करीत. स्वतःचे कपडे स्वतः धूत असत. रात्री गोणपाटावरच ते निजत. बकरीचे दूध व खजूर हा त्यांचा साधा आहार असे. कुणी भिकारी दाराशी आला तर लगेच स्वतःच्या पानातील अन्न ते त्याच्या हातांत टाकीत. त्यांची एकुलती एक मुलगी फातिमा. ते मदिनेचे सर्वाधिकारी झाले तरी तिचे नित्याचे दळणकांडणाचे काम कमी झाले नाही. शांतता, लीनता, न्यायप्रियता इत्यादी गुणांबद्दल त्यांचा लौकिक दिवसेंदिवस वाढतच राहिला.

समकालीनांत पसरणारा वेडावाकडा व अनाचाराचा धर्म दूर करून सदाचाराचा व मनाच्या विकासाचा शांतताप्रिय धर्म त्यांनी अमलात आणला. कर्मकांड, मूर्तिपूजा, जादुटोणा, जारणमारण इत्यादी विधींना त्यांनी हद्दपार केले. प्राण्यांचा बळी देण्याची पद्धत त्यांनी कमी केली. सहजपणे सर्वसामान्य लोकांनाही आचरता येतील असे साधे व सुटसुटीत धर्मविधी त्यांनी तयार केले. कुठेही सहजपणे करता येईल अशा नमाजाची रीत त्यांनी प्रतिष्ठित केली. दानधर्मास त्यांनी फार मोठे स्थान दिले होते. चित्तशुद्धीसाठी रमजानच्या उपवासाचे माहात्म्य त्यांनी वाढविले. मक्केच्या यात्रेचे महत्त्व त्यांनी सर्वांना समजावून दिले. काही व्याव-

हारिक शिष्टाचारही त्यांनी रूढ केले. ' अस्सलामालेकुम – आपल्यास शांती लाभो ' असा अभिवादनाचा प्रकार त्यांनी निर्माण केला. नित्याच्या सत्कृत्यांची महती त्यांनी वाढविली. व्यसनी लोकांचा त्यांनी तिटकारा करून त्यांना सुधारण्याचा प्रयत्न केला :

अशा प्रकारे मानवी मनाचे उदात्तीकरण करणारा धर्म लोकप्रिय होत असल्याचे पाहून महंमदांना धन्यता वाटली. आता आपल्या आयुष्याची सायंकाळ जवळ आली असे पाहून त्यांनी अखेरची मक्केची यात्रा करण्याचे ठरविले. त्यांच्या या यात्रेत लाखो लोक सामील झाले. सर्वांच्या मुखांवर एक प्रकारचा उत्साह दिसत होता. मक्केतील लोकांनी त्यांचे मनापासून स्वागत केले. लोकांचे अलोट प्रेम पाहून त्यांनाही गहिवरून आले. त्यांनी अखेरचे भाषण केले :

" ज्या ठिकाणी माझा छळ झाला त्याच ठिकाणी आपण एवढ्या प्रेमाने मला भेटलात, यावरून इस्लाम धर्म लोकांना किती आवडतो हेच सिद्ध झाले. जगांत शांती निर्माण करणाऱ्या इस्लाम धर्माचे तुम्ही अनुयायी आहात हे ध्यानात ठेवा. लोकांशी प्रेमाने वागा. रक्तपात व अनाचार करून तुमचा उद्धार कधीही होणार नाही. तुमच्या शत्रूशीही तुम्ही प्रेमाने वागा. कुणावरही अन्याय करू नका. स्त्रियांचा मान नीट राखा. त्यांची इज्जत राखा. तुमच्या प्रत्येक कार्यांत त्यांना भागीदार करा. तुमच्या नोकराचाकरांशी दयेने वागा. कोणताही अनाचार करू नका. सर्वशक्तिमान परमेश्वरास नेहमी शरण जा. "

महंमद पैगंबरांच्या या उपदेशाने सर्वांना गहिवरून आले. त्यातील तळमळ त्यांच्या आयुष्याची अखेरी दर्शवीत होती. शेवटी अंगात त्राण नसतानाही ते मशिदीत आले. कुराणातील एक प्रार्थना त्यांनी म्हटली. नमाज पढून ते घरी आले तेव्हा त्यांना मूर्च्छा आली. ते बेसावध झाले.

सन ६३२ मध्ये त्यांची प्राणज्योत मालवली. एका मोठ्या यशस्वी धर्मवीराने शांततेचा व दयाधर्माचा अखंड पुरस्कार करून या जगाचा कायमचा निरोप घेतला. पण त्यांच्या उपदेशाने ते अधिक चिरंजीव आहेत यात शंका कसली ?

* * *



इ. स. १४८३ ते १५४६

## ९ : मार्टिन ल्यूथर

जर्मनीमधील एका खाणीवाल्याच्या पोटी मार्टिन ल्यूथरचा जन्म सन १४८३ मध्ये झाला. बापाच्या खाणीचे, तेथील सुरुंगाच्या स्फोटाचे, भडकपणे होणाऱ्या प्रकाशाचे दृश्य तो लहानपणापासून बघत होता. जंगलात असणाऱ्या या

खाणकामाशी त्याचा परिचय जवळून होता. बालपणीचा आनंद, उत्साह, प्रेम यांची प्राप्ती मार्टिनला सहसा झाली नाही. पोराशी वात्सल्याने काही बोलावे, त्याला गोंजारून त्याचे कौतुक करावे, यासाठी थोरल्या ल्थूथरला बिलकुल वेळ मिळत नसे. जमिनीच्या पोटामधून निघणारी खनिजे तपासण्यात सारा वेळ खर्च करणाऱ्या या बापास स्वतःच्या पोटी येणाऱ्या रत्नाची पारख करण्यास फुरसत नव्हती. घरातील कामाचा रगाडा उचलता उचलता मार्टिनची आई थकून भागून जाई. तिलाही पोराकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. एकदा काही खाद्य पदार्थ चोरून घेतल्यावर आईने त्याला अंगातून रक्त निघेपर्यंत मारले होते. एवढेच कौतुक मार्टिनचे होई.

अशा या जंगलातील खाणीच्या परिसरातून सुटावे कसे हा मार्टिनपुढे प्रश्न होता. त्याच्यापुढे अनेक प्रश्न उपस्थित होत असत. हे असे का? तसे का? अशा जिज्ञासेने त्याचे चित्त भणाणून जाई. आजूबाजूच्या म्हाताऱ्या बाया हे सैतानाने केले, हे देवाने केले, हे पिशाच्चाचे आहे; अशी उत्तरे देऊन त्याला गप्प बसवीत. असा हा अज्ञानाचा कार-भार गेली कित्येक शतके सुरू होता. मार्टिन अरण्यातच राहत होता. पण त्याच्या भोवती वैचारिक दृष्टीने सर्वत्र अज्ञानाचे रान पसरलेले त्याला दिसले. अंधश्रद्धा, जादूटोणा, भुतेखेते, नवससायास, धाक-दडपशाही यांचीच चलती धर्माच्या नावाखाली होत होती. त्याची आई कधी त्याला गोष्टी सांगे, त्यासुद्धा भुताखेतांच्याच असत. युरोपमधील मध्ययुगीन काळाचे जीवनच अशा प्रकारच्या अंधाराने झाकोळून गेले होते. देव, दैत्य, राक्षस, भुते, पिशाच, मंत्र, तंत्र इत्यादी साधनांनी धर्मास वेडावाकडा आकार येत होता.

मार्टिनचा आवाज मोठा मधुर होता. सुस्वर कंठाने तो निसर्गाची गीते गाऊन लोकांची मने आकर्षित करून घेई. गावठी शाळेतील

प्राथमिक शिक्षण संपल्यावर त्याने आयसेनॅक विद्यापीठात प्रवेश केला. त्याने प्रथम कायद्याचा अभ्यास केला. माणसामाणसांमधील कायद्याच्या बंधनाचे ज्ञान त्याला होत राहिले, परंतु मनुष्य व ईश्वर यांचे नाते कोणते, हा प्रश्न त्याच्यापुढे होताच. एके दिवशी तो आपल्या एक मित्राबरोबर जंगलातून भटकत होता. एकदम वीज कडाडली व तिच्या धक्क्याने त्याचा मित्र मरून धाडकन जमिनीवर पडला. निसर्गाच्या एका फटकाऱ्याने सेकंदापूर्वी बोलत असणारा त्याचा मित्र या जगास कायमचा अंतरला. विजेचा फटका जसा त्याच्या मित्रास बसला तसाच तो मार्टिनच्या मनास तीव्रतेने बसला. त्याच्यापुढे संशोधनाचे एक नवे पान उलगडले गेले. मित्रास मारणारे कुणी पिशाच होते की विजेचा जोरदार फटका होता ? ही वीज तरी कुणी निर्माण केली ? ती याच क्षणी, आपल्याच मित्रावर का कोसळली ? मार्टिनच्या मनात विचारांची अनेक वादळे निर्माण होऊन तो अधिक विचारग्रस्त झाला.

या प्रश्नांची उत्तरे कायद्याच्या अभ्यासाने न मिळता धर्माच्या अभ्यासाने मिळतील असे त्यास वाटले तेव्हा त्याने एरफर्ट येथील सेंट ऑगस्टिन मठात प्रवेश केला व धर्माच्या अभ्यासाकडे आपले चित्त वळविले. त्याने एकनिष्ठपणे मठात सेवा केली. मठातील सर्व खोल्या तो झाडून काढी, चर्चचे दरवाजे वेळ होताच उघडून ठेवी, चर्चच्या घड्याळाला ठराविक वेळेस चावी देई, काचेची तावदाने पुसून स्वच्छ ठेवी व रोज मठासाठी नियमाने तो भिक्षाही मागत असे. वीस वर्षेपर्यंत अशी सेवा करूनही तो असंतुष्ट राहिला. त्याच्या मनास शांतता मिळाली नाही. त्याच्या प्रश्नांना उत्तर सापडले नाही.

मग एके दिवशी तो अधिकच उदास झाला. आपल्या खोलीमधून तो बाहेरच आला नाही. बऱ्याच वेळाने त्याच्या मित्रांनी त्याचे दार ठोठावले, पण आतून काही उत्तर आले नाही. शेवटी जोराचा धक्का

देऊन त्यांनी दार फोडले व खोलीत प्रवेश केला. त्यांना तेथे विलक्षण प्रकार दिसला. रोज कार्यमग्न असणारा मार्टिन ल्यूथर आज निश्चेष्ट होऊन जमिनीवर पडला होता. हा जिवंत तरी आहे की नाही; अशी शंका काहींना आली. त्याच्या एका मित्राने त्याच्याजवळ पडलेली त्याची आवडती बासरी पाहिली. डोळ्यांत पाणी आणून त्या मित्राने ती बासरी उचलली व मार्टिन ल्यूथर नेहमी आवडीने वाजवीत असलेले एक गीत त्याने वाजविण्यास सुरवात केली. मार्टिन सावकाशपणे या ध्वनिलहरीं-मुळे सावध झाला. पण बेशुद्ध अवस्थेत मिळणारे सुख संपल्याचे त्याला भारी दुःख झाले.

मग तो मठाच्या अधिकाऱ्यांपुढे जाऊन उभा राहिला. आपण इतकी वर्षे मठनिवासी असूनही आपणांस मानसिक सुख नाही, आपली कुठेही श्रद्धा नाही; हे त्याने कबूल केले. रागावणे, संतापणे, सूडबुद्धीने वागणे; हीच परमेश्वराची रूपे भोवती मठातही तो पाहत होता. मठाच्या अधिकाऱ्यांनी त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. अधिक चांगला ख्रिश्चन हो; बायबलमधील वचनांवर श्रद्धा ठेव, असा त्यांनी ठराविक-पणाचा उपदेश केला, पण मार्टिनचे समाधान झाले नाही. त्याचा विश्वास कुठेच स्थिर व्हायला तयार नव्हता. मठातील धार्मिक वातावरण व आचारविचार त्यांच्या पसंतीस पडत नव्हते.

सन १५१० मध्ये मठाच्याच कामासाठी त्याला रोमला धाडण्यात आले. रोम शहर ख्रिश्चन धर्माचे त्या वेळी आगरच होते. परंतु तेथे त्याला खरे ख्रिश्चन कुठेच दिसले नाहीत. सर्वत्र बडेजाव, अंदाधुंदी, जुल्मजबरदस्ती, अनाचार, धाक, व्यापारी वृत्ती यांचेच राज्य त्याला दिसून आले.

त्याचे मन अशा प्रकारच्या डामडौलाच्या खोट्या धर्माचरणास लौकरच विटले व तो परत जर्मनीत आला. विटेन्बर्ग विद्यापीठात त्याने

प्राध्यापकाची जागा पत्करली. आता त्याच्यावर मठाच्या जीवनाची शुष्क बंधने नव्हती. त्याची विचारशक्ती मोकळी झाली. साऱ्या जगाच्या दृष्टीने धर्माचे स्वरूपच बदलायला हवे, असे त्याला वाटू लागले. स्वतःच्या मनाचे सुख, स्वतःची मुक्ती इत्यादी विचारांबरोबर जगाचा विचारही करणे अगत्याचे आहे असे त्यास वाटू लागले. धर्मसुधारणेची चळवळ हाती घ्यावी काय, असाही एक विचार त्याच्या मनात येऊन गेला. ख्रिस्ताचा खरा धर्म कोणत्या स्वरूपाचा होता, याचा शोध घेण्याचे त्याने ठरविले. या बुद्धिमान माणसाने धर्माची खरी रहस्ये जाणून घेण्याचा प्रयत्न केला. विटेन्बर्गच्या या तरुण प्राध्यापकाने रूढ धर्माविरुद्ध एक प्रकारचे बंडच पुकारले !

रोम येथील सेंट पीटर्स चर्चच्या पुनरुद्धारासाठी फार मोठ्या संख्येने देणग्या जमविण्याचे काम चालू होते. त्यासाठी पोपने एक नामी युक्ती काढली होती. त्याने ईश्वराच्या प्रसादासाठी, कृपेसाठी काही अधिकार-पत्रे विक्रीसाठी काढून पैसे जमविण्यासाठी गावोगाव एजंट पाठवून दिले होते. जो जास्त पैसे देऊन अधिकारपत्रे विकत घेई त्याच्याजवळ पुण्य तेवढ्या प्रमाणात साठ राही. ही अधिकारपत्रे म्हणजे मुक्तीचा पासच म्हणानात. पोपच्या, मध्यवर्ती चर्चच्या कृपेची अशी विक्री युरोपमध्ये सर्वत्र होत होती. जे गरीब होते, ज्यांना हे पास घेता येत नव्हते त्यांना कृपाप्रसाद कुठला? त्याला ईश्वराचे सान्निध्य कोठले? असे किंमतवान पास ज्यांच्याजवळ असतील त्यांनाच स्वर्गात प्रवेश मिळेल अशा प्रकारचा प्रचार पोपचे एजंट करीत.

असाच एक एजंट विटेन्बर्ग येथील मार्टिन ल्यूथरच्या घरी आला. त्याने ल्यूथरला या अधिकारपत्रांची महती समजावून दिली. या पासा-मुळे दैवी कृपा कशी प्राप्त होईल ते समजावून दिले. मार्टिनवर त्याच्या भाषणाचा काही परिणाम झाला नाही. ही शुद्ध फसवेगिरी आहे असे त्याला

वाटले. या ढोंगाविरुद्ध त्याने शस्त्र उपसले. भोळ्याभावड्या लोकांना फसवून पासेस विकणाऱ्या पोपच्या हस्तकांविरुद्ध त्याने प्रचार सुरू केला. अशा प्रकारे पुण्य वा कृपाप्रसाद विकत घेता येणार नाही असे त्याने सांगण्यास प्रारंभ केला. पोपच्या व धर्मसत्तेच्या या मोहिमेविरुद्ध त्याने आघाडी उभारली. त्याने पोपविरुद्ध पंचाण्णव कलमांचा एक जाहीरनामाच काढला व तो विटेन्बर्गच्या चर्चच्या दरवाज्यावर सर्व लोकांना वाचता यावा म्हणून ठोकून टाकला. मार्टिन ल्यूथरचे हे धैर्य अद्वितीय होते. प्रस्थापित धर्माविरुद्ध त्याची ही चळवळ मोठ्या साहसाची होती. सबंध ख्रिश्चन धर्माचीच सुधारणा करण्यास तो प्रवृत्त झाला. पोपची सत्ता ऐश्वर्यशाली, सुखासीन, श्रीमंतांचे हित पाहणारी, कर्मकांडात रमणारी झाली होती. तो धर्माचे साधे, सरळ, मनाची उन्नती साधणारे रूप शोधण्याच्या प्रयत्नात राहिला.

परंतु पंधराशे वर्षे चालत आलेल्या धर्मपरंपरेस विरोध करण्याचा अधिकार विटेन्बर्गच्या या प्राध्यापकास कुणी दिला ? त्याला काय समजते ? याला वेड तर नाहीना लागले ? पोपच्या अवकृपेस हा विनाकारण का पात्र होतोय ? अशी चर्चा सर्वत्र सुरू झाली. धर्मसत्तेस विरोध करणाऱ्या या भ्रमिष्ट माणसाचा त्वरित बंदोबस्त व्हावा म्हणून रोमन राज्यसत्तेकडे लोकांनी तक्रारी केल्या. धर्ममार्तंडांच्या सभा सुरू झाल्या. मार्टिन ल्यूथरचा निषेध झाला.

सन १५२० मध्ये मार्टिनला धर्मबाह्य ठरविणारे पत्र पोपने पाठविले. पण मार्टिनला आता वेगळेच स्फुरण चढले होते. त्याने ते पत्र सर्व लोकांसमक्ष जाळून टाकले ! हे त्याचे कृत्य बेकायदेशीर ठरले. जर्मनीचा बादशहा पाचवा चार्ल्स याने त्याला पकडून धर्मसभेपुढे आणले. धर्माभिमानी लोकांनी त्याला बजावले, ‘ पोपविरुद्ध लिहिलेली सर्व पुस्तके व लेख परत कर. पुनः असे लिहू नकोस. ’ त्यावर मार्टिनने

सांगितले, 'मी जे लिहिले ते जर बायबलच्या आधारे खोटे ठरले तरच मी ती पुस्तके परत करीन. नाही तर नाही.' मार्टिनच्या या उत्तराने अधिकारी खवळले; पण जर्मनीतील लोक त्याच्या पाठीशी राहिले. त्याला आता अनेक अनुयायी मिळत गेले. जुन्या कॅथॉलिक धर्माला विरोध करणाऱ्या या नव्या धर्मास, मार्टिन ल्यूथरच्या चळवळीतून निर्माण झालेल्या नवीन पंथास प्रॉटिस्टंट – विरोधक धर्म – असे नाव प्राप्त झाले. कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट यांच्यांत पुढे अनेक वर्षे वाद माजले. एक पक्ष पोपची सत्ता मानीत होता, दुसरा बायबल व सद्सद्विवेकबुद्धी यांना प्रमाण मानीत होता.

धर्मबाह्य झालेला मार्टिन ल्यूथर आता कशालाच भीत नव्हता. लहानपणी खाणीत काम करणारे मजूर भोवतीच्या जगापासून पूर्णपणे अलिप्त असलेले त्याने पाहिले होते. त्यांचे जीवन सुखाचे होते. त्यांचे कधी कुणापासून अडलेले त्याने पाहिले नव्हते. मार्टिन ल्यूथरला असेच मुक्त व स्वतंत्र आयुष्य जगायचे होते. सत्तामदाने भ्रष्ट होत चाललेली धर्मसत्ता त्याने झुगारून दिली होती. तो आता आपल्या धर्माच्या प्रचारासाठी गावोगाव भटकत असे. त्याच्या बासरीच्या मंजुळ स्वरांनी अनुकूल वातावरण निर्माण होई. त्याच्या सडेतोड विचारांनी लोक सावध होत. त्याचे सर्वत्र स्वागत होत राहिले. या विजयाच्या आनंदात तो स्वतःची पोटदुखीही विसरून जात असे. कुठल्याही मानवी व्यक्तीपुढे नमण्याचे त्याने सोडून दिले.

मार्टिन ल्यूथरची वर्म्स येथे जी चौकशी झाली त्यातून फारसे निष्पन्न झाले नाही. मार्टिनने आपला आग्रह सोडला नाही. बादशहाने मार्टिन ल्यूथरला परोपरीने सांगून पाहिले. त्याच्या जीवितास लोक धोका देतील असेही भासविले. परंतु मार्टिनला लोक आपल्याच बाजूचे आहेत हे माहीत होते. बासरी वाजवीत, गाणे म्हणत मार्टिन खेड्यापाड्यातून हिंडे

तेव्हा लोक त्याच्याभोवती जमा होऊन त्याला सहानुभूती दाखवीत. त्याला नाना प्रकारची खाद्ये रवीत. लोकांचे प्रेम त्याने पुरेपूर ओळखले होते.

याच सुमारास सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने त्याने एक मोठी कामगिरी केली. आपला नवा धर्म बायबलवर आधारलेला आहे हे दर्शविण्यासाठी त्याने बायबलचे भाषांतर जर्मन भाषेत केले. ईश्वराचे शब्द त्याच्याच तोंडून सर्वसामान्य लोकांना त्यांच्याच भाषेत वाचून तृप्त होऊ द्या. त्यांना स्वतंत्र विचार करू द्या. प्रत्येक माणसास स्वतःच्या बुद्धीने यामुळे बायबलचा अर्थ लावणे सुलभ होत गेले. मार्टिनच्या धर्मसुधारणेच्या चळवळीस या भाषांतरामुळे फार मोठे साह्य झाले. रोमन चर्चची सत्ता संपून गेल्याचे दृश्य पाहून जर्मन शेतकऱ्यांना आनंद झाला. स्वतःच्या भाषेत ख्रिस्ताची शिकवण वाचायला मिळाली म्हणून लोक संतोषाने नाचायला लागले. मार्टिन ल्यूथरवर त्याची निष्ठा जडत गेली.

धर्मसुधारणेच्या आपल्या कार्यास योग्य दिशा मिळाल्याचे पाहून मार्टिन संतुष्ट झाला. ऐन वयात प्रापंचिक सुखास मुकलेल्या मार्टिनने फार उशीरा लग्न केले. एका पळून आलेल्या मठवासिनीबरोबर त्याने संसार थाटला. त्याचा व्यावहारिक संसार गरिबीचा होता. त्याची मुले नेहमी आजारी असत. दारिद्र्य वाढत असले तरी तो सुखदुःखांचा विचार फारसा करीत नसे. कधी त्याच्या खिशात आठदहा फ्लॉरिन्सही शिल्लक नसत. पण त्याचे अंतःकरण दयेने नेहमी भरलेले असे. तीच त्याला मोठी संपत्ती वाटे. विटेन्बर्ग येथे भयानक प्लेग सुरू झाला तेव्हा अनाथांना आश्रय देण्यासाठी त्याचे घर म्हणजे एक प्रकारचे इस्पितळच बनून गेले. त्याची लहान मुलगी एलिझाबेथ आजारी झाली तेव्हा हा धर्मसुधारक करुणेने व्याकुळ होऊन गेला. त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा

वाहू लागल्या. बलवत्तर धर्मसत्तेपुढे न नमणारा हा धर्मसुधारक लहान मुलीच्या मरणयातना पाहून विनम्र झाला, कष्टी झाला. याच दुःखद मनःस्थितीत या थोर धर्मसुधारकाचा अंत सन १५४६ मध्ये झाला.

* * *



इ. स. १८६२–१९०२

## १० : स्वामी विवेकानंद

सुमारे ऐशी नव्वद वर्षांपूर्वीचा प्रसंग !

कलकत्ता येथील शिमला नावाच्या विभागात सुरेन्द्रनाथ मित्र नावाचे एक भाविक गृहस्थ राहत होते. त्यांनी एके दिवशी दक्षिणेश्वराच्या विल्यात कालिमातेच्या उपासकास आपल्या

घरी उत्सवासाठी बोलाविले होते. या अर्धवट दिसणाऱ्या उपासकाचा, रामकृष्ण परमहंसांचा वेध कित्येकांना पूर्वीच लागला होता. यांच्या ज्योतिर्मयी परिसरात जो जो येई तो तो भारावून जाई. कालिमातेच्या मांडीवर वत्सलनेते बागडणाऱ्या या लडिवाळ उपासकाच्या दर्शनानेच लोक तृप्त होत. सुरेन्द्रनाथ मित्रांच्या घरी उत्सवप्रसंगी त्यांना कुणी चांगला गायक मिळाला नाही.

म्हणून त्यांनी शेजारीच राहणाऱ्या नरेन्द्रास बोलावणे पाठविले. या वेळी वयात आलेला नरेन्द्र बुद्धिवाद, तर्कवाद, पाश्चात्य तत्त्वज्ञान यांनी भारावून गेला होता. पण मन जात्याच जिज्ञासू व अस्वस्थ असल्याने त्याने ते आमंत्रण स्वीकारले. तो सुरेन्द्रनाथांच्या घरी आला. त्या भाविकांच्या मेळाव्यात त्याचे मन गजबजून गेले. तेथून हालावेसे तर त्यास वाटेना. ध्यानाच्या आनंदाची चटक त्याला लागली होती. पण कॉलेजमधील बुद्धिनिष्ठ वातावरण, ब्राह्मसमाजाच्या सभासदांचा सहवास, देकार्त, ह्यूम, बेन, डार्विन, स्पेन्सर इत्यादींचे नवविचार यांच्या वैचारिक आवर्तांत तो पूर्णपणे गुरफटून गेला होता. अज्ञाताची ओढ एकसारखी त्याच्या मनास खेचीत होती. त्याच्या अंगावर योगी पुरुषाची चिन्हे स्पष्ट असल्याचे महर्षी देवेन्द्रनाथ ठाकूर यांनी पूर्वीच सांगितले असले तरी बाह्य सृष्टीतील जडवादी वातावरणामुळे तो संभ्रमात होता. महाबुद्धिमान नरेन्द्र सुरेन्द्रनाथ मित्रांच्या घरी सहज उत्सवासाठी म्हणून आला.

लोकांनी आग्रह केला म्हणून त्याने एक सुरेख पद म्हटले. त्याचा आवाज अतिशय मधुर, भावप्रवण व प्रेरक होता. त्याच्या डोळ्यांतून भक्तिभाव मूर्तिमंत होऊन ओसंडत असे. त्याचे गाणे ऐकून लोक तल्लीन झाले. स्वतः रामकृष्ण परमहंसांना अतिशय आनंद झाला. त्यांनी नरेन्द्राची ओळख करून घेतली. ' एकदा दक्षिणे-

श्वरच्या देवळात ये ना' अशी त्यांनीच नरेन्द्रनाथाला विनंती केली. नरेन्द्राने नुसती मान डोलावली. त्याची परीक्षा जवळ आली होती; त्यामुळे या वेळी दक्षिणेश्वरी जाणे त्याला जमले नाही.

पण पुढे लागलीच त्याच्या लग्नाची बोलणी सुरू झाली. नरेन्द्राचे मन व्यथित झाले. सत्याच्या शोधासाठी उत्सुक झालेला हा बुद्धिमान तरुण घरातील या विचारामुळे गोंधळून गेला. एका आप्ताला त्याने आपल्या मनातील संघर्ष समजावून दिला. लहानपणापासून त्याची वृत्ती वैराग्यशील होती. त्याची चिंतनाची, एकान्ताची आवड वाढत राहिली. लहानपणापासून त्याला डोळे मिटताच भुवयांत एक ज्योतिर्गोल दिसत असे. साधुसंतांच्या दर्शनाची त्याला मनापासून आवड होती. ईश्वर आपणांस भेटेल का, या एका प्रश्नाने तो अस्वस्थ झाला होता. अंतर्यामात दूर कुठे तरी अज्ञाताची ओढ सतत असे. कॉलेजमध्ये अभ्यासात फार हुशार असणारा हा तरुण पोरगा या भलत्या नादाने वाया जातो की काय, अशीही धास्ती काहींना वाटे. आणि आता तर लग्नाच्या विचाराच्या वेळी त्याने आपल्या मनाची व्यथा बोलून दाखविली. त्यावर त्या समजूतदार आप्ताने म्हटले, 'नरेन्द्र, तर मग तू ब्राह्मो समाजाचा नाद सोडून दे. चटकन त्या दक्षिणेश्वरातील पुजाऱ्याचे जाऊन पाय धर.'

नरेन्द्रनाथास पुन्हा दक्षिणेश्वराच्या पुजाऱ्याची परत एकदम आठवण झाली. चारदोन मित्रांना बरोबर घेऊन तो तेथे गेला. त्याने भगवान रामकृष्णांच्या पायांवर मस्तक ठेवले. काही हितगुजही झाले. रामकृष्णांनी त्याचा हात धरून त्याला एका बाजूस नेले आणि अत्यंत भावपूर्ण शब्दांत त्यांनी म्हटले,

"नरेन्द्र! इतके दिवस मला कसा रे विसरलास? मी सारखी तुझी वाट पाहत होतो. भोगी लोकांशी बोलून बोलून माझे तोंड होरपळून गेले

आहे. मी तुझ्यासारख्या त्यागी माणसाची वाट पाहतोय. आज माझे मन निवेल." रामकृष्णांचे डोळे भरून आले. कंठ सद्गदित झाला. पुन्हा त्यांनी नरेन्द्राचा हात प्रेमाने हातात घेतला. पुनः वत्सलतेने त्यांनी त्याच्या मुखाकडे पाहिले आणि म्हटले,

"प्रभो, मला माहीत आहे, तुम्ही सप्तर्षिमंडलातील एक ऋषी आहात – नररूपी नारायण आहात. सर्व जीवांचे कल्याण करण्यासाठी देह धारण करून अवतीर्ण झाला आहात."

नरेन्द्रास या बोलण्याचा अर्थ प्रथम समजला नाही. रामकृष्ण परमहंस म्हणजे कुणी एक अलौकिक पुरुष असल्याचे त्याच्या ध्यानी आले. लोक समजतात तसे वेडेचार ते करीत असले तरी त्यांचे जीवन प्रभुस्पर्शाने उजळून निघाले असल्याचे त्यांना समजले. त्यांचे दक्षिणेश्वरी वारंवार येणेजाणे सुरू झाले. अनेकांना पूर्वी त्याने जो प्रश्न विचारला होता तोच एकदा रामकृष्णांना विचारला,

"महाराज, आपणांस ईश्वराचे दर्शन झाले आहे काय ?"

"होय बाळ !" तितक्याच सहजतेने रामकृष्ण म्हणाले, "होय, मला ईश्वराचे दर्शन झाले आहे. मी आता तुला पाहत आहे त्यापेक्षा कितीतरी स्पष्टतेने मी श्वरास पाहिले आहे...तूही त्यांना पाहू शकशील. मी सांगतो तसे वागशील ?"

नरेन्द्राच्या अंतःकरणात समाधान भरून आले. याच पुरुषाच्या सान्निध्यात आपणास देव भेटेल; आपल्या आयुष्याचे सार्थक होईल असे त्याने ओळखले. रामकृष्णांचा सहवास वाढत गेला. एके प्रसंगी वेळ साधून रामकृष्णांनी नरेन्द्रास स्पर्श करवून त्याला आत्मसाक्षात्कार घडविला. नरेन्द्राची समाधी लागली. एका अलौकिक स्वानंदाने तो बेहोष होऊन गेला. एका नव्याच जाणीवेने त्याचे मन पुलकित होऊन गेले. दक्षिणेश्वराच्या या अवलिया पुरुषाने नरेन्द्राचे सारे जीवनच

बदलून टाकले. रामकृष्णांच्या जीवनाच्या कार्याचा एक तंतू नरेन्द्राच्या जीविताशी निगडित झाला. नरेन्द्राने संन्याशाची वस्त्रे अंगावर धारण केली. भिक्षावृत्तीने राहून आजारी असलेल्या रामकृष्णांच्या सेवेतच त्याने अपार आनंद मानला. त्याची ध्यानाची सवय वाढत होती. ब्रह्मानुभूतीमधील अद्वितीय आनंद त्याला सुखाच्या सिंहासनावर विराजमान करीत होता. पुनः पुनः भावसमाधीत मग्न व्हावे, बाह्य जगाचा विचारच करू नये असेच नरेन्द्रास वाटे. नरेन्द्राची ही आत्मकेंद्रीय वृत्ती पाहून एकदा रामकृष्ण म्हणाले,

" नरेन्द्र, काय हवे तुला ? तू कशासाठी उत्सुक आहेस ? "

" महाराज, शुकदेवाप्रमाणे सतत निर्विकल्प समाधीत मग्न असावे असे वाटते."

" नरेन्द्र, बस्स ? एवढीच इच्छा ? "

" होय गुरुदेव, भावसमाधीत गर्क व्हावे एवढीच वासना आहे. "

" नरेन्द्र ! नरेन् " रामकृष्णांचा आवाज चढला. ते थोडे रागावले.

" नरेन्द्र ! पुनः पुनः समाधीची गोष्ट काढतोस ? लाज नाही वाटत तुला ? समाधीतील सुख तू स्वतः एकटाच उपभोगणार ? हजारो लोकांना सावली देणारा वटवृक्ष तू व्हावेस. मुक्तीसारखा क्षुद्र मार्ग कशास सारखा मनात ठेवतोस ? "

गुरुदेव इतके रागावले तरी समाधीच्या सुखावरील नरेन्द्राचे प्रेम कमी झाले नाही. त्याने पुनः नम्रतेने म्हटले, भवान

" गुरुदेव, समाधीमधील अद्वितीय सुख प्राप्त झाल्याखेरीज माझे मन शांत नाही व्हायचे. मी याशिवाय दुसरे काहीच करू शकणार नाही... "

" होय, पण तुझ्या हातांत काय आहे रे ? जगदंबा तुझ्या मानगुटीवर बसून सारे करवून घेईल. तू नाही, तुझी हाडे करतील... "

रामकृष्णांच्या या वचनांनी नरेन्द्र पुनः सावध झाला. स्वतःसाठी समाधिसुख न पत्करता इतरांसाठी देह झिजवावा हे त्याच्या मनास पटले. ‘ बहुजनहिताय बहुजनसुखाय कर्म करावे, अपरोक्षानुभूतीद्वारा लाभलेल्या सत्याचा प्रसार करावा ’ या विचाराने नरेन्द्र प्रभावी बनला. स्वतः ज्ञानसंपन्न होऊन दीनदुःखितांसाठी, पीडितांसाठी, मोहाने ग्रस्त झालेल्यांसाठी, सर्वसामान्य लोकांना दिव्य जीवनाचा अर्थ समजावून सांगण्यासाठी नरेन्द्र सिद्ध झाला. आजारी असलेल्या गुरुदेवांची सेवाशुश्रूषा त्याने मनोभावे केली. त्यांचे दुखणे कमी होईना. शेवटी त्यांनी नरेन्द्रास जवळ बोलाविले आणि म्हटले, “ नरेन्द्र, ही सारी मुले मागे राहतील. तू या सर्वांत बुद्धिमान, कर्तृत्ववान. तू त्यांच्याकडे पाहा. त्यांचे रक्षण कर. त्यांना मार्ग दाखीव...मी तर माझे सर्वस्व तुला देऊन फकीर बनलो आहे. ” आणि थोड्याच दिवसांत रामकृष्णांचा अवतार समाप्त झाला. त्यांच्या विझणाऱ्या ज्योतीवर आधीच एक दीप्तिमान प्रदीप प्रज्वलित झाला होता.

या प्रदीपाच्या ज्योतीने थोडयाच दिवसांत सारे विश्व उजळून निघाले. रामकृष्णांच्या निर्याणानंतर मनातील उद्विग्नता कमी व्हावी म्हणून नरेन्द्रांनी उत्तरेच्या तीर्थयात्रा सहकारी बंधूंच्याबरोबर केल्या. चित्तात सारखी जबाबदारीची जाणीव होती. हिंदुधर्माच्या पुनरुद्धाराचे केवढे मोठे कार्य आपल्यापुढे आहे ! धर्म किती हीनदीन अवस्थेला पोचलेला आहे ! अलौकिक शक्तीच्या या धर्माची लेकरे अर्धपोटी आहेत, भुकेकंगाल आहेत, अज्ञानाच्या अंधकारात ठेचाळत आहेत. यांना धर्माचा अर्थ कोण समजावून सांगणार ? आपणच हे महान कार्य केले तर ? खऱ्या धर्माचे प्रवर्तन आपणच करावे, लोकधर्मांचे पुनरुत्थापन आपणच साधावे अशी प्रेरणा नरेन्द्रास झाली.

नरेन्द्र आता विवेकानंद म्हणून ओळखले जात होते. भगव्या वस्त्रां-

तील या तरुण संन्याशाच्या डोळ्यांमधील अलौकिक तेज पाहून लोक दिपून गेले. स्वामींचे अध्ययन, चिंतन वाढत होते. अखंड भ्रमण करून त्यांनी सारा देश पाहून घेतला. लोकस्थिती न्याहाळून पाहिली. म्हैसूरच्या मुक्कामात स्वामींच्या कार्यास दृष्ट लागावी अशी कलाटणी मिळाली. भारतीय धर्माचा व तत्त्वज्ञानाचा प्रसार युरोप-अमेरिकेत व्हावा व तेथील भौतिक सामर्थ्य येथे भारतात यावे, तेथील वैराण जीवनास परमार्थाचा ओलावा प्राप्त व्हावा. येथील दुरवस्था दूर होण्यासाठी भौतिक प्रगतीची महती पटावी; असा योग आला. अमेरिकेत शिकॅगोस एक सर्वधर्मपरिषद भरणार होती; तिला स्वामींनी हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून जावे असे ठरले. स्वामीजींनी अमेरिकेस जाण्यासाठी मुंबई सोडली. आजवर युरोप-अमेरिकेस काही थोडी माणसे गेली नव्हती ! पण आज हा तरुण संन्यासी अमेरिकेत निघाला होता. दंड, कमंडलू, भगवी वस्त्रे, पोथ्या, पुस्तके हा त्यांचा संभार होता. स्वामींनी प्रवासात अनेक जातींचे, धर्मांचे लोक पाहिले. त्यांचे रिवाज समजावून घेतले. उगवत्यामावळत्या सूर्यनारायणाची लाली मनात साठवून घेतली. सिलोन, चीन, जपानमार्गे स्वामी अमेरिकेस निघाले होते. कॅनडामधून स्वामी बोस्टनला येऊन पोचले.

येथे त्यांना कोण ओळखणार ? भगव्या वस्त्रातील हा चमत्कारिक प्राणी सर्वांच्या कुतूहलाचा विषय झाला इतकेच. पण याला आश्रय कोण देणार ? याची कुणाशी फारशी ओळखही नव्हती. यांना खरे म्हणजे धर्म-परिषदेचे आमंत्रणही नव्हते ! त्यांना प्रथम नीट आसराही मिळाला नाही. भुकेने प्राण कासावीस झाले. रेल्वेच्या भिकारड्या डब्याच्या आश्रयाने त्यांना एक रात्र कशीबशी काढावी लागली. पुढे एका कनवाळू स्त्रीस त्यांची दया आली. तिने त्यांना घरात घेतले. त्यांची विचारपूस केली. हार्वर्डच्या प्राध्यापक राईट यांच्या ओळखीचे पत्र स्वामींना मिळाले. त्याच्या आधाराने स्वामींनी शिकॅगोच्या धर्मपरिषदेत प्रवेश मिळविला.

ब्राह्मसमाजाचे प्रतापचंद्र मुजुमदार, मुंबईचे नगरकर, जैन समाजाचे वीरचंद्र गांधी, थिऑसॉफीच्या ॲनी बेझंट इत्यादी श्रेष्ठ व्यक्ती आधीच व्यासपीठावर स्थानापन्न झाल्या होत्या.

हा दिवस ११ सप्टेंबर, १८९३ हा होता.

या दिवशी स्वामींनी प्रथम भाषण केले. त्यांना भाषणाचा सराव नव्हता. आधी नामांकित वक्ते बोलून गेले असल्याने व सभेस उशीर झाल्याने आता आणखी सांगण्यासारखे तरी काय उरले आहे ? अशाच भूमिकेत सर्व श्रोते होते. अशाच प्रतिकूल पार्श्वभूमीवर हा तरुण संन्यासी बोलायला उठला. क्षणभर त्याने गुरुदेवांचे स्मरण केले. आणि 'माझ्या अमेरिकेतील बंधुभगिनींनो...' असे शब्द त्यांनी उच्चारले मात्र, सारी सभा विद्युत्प्रकाशाने चमकून जावी तशी स्तब्ध झाली. स्वामींच्या मुखावरील अद्वितीय तेजाने सारे भारावून गेले. स्वामींनी भारतीय हिंदू धर्माचे महत्त्व विशद करून सांगितले. त्यांच्या आधी प्रत्येकाने आपापल्या धर्माची महती गाइली. स्वामींनी सर्व धर्मांचे महत्त्व मान्य करण्याचे हिंदुधर्माचे वैशिष्ट्य सांगितले. आपापला धर्म न सोडता प्रत्येकास आत्मशांती प्राप्त करून घेता येईल, विश्वबंधुत्व साधता येईल, असा धीरगंभीर व तेजस्वी उपदेश स्वामींनी करून आपले भाषण संपविले. त्यांच्या भाषणानंतर टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला तो कितीतरी वेळ थांबेनाच. स्वामींच्यावर लोकांनी अतोनात प्रेम केले. स्वामींनी अधिवेशनात दहा-बारा तरी भाषणे केली. अमेरिकन श्रोत्यांनी तृप्त मनाने ती ऐकली.

लोकांना अनेक नव्या गोष्टी स्वामी प्रभावी भाषेत सांगत. त्यांच्या मुखावरचे तेज हृदयात साठवावे की त्यांचे अमृतमधुर बोल ध्यानी आणावेत याविषयी लोकांच्या मनात संभ्रम नि ाण होई. त्यांनी आपण पापी, अपवित्र, अधम आहोत असाच घोष आत्तापर्यंत ऐकला होता.

परंतु हिंदुस्थानामधील हा तरुण संन्यासी म्हणत होता, “ तुम्ही पापी ? तुम्ही पापी नाहीत. तुम्ही अमृताचे पुत्र आहात. या जगात पाप असे काही नाहीच. तुम्ही त्या सर्वशक्तिमान आत्मस्वरूपाचीच रूपे आहात. शुद्ध आहात, बुद्ध आहात, मुक्त आहात. उठा, जागे व्हा, स्वतःचा विकास करून घ्या. ”

विवेकानंदांच्या गौरवाने व स्तुतीने अमेरिकन वृत्तपत्रांची पानेच्या पाने भरू लागली. त्यांचा दौरा प्रमुख शहरांतून झाला. त्यांच्या भाषणांनी व त्यांतील सरळ, सोप्या पण भावपूर्ण उपदेशाने सारे श्रोते मुग्ध होऊन जात. शेकडो स्त्री-पुरुष स्वामीजींचे शिष्य झाले. एका नव्या धर्माचा नेता आपणांस मिळाला म्हणून त्यांना धन्यता वाटली. स्वामींनी अमेरिकेत दिलेल्या व्याख्यानांची प्रसिद्धी युरोपमध्ये फार झाली. स्वामींनी इंग्लंडला भेट दिली. युरोपच्या प्रवासात त्यांनी अनेक भाषणे देऊन हिंदू धर्माचा उंच ध्वज सर्वत्र फडकवून दिला. खऱ्या धर्माची ओढ प्रत्येकाला त्यांची व्याख्याने ऐकून वाटू लागली. मार्गारेट ई. नोबेल–म्हणजेच भगिनी निवेदिता – ही स्वामींची थोर शिष्या. अशी अनेक माणसे स्वामीजींच्या दिव्य सहवासात भारावून गेली. युरोप-अमेरिकेत असताना तेथील ऐश्वय व तेथील प्रगती पाहून स्वामी प्रथम दिपून गेले; पण प्रत्येक क्षणी त्यांना आपल्या भारतभूमीची आठवण होई. स्वतःच्या अज्ञानग्रस्त भावंडांची व त्यांच्या उपासमारीची स्मृती होऊन स्वामी लहान मुला-प्रमाणे कधी रडू लागत. त्यांचे सर्व लक्ष भारतावर होते.

तीन-चार वर्षांचा युरोप-अमेरिकेचा प्रवास संपवून स्वामी भारताकडे येण्यास निघाले. भारताचा इतिहास, भारतीय समाज, भारतीय धर्म, भारतीय तत्त्वज्ञान, भारतीय अज्ञान, भारतीय कंगालखोरी इत्यादींचा मेळ कसा बसवावा ? ज्यांचे आत्मज्ञान एवढे उच्च दर्जाचे ते लोक इतक्या खालच्या पातळीवर का व कसे गेले ? यांना हात धरून कसे

उठवावे ? इत्यादी प्रश्नांनी स्वामी अस्वस्थ बनत. युरोप-अमेरिकेतील व्याख्यानांच्या विजयापेक्षा त्यांच्या मनास भारतीयांची ही जाणीव अस्वस्थ करीत राही. याच जाणीवेने स्वामी हिंदुस्थानात आले. नवी उमेद, नव्या आकांक्षा, नवा संदेश घेऊन त्यांनी भारताच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवले. साऱ्या भारतभर त्यांचे अभूतपूर्व स्वागत झाले. प्रत्येक मोठ्या शहरातून त्यांची मिरवणूक निघाली. त्यांच्या व्याख्यानांच्या तुफानी दौऱ्यांनी एक नवे चैतन्य सर्वत्र निर्माण झाले. आपल्या पूर्वीच्या मित्रांची, गुरुबंधूंची त्यांनी प्रेमाने भेट घेतली. त्यांचे मनोमालिन्य त्यांनी दूर केले. बेलूर मठातील सहकाऱ्यांबरोबर त्यांनी पुढच्या योजना ठरविल्या.

स्वतःची मुक्ती, स्वतःची उन्नती एवढेच सीमित क्षेत्र आपणांपुढे नाही असे त्यांनी सर्वांना बजावले, 'स्वतःच्याच मुक्तीचा विचार कराल तर नरकात जाल. पूर्ण ब्रह्माचा लाभ करून घ्यायचा असेल तर इतरांच्या मुक्तीची चिंता आधी करा. ... आपणांस अशा धर्माचा प्रसार करायचा आहे की, ज्याच्या आचरणाने श्रेष्ठ 'मनुष्य' तयार होईल. त्यासाठी आधी स्वार्थत्याग करणाऱ्या थोर कार्यकर्त्यांची फार जरुरी आहे. चला, उठा, कामास लागा –' स्वामींच्या या दिव्य संदेशामुळे पुनः सर्वत्र नवचैतन्य उसळून आले. अनेक संभाषणे, भाषणे, सभा, व्याख्याने इत्यादींनी स्वामींचे जीवन भरून राहिले. त्यांनी शिष्यांच्या आग्रहावरून पुनः एकदा युरोप-अमेरिकेचा प्रवास केला. मार्गदर्शन करून लोकांना कार्यप्रवृत्त केले. कित्येक ठिकाणी त्यांनी वेदान्तसमित्या स्थापन केल्या; आणि सन १९०० च्या डिसेंबरमध्ये स्वामी परत हिंदुस्थानात बेलूर मठात येऊन दाखल झाले.

अखंड प्रवास, सारखी भाषणे, व्याख्याने आणि प्रकृतीची हेळसांड यांमुळे स्वामी थकत चालले. हिमालयामधील थंडी त्यांना मानवेना. प्रकृती बिघडली तरी स्वामी विश्रांती घ्यायला कुठे तयार होते ? पूर्वबंगाल, आसाम

इत्यादी प्रांतांत त्यांचे भ्रमण तर सुरू होतेच. मधुमेहाचा विकार बळावत चालला होता. तरी बुद्धगयेची यात्रा त्यांनी केलीच. रामकृष्ण मठाचे कार्य त्यांना वाढवायचे होते. ‘ मानव ’ निर्माण करणाऱ्या एका नव्या धर्माचा प्रसार त्यांना करायचा होता. शेवटपर्यंत त्यांना दीन, दुःखी, अज्ञानी, हिंदू समाजाच्या उद्धाराची चिंता लागली होती. ते म्हणत, “ या देशातील गरीब, दुःखी लोकांचा कुणीही कैवारी नाही रे. त्यांचा विचार करायला कोण रिकामा आहे ? हे लोक देशाचा मेरुदंड आहेत. यांच्याच कष्टांनी अन्न तयार होते. यांचा कोण पाठीराखा आहे रे ? या बांधवांना आपण जवळ केले नाही तर ते भराभरा ख्रिस्ती होतील. यांच्याकडे उघडे डोळे ठेवून कुणी तरी पाहा ना. यांच्यांत व माझ्यात एकच ब्रह्मतत्त्व आहे, हे तारतम्य ध्यानात आणा ना. ”

याच ध्यासात असताना मानवधर्माच्या या थोर व युगप्रवर्तक धर्मवीराचे सन १९०२ मध्ये निधन झाले. देहधारी ज्योतितत्त्व प्रकाशाच्या मूल स्वरूपात विलीन झाले तरी त्याचा मूळचा प्रकाश अजूनही मार्ग दाखविणारा आहे.

* * *

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
अ. क्र. 99529 नों. दि. ......
वि. ......बा.वा......

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अनुक्रम 48709 वि. बा.(८)९।3.12४
क्रमांक 3536 नोंद दि. 3.013.1.429

IRBK-0111821